CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : ४२ | सोमवार दि. ११ ऑक्टोंबर २०२१ ते रविवार दि. १७ ऑक्टोंबर २०२१ | पाने : ८ | किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## अनैतिक संबंधातून रक्ताचा सडा पडला बहिणीने आपल्या बहिणीचा काटा काढला

कराड/क्राईम रिपोर्टर



अनैतिक संबंध हे सहसा लपून राहत नाहीत आणि जेंव्हा ते उघडकीस येतात तेंव्हा माणसाचा संसार उध्वस्त होतो. शिवाय एखाद्याचा जीवही जावू शकतो. रक्ताची नाती कलंकित होतात. कराडमध्ये अशाच एका घटनेत आपल्या पतीशी अनैतिक संबंध ठेवणाऱ्या एका विवाहितेने चक्क प्रियकराच्या मदतीने सख्ख्या बहिणीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही ...पान २ वर

# जमीन घोटाळे करणारे स्वत: बरोबर इतरांनाही गोवणार लोकप्रतिनिधींची पापं बविआला निवडणूकीत भोवणार

विरार/लक्ष्मणराव पाटोळे

मुंबईला लागून असलेल्या पालघर जिल्ह्यातील वसई–विरार पट्टयात सध्या जमिनीला सोन्याचा भाव आलेला आहे. त्यामुळे इथे जमिनी हडप करून त्या चढ्या भावाने विकण्याचे प्रकार वाढले आहेत. राज्य सरकार, केंद्र सरकार आणि वनविभागाच्या जमिनीवरही अतिक्रमण करून त्या विकण्याचा सपाटा इथल्या भूमाफियांनी लावला आहे. खोटी कागदपत्र तयार करून एखाद्याची जमीन सहजपणे हडप केली जात आहे. वास्तविक अशा प्रकरणात पालिका प्रशासन आणि इथल्या सत्ताधारी बहुजन विकास आघाडीने आळा घालायला हवा होता. पण आता अनधिकृत बांधकामे आणि जमिनी हडप करण्याच्या प्रकरणात त्यांचेच लोक कायद्याच्या कचाट्यात सापडत आहेत. वसई–विरार महानगर पालिकेची निवडणूक तोंडावर असताना जर सत्ताधारी पक्षाचे लोकप्रतिनिधी जमिनीच्या गैरव्यवहारात अडकू लागले आणि पक्ष नेतृत्वाकडून अशा लोकांकडे दुर्लक्ष होऊ लागले तर निवडणुकीत त्याची फार मोठी किंमत बविआला चुकवावी लागेल असे आता लोक उघडपणे बोलू लागलेत. कारण बविआचे एक जेष्ठ नगरसेवक प्रशांत राऊत यांच्यावर अनधिकृत बांधकाम केल्या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्याचे प्रकरण ताजे असतानाच महापालिकेत सभापती पदावर राहिलेल्या माजी नगरसेवक रमेश घोरकना आणि माजी नगरसेवक मिलिंद घरत यांच्यासह ८ जणांवर अली सिद्दिकी यांची कोट्यावधीची जमीन हडपल्या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### यांचीही इडीकडून चौकशी करा

वसई–विरारमध्ये सरकारी आणि खाजगी जमिनीवर कब्जा करून त्या उद्योजकांना तसेच निवासी गाळ्यांसाठी बिल्डरांना कोट्यावधी रुपयांना विकणाऱ्या घोरकना सारख्या सत्ताधारी पक्षाच्या आणि यात इतर पक्षांचे लोक असतील तर त्यांचीही इडी कडून चौकशी करा अशी मागणी वसई विरार मधील जनतेने केली आहे. वसई तालुक्यात अब्जावधी रुपयांचे जमिनींचे गैरव्यवहार झालेले आहेत त्यांची आयकर विभाग किंवा इडीकडून चौकशी होण्याची गरज आहे. घोरकनासारखे अडाणी लोक जर एवढा मोठा झोल करू शकतात आणि वरून सभापती बनून वसई विरारकरांच्या मानेवर बसू शकतात, तर जे शिकले सवरलेले आहेत आणि जमिनीच्या व्यवहारात मुरलेले आहेत त्यांनी किती झोल केले असतील हे वसई विरारकरांना कळायलाच हवे.



रमेश घोरकना

या प्रकरणी आमच्या प्रतिनिधिंनी घोरकना यांच्याशी संपर्क साधला असता आपल्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. इतकेच नव्हे तर या प्रश्नावर त्यांना व्यवस्थित त्यांची बाजूही मांडता येत नव्हती. नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या आणि दोन वेळा सभापती पदावर राहिलेल्या माणसाला जर त्याची बाजू व्यवस्थित मांडता येत नसेल किंवा एखाद्या विषयावर बोलता येत नसेल तर बविआ नेतृत्वाने अशा लोकांना सभापती पदावर कसे काय बसवले आणि हे असले सभापती लोकांची कामे कशी करणार? असा सवाल इथली जनता बविआ नेतृत्वाला विचारतेय! लोकांच्या कराच्या पैशातून महापालिकेचे काम चालते. मग तिथे निवडून जाणारा लोकप्रतिनिधी जर अडाणी असला तर त्याच्या मतदार संघातील लोकांची कामे कशी होतील याचा तरी विचार बविआ नेतृत्वाने तिकीट देताना करायला हवा. आता घोरकना सारखा माजी सभापती जमीन हडप करण्याच्या प्रकरणात अडकलाय. उद्या समजा त्याला अटक झाली किंवा निवडणूक आयोगाने त्याला निवडणूक लढवण्यास बंदी घातली तर ती एक प्रकारे पक्षाची बदनामी असेल. तेंव्हा आता तरी बविआ नेतृत्वाने जमिनी हडप करणाऱ्या माफिया प्रवृत्तीच्या लोकांना पालिकेत पाठवण्याऐवजी चांगल्या सुशिक्षित आणि नागरी सुविधांच्या प्रश्नांची जाण असलेल्या तसेच पालिकेत व्यवस्थित बोलता येईल अशाच लोकांना संधी द्यावी. घोरकना याचे जमीन घोटाळा प्रकरण खूपच रंजक आहे. या प्रकरणी फिर्यादी सिद्दीकी यांनी वसई पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि माझी सर्व्हे नंबर ३८ हिस्सा न. १ मध्ये ८६ गुंठे, सर्वे न.३९ हिस्सा न.१ मध्ये ९६ गुंठे, सर्व्हे न. ३६ हिस्सा न.१ मध्ये ०–४९–६...पान २ वर

# भावाच्या हत्येमुळे 'तो' सुडाने पेटला जामिनावर सुटलेल्याचा बदला घेतला



मयत कैफ | मयत धम्मप्रिय | आरोपी समीर | आरोपी झाकीर | जखमी मनोहर

भुसावळ/क्राईम रिपोर्टर

एखादा माणूस जर सुडाने पेटला तर त्याचा राग सहसा शांत होत नाही. जोवर त्याच्या अंतकर्णातील सुडाची आग शांत होत नाही तोवर तो गप्प बसत नाही. समीरच्या बाबतीतही तसेच झाले होते. त्याच्या भावाची हत्या करणाऱ्याला जरी पोलिसांनी पकडून तुरुंगात टाकलेले असले तरी आपल्या भावाच्या हत्येचा सूड घेण्यासाठी समीर टपून बसला होता आणि ज्या दिवशी त्याच्या भावाच्या मारेकऱ्याला जामीन मिळाला त्याच दिवशी भर रस्त्यात समीर आणि त्याच्या साथीदारांनी त्याचा गेम केला. इतकेच नाही तर त्याच्या बापालाही गंभीर जखमी केले. या घटनेने भुसावळ शहर हादरले असून पोलिसांनी सर्व आरोपींना ताब्यात घेतले आहे.



सतरा वर्षाचा मोहम्मद कैफ भुसावळ शहरातील पंचशील नगर भागात रहात होता. रस्त्याच्या कडेला फुटपाथवर कपडे विकून त्याचे वडील आणि भाऊ घर संसाराचा गाडा ओढत होते. एक भाऊ रेल्वे प्लॅटफॉर्मवर ठेकेदाराच्या निगरानीखाली खाद्यपदार्थ विकून आपला चरितार्थ चालवत होता. अशा संघर्षमय परिवारात कैफ जन्माला आला होता. घरची परिस्थिती जेमतेम असली तरी त्याच्या अंगात रग मात्र कायम होती. अल्लड वय आणि कुसंगत या घटकांचा संगम झाल्यामुळे त्याच्या अंगी टपोरीपणा आला होता. भाईगिरीची त्याला सवय जडली होती. शर्टाला पुर्ण बटने असल्यावर देखील वरची बटणे उघडी ठेवण्यात त्याला आनंद वाटत होता. कैफ रहात असलेल्या पंचशील नगर भागात त्याच्याच वयाचे काही तरुण देखील रहात होते. ...पान २ वर

## खून करून आरोपी झाले गुजरातला फरार 'सीसीटीव्ही'च्या आधारे अटकेचा थरार

गुन्हेकथा/क्राईम रिपोर्टर



मयत कमलेश

देशात गेल्या काही वर्षांपासून जातीयवादी राजकारण सुरु आहे. त्यातून काही नेते चिथावणीखोर भाषणे देत आहेत. अशाच प्रकारे चिथावणीखोर जहाल भाषणे देणाऱ्या कैलाश तिवारी या नेत्याची हत्या झाली होती. मात्र एटीएसने मोठ्या शिताफीने केवळ सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींना गुजरात राजस्थानच्या सीमेवरून अटक केली. या बद्दल एटीएसचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कमलेश तिवारी हे उत्तर प्रदेशमधील हिंदुत्ववादी शक्तींचे एक उगवते प्रेरणास्थान. जहाल वक्तव्य करण्यात त्यांचा हातखंडा होता. मात्र, याच वक्तव्यांमुळे ते अडचणीत आले; इतके की, त्यांच्यावर एका धर्मविशेष गटाच्या भावना दुखाविल्याप्रकरणी राष्ट्रीय सुरक्षा कायद्यानुसार (रासुका) कारवाईही करण्यात आली. देशातील कायद्याने त्याचे काम केले खरे; पण भावना दुखावलेल्या गटाचे या कारवाईने समाधान न होऊन त्यांनी डाव साधलाच! तिवारी यांनी २०१५ साली केलेल्या वक्तव्याप्रकरणी त्यांच्यावर २०१९ मध्ये प्राणघातक हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात ते मृत्यूमुखी पडले. तिवारी यांच्या हत्येच्या तपासाचे मोठे आव्हान यूपी पोलिसांसमोर होते. मात्र, हल्लेखोरांचे गुजरात कनेक्शन उघड झाल्यावर ...पान २ वर

## बाळूमामाच्या नावाने मनोहर मामाचं चांगभलं बाईच्या नादी लागताच होत्याच नव्हतं झालं

सोलापूर/क्राईम रिपोर्टर

आपल्या राज्यात जादू टोना विरोधी कायदा असला तरी जोवर लोकांच्या मनातली अंधश्रद्धा जात नाही, तोवर अशा कायद्याचा काहीच उपयोग नाही. कारण अंधश्रद्धेतून लोक स्वतःच भोंदू बाबांकडे जातात आणि आपली फसवणूक करून घेतात आणि बाबागीरीचा हा बिन भांडवली धंदा फायद्याचा असल्याने काही शातिर लोक या धंद्यात बाबागिरी करून दुकाने थाटून बसलेत. बाळूमामाच्या नावाने चांगभल या मालिकेतील बाळूमामाच्या महतीच लाभ उठवण्यासाठी एक भाजीवाला चक्क बाळूमामाच्या नावाने आपल्या भोंदुगिरीचे दुकान चालवू आणि आपल्याला बाळूमामांचा साक्षात्कार झालाय असे म्हणत लोकांचे भविष्य सांगू लागला. त्यामुळे अंधश्राळूंची त्याच्या भोवती गर्दी होऊ लागली. पैसा मिळू लागला. पण हि भामटेगिरी फार काळ चालत नाही. एका महिलेचे त्याने आर्थिक आणि लैंगिक शोषण करताच तिने पोलिसांकडे धाव घेतली आणि पोलिसांनी मग या भोंदू बाबाच्या मुसक्या आवळल्या.



मनोहर भोसले बोलण्यात पटाईत होता. डि.एड.पर्यंत शिक्षण घेतलेला मनोहर भोसले याला कुठेही नोकरी मिळाली नाही. नंतर त्याने नोकरीसाठी प्रयत्न देखील केला नाही. सुरुवातीच्या काळात त्याने भाजीपाला विक्रीचा व्यवसाय सुरु केला. करमाळा परिसरातील लहान मोठ्या गावात भाजीपाला विकून मनोहर भोसले आपला चरितार्थ चालवू लागला. मात्र या व्यवसायात त्याचे मन काही रमले नाही. मन रमले नाही म्हणून या व्यवसायात त्याचा जम बसला नाही. कमी श्रमात आणि कमी कालावधीत ...पान २ वर

## फिर्यादीलाच संशयाच्या भोवऱ्यात घेरले गोठ्यात झोपलेल्या वृद्धाला ठार मारले



कर्जत/धर्मानंद गायकवाड

आजकाल कुणावर भरोसा राहिलेला नाही. आपल्या जवळ असलेला माणूस कधी आपला केसाने गळा कापील याचा नेम नाही. काही लोक तर इतके शातीर असतात कि एखाद्याचा खून करून ते स्वतःच फिर्यादी बनतात आणि पोलिसांची तपासाबाबत दिशाभूल करीत असतात. कर्जतमध्ये म्हशीच्या गोठ्यात झोपलेल्या एका ७५ वर्षांच्या वृद्धाची मध्यरात्री चार इसमांनी गोठ्यात घुसून हत्या केली. पोलीस या प्रकरणी तपास करीत आहेत, पण पोलिसांना त्याच्या सोबत झोपलेल्या इसमाचाच संशय आहे. कारण त्याने दिलेल्या फिर्यादीत जी चार इसमांची स्टोरी सांगितलीय तीच संशयास्पद आहे. कारण त्या चौघांनी जर त्याच्या सोबत झोपलेल्याला मारले, तर त्यालाच केवळ जखमी करून का जिवंत सोडले? चौकशीत लवकरच या प्रश्नांची उत्तरे मिळतील, पण या हत्येतील गुड मात्र वाढलेले आहे. ...पान ६ वर

## उसन्या पैशांवरून दोघांमध्ये वाद झाला चिडलेल्या मित्रानेच मित्राचा खून केला



मयत रवींद्र



नवी मुंबई/एस. कुमार

मानवी जीवनाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पैशाची नितांत आवश्यकता आहे. पैशाशिवाय कुठलेही काम होत नाही. पैसा नसेल तर नातेवाईक सुध्दा विचारात नाही. पैसेवाल्यांना दुनिया सलाम करते. मग तो इमानदारीने कमावलेला असो की, बेईमानीने याचा कोणी विचार करत नाही. फक्त पैसा असणे गरजेचे आहे. या मोह, मायेच्या दुनियेत तर पैश्याला आणखीनच महत्त्व आले आहे. मरेपर्यंत पैसा माणसाच्या हातातून सुटत नाही. एवढं महत्त्व पैशाला प्राप्त झाले आहे. इतके लाख मोलाचे पैसे कोणी बुडवले किंवा ते परत केले नाही तर माणूस गप्प बसेल का? नाही बसणार! कारण बऱ्याच जणांचा घामाचा, कष्टाचा व मेहनतीचा पैसा असतो. अशाच एका माथेफिरूने पैशाचा तगादा लावणाऱ्या एका मित्राची अत्यंत क्रूरपणे हत्या केली आहे. त्या गुन्ह्याची ही हकीगत...

नवी मुबईच्या वाशी येथील एपीएमसी मार्केट सेक्टर १९ मधील माथाडी चौक ते पुनीत कॉर्नरकडे जाणारे रोडवरील, माथाडी चौकातून सुमारे ३०० मिटर अंतरावर उत्तरेस, धान्य मार्केटचे बाहेरील अंतर्गत रोडवरील वाहन पार्किगमध्ये दि.१२ सप्टेंबर रोजी ९:३०च्या सुमारास एका ...पान ६ वर

## आजारपणाचा झाला होता डोक्याला ताप पोराला नदीत फेकून बापच बनला साप

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर



मयत अफान

मुले हि देवाघरची फुले असतात. त्यामुळे पालकांनी त्यांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपायचं असतं. कारण भविष्यात तीच मुले आई वडिलांच्या म्हातारपणीचा आधार असतात. पण काही पालकांना हीच गोष्ट समजत नाही. मुलाचं आजारपण आणि त्यावर होणारा खर्च यामुळे वैतागलेल्या पालकांना आपले मुल नकोसे होते, तरी सुद्धा कुठलाही बाप आपल्या पोटच्या मुलाचा घात करण्याचा विचारही करू शकत नाही. मात्र इचलकरंजी जवळच्या कबनूरमध्ये राहणाऱ्या एका उलट्या काळजाच्या बापाने मुलाला केवळ फिटचा आजार असल्याने व त्याच्या उपचाराचा खर्च परवडत नसल्याने मुलाला नदीत फेकून त्याची हत्या केली.



आरोपी सिकंदर

सिंकदर मुल्ला हा आपल्या पत्नी शाहीन आणि दोन मुले अशा कुंटूंबासह इचलकरंची जवळील कबनूर येथील सनी कॉर्नर येथे भाडयाने राहयला आहे. त्याची घरची परिस्थीती अगदी बेताचीच होती. त्याला १० वर्षांची मुलगी आणि ५ वर्षांचा अफान हा मुलगा आहे. इचलकरंजी परिसरात सिंकदर ...पान ६ वर

## पत्नीवरच्या संशयामुळे बाप हैवान झाला मुलाला ठार मारून नरबळीचा बनाव केला



कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

रागीट स्वभावाच्या माणसाला जर एखाद्या गोष्टीचा संशय असेल तर तो स्वतःचे मानसिक संतुलन हरवून बसतो. अशावेळी त्याला रक्ताच्या नात्याचीही ओळख राहत नाही. कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा कापशी येथे राहणारा राकेश केसरे हा सुद्धा असाच रागीट आणि संशयी होता. त्याचा पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता. आपल्या दोन मुलांपैकी एक मुलगा आपला नाही असे त्याला सारखे वाटायचे. त्यामुळे त्या मुलावर त्याचा राग होता. एकेदिवशी त्याने काहीतरी त्याला काम सांगितले. पण त्या मुलाने त्याला नकार देताच त्याच्या संतापाचा कडेलोट झाला आणि राकेशने त्याला गळा दाबून ठार मारले आणि आपल्यावर संशय येवू नये म्हणून त्याने मृतदेह जिथे टाकला तिथे पूजा विधीचे काही समान पसरवून ठेवले आणि नरबळीचा देखावा केला. मात्र त्याच्या जबानीतील सततच्या विसंगतीमुळे पोलिसांनी त्याचा बनाव हाणून पडला आणि त्याला अटक केली.

शाहुवाडी तालुक्यातील वारणा कापशी येथे राकेश केसरे हा आपली पत्नी साधना आणि दोन मुलासह राहयला आहे. त्याने गेल्या आठ वर्षापूर्वी गावातीलच साधनाबरोबर प्रेमविवाह केला होता. पण अलिकडे तो साधनावर संशय घेत होता. राकेश हा स्वभावाने रागीट तापट आणि चिडका असल्याने साध्या क्षुल्लक कारणातून तो पत्नी साधना बरोबर वाद उकरून काढून भांडण करीत असे. त्यामुळे त्या दोघा नवरा बायकाचे कधीच पटत नव्हते. तो तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. तिचे बाहेर कुणाबरोबर तरी लफडे आहे असे त्याला वाटत होते. याच्यात दररोज भांडणे ही ठरलेलीच होती. त्यामुळे त्याचा सहा वर्षाचा ...पान ६ वर



आरोपी राकेश

CMYK

11 TO 17 OCTOBER 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 09/10/2021 10:31 PM Page 1



## पान १ वरून....

### जमीन घोटाळे करणारे स्वतः बरोबर...

अशी जमीन आहे. सदर मोकळ्या जमिनीत माती भरणीची गरज होती. त्यामुळे त्यांनी २०१५ मध्ये कामण येथील धीरज आत्माराम पाटील यांना ७५ लाखांत माती भरणीचे कंत्राट दिले व त्यांनी माझ्या जमिनीत माती भरण्याचे काम सुरु केले. त्यानुसार झालेल्या करार नुसार मी त्यांना ७५ लाख आणि दहा लाख असे ८५ लाख दिले. यावेळी करारात स्पष्टपणे लिहलेली कि माती भरणीच्या कामात महसूल खात्याने काही कारवाई केली, तर तो मला सर्व नुकसान भरपाई भरून देईल. मात्र २०१६ मध्ये माझ्या जमिनीत माती भरणा करण्याची रीतसर रॉयल्टी न घेतल्याने महसूल खात्याने मला ७० लाखांच्या दंडाची नोटीस पाठवली. याबाबत मी धीरज पाटील यांना कळवले असता त्यांनी मला २५ लाखांचा चेक दिला तो मी भरणा केला. याच दरम्यान मी बापाणे येथील माझी सर्व्हे क्रमांक ३९,४०, ४१ मधील २१९ गुंठे जमीन ९३,५००००० इतक्या किंमतीला व सर्व्हे न. ३६,३८,३९ मधील २१९ गुंठे जमीन १०,९५००००० रुपयांना विकण्याचा करार रमेश घोरकना, मिलिंद घरत, प्रवीण गवरे, हनीफ इब्राहीम शेख यांना विकण्याचे दोन साठे करार ७/१२/२०१७ रोजी केले. साठे करार झाल्याने वर नमूद खारीद दारांनी मला ५६००००० रुपये दिले. मात्र ठरलेल्या व्यवहारानुसार उर्वरित रक्कम मला न मिळाल्याने करार रद्द करीत असल्याची मी वकीलामार्फत त्यांना नोटीस पाठवली असे एकंदरीत प्रकरण आहे. मात्र त्यानंतर रमेश घोरकना आणि इतर खरीदराने मिळून बनावट कागदपत्रे बनवून तसेच सिद्दिकी यांच्या बनावट सह्या मारून खोटा साठे करार बनवला. त्यासाठी धीरज पाटील यांनी जो २५ लाखांचा चेक सिद्दिकी यांना दिला होता. त्याचा वापर करून सिद्दिकी यांनी २०१८ साली हि जमीन धीरज पाटील यांना विकली आणि त्याबदल्यात ते २५ लाख घेतले. असा बनाव करून सिद्दिकी यांची जमीन हडपण्याचा प्रयत्न केला. असे फिर्यादीमध्ये म्हटले आहे. विशेष म्हणजे बनावट साठे करारपत्रात दोन ऐवजी तीन चेकचा उल्लेख आहे. मुळ साठे करारावर फोटो न लावता सह्या केलेल्या असताना दोन ऐवजी तीन चेक दिल्याचे नमूद करून साठे करारावर फोटो लावून बनावट साठे करार करण्यात आला. तसेच शहाबुद्दीन शेख, सिद्धार्थ साहू व त्यांच्या गुंडांनी सिद्दिकीच्या मालकीच्या जमिनीवर जबरदस्तीने कब्जा करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सिद्दिकी यांनी फिर्यादीत म्हटले आहे. विशेष म्हणजे सिद्दिकी यांनी त्यांची सर्व्हे न.३६ हिस्सा न. १ मधील १२.४ गुंठे जमीन २०२० साली शशिकांत म्हात्रे व राजेश नंदा यांना विकली होती आणि तीच जमीन २०१८ मध्ये मी धीरज पाटील याला विकल्याचा तो दावा करून त्याबद्दलच मला २५ लाख दिल्याचे सांगत आहे. अशा पद्धतीने सिद्दिकी यांची माजी नगरसेवक घोरकना आणि मिलिंद घरत व त्यांच्या साथीदारांनी फसवणूक केल्याचा आरोप असून या प्रकरणी सिद्दिकी यांची वालीव पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवून घेण्यात आली नाही. म्हणून ते न्यायालयात गेले त्यानंतर न्यायालयाने मात्र या गंभीर प्रकरणाची दाखल घेऊन सिद्दीकिंची फसवणूक करणाऱ्या ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश पोलिसांना दिले. त्यानुसार वसई पोलीस ठाण्यात या ८ जणांविरुद्ध गुन्हा नोंदणी क्रमांक ३४८/२०२१ कलम ४२०,४४७,४४५,४६८,४७१,१२०ब नुसार गुन्हा दाखल करण्यात आलाय.

### अनैतिक संबंधातून रक्ताचा सडा ...

आरोपींना अटक केली आहे. पण क्षणिक सुखासाठी समाजात अशी रक्ताची नाती कलंकित होत आहेत. उज्वला रघुनाथ ठाणेकर या पतीशी होणाऱ्या सततच्या भांडणाला वैतागून आपल्या माहेरी कराड येथे निघून आल्या होत्या. त्याचा पती रघुनाथा हा नेहमी तिच्या चारित्र्यावर संशय घेवून तिच्याबरोबर भांडण काढून त्याना मारहाण करीत होता. त्यातच तिच्या पतीला तिचे विवाहबाहय संबंध हे तिच्या बहिणीचा नवरा सचिन निगडे याच्याबरोबर असल्याचे समजले होते. आपण घरी नसताना सचिन हा आपल्या घरी येवून उज्वला बरोबर मजा मारीत असतो हे त्यांना माहित झाले होते. म्हणून त्यांनी तिला मारहाण करून कराडला पिटाळले. सचिन बरोबर असलेले विवाहबाहय संबंध उज्वला हिने देखील मान्य केले होते. नवरा बायकोच्या भांडणातून तिने हूनच आता वेगळे राहण्याचा निर्णय घेतल्याने ती कराड येथे रुक्मिणी नगरात भाडयाने घर घेवून राहू लागली. उज्वला ही कराड येथे येवून राहू लागल्याने आता सचिनला बरे झाले होते. तो आता काही ना काही काम काढून उज्वलाला भेटायला तिच्या घरी येत होता. त्या दोघांचे संबंध आहेत हे उज्वलाच्या बहिणीला म्हणजे सचिन याची पत्नी ज्योती हिला माहित पडले होते. त्यामुळे ज्योती आणि सचिन याच्यामध्येही या कारणातून आता भांडणे होत होती. ज्योती ही तर या कारणासाठी आपल्या बहिणीला म्हणजे उज्वला हिला कारणीभूत धरत होती. उज्वला ही आपल्या नवऱ्याला सोडून येवून तिच्या नवऱ्याबरोबर चिकटली आहे. त्यामुळे आपला संसार उध्दवस्त होत आहे असे तिला वाटत होते. पण ती ही काही धुतल्या तांदळासारखे नव्हती. तिचे ही नवऱ्याच्या मागे सागर पवार याच्या बरोबर विवाहबाहय संबंध होते. ती सागर बरोबर तर उज्वला सचिनबरोबर असे त्याच्या प्रेमाचा त्रिकोण होता. तरींही ती उज्वलाबरोबर तिच्या घरी येवून तु माझ्या नवऱ्याबरोबर का संबंध ठेवतेस हे विचारीत होती. ती उज्वलाबरोबर भांडायला गेली की, सचिन पत्नी ज्योती बरोबर भांडत होता. त्या भांडणात ती त्याला सरळ सरळ म्हणत होती. तुला उज्वला आवडते तू तिच्याबरोबर मजा मारतोस तर मी माझा प्रियकर सागर याच्याबरोबर मजा मारली तर बिघडले कुठे असे प्रश्न विचारून ती त्याला जशास तसे उत्तर देत होती. त्यामुळे या कारणातून सचिन आणि ज्योती याच्यात देखील भांडण वाढले होते.ज्योती ही उज्वलाची धाकटी बहिण होती. सचिन हा तिच्या धाकटया बहिणीचा नवरा होता. त्यामुळे ज्योतीला तिचे आपल्या नवऱ्याबरोबर असणारे संबंध खटकत होते. ती सारखी येवून तिच्याबरोबर भांडण काढत होती. ती उज्वला हिला भांडणात तुला दुसरा कोणी मिळाला नाही का? तु तुझ्या नवऱ्याला सोडून माझ्या नवऱ्याबरोबर कशाला संबंध ठेवतेस. कधी कधी त्या दोघीत या कारणातून हाणामारी ही होती. सचिनला त्या दोघीचे भांडण सोडवू पर्यंत नाकी नऊ येत होते. ती त्याला आवडत असल्याने तो तिच्या घरी त्या संबंधासाठी सारखा येत होता. मेहुणी भावोजीचे नाजुक नाते एका वेगळ्या वळणार येवून पोहचले होते. बायकोपेक्षा मेहुणी बरी असे सचिनला वाटत होते.ज्योतीही सागर बरोबर असलेले संबंध तोडायला तयार नव्हती. त्यामुळे सचिन ही वैतागलेला होता. या प्रेम त्रिकोणचा शेवट हा उज्वलाच्या खूनात झाला एवढे मात्र खरे.. शुक्रवार दि.२४ सप्टेंबर रोजी उज्वला हिने सचिनला फोन करून मी कोरोना लस घेणेसाठी जात आहे असे सांगितले. त्यानंतर दुपारी ३ ते ४च्या दरम्यान सचिन हा तिला भेटायला नेहमीप्रमाणे आला. त्यावेळी त्याला तिच्या घरचा दरवाजा बंद दिसला त्याने हाका मारून आत ती आहे का हे पाहिले परंतू तो हाका मारत असताना त्याला आतून कोणताच प्रतिसाद मिळाला नाही, म्हणून त्याने खिडकीतून आत पाहिले असता त्याला उज्वला ही रक्ताच्या थारोळ्यात बेडवर निपचिन पडली असल्याचे दिसले. त्याने ही घटना शेजाऱ्यांना सांगितली. शेजारी ही जमले त्यावेळी त्याने या घटनेची माहिती कराड शहर पोलीस स्टेशनला दिली. पोलीस येईपर्यंत त्याने कुलूपावर दगड मारून कुलूप तोडले आणि आत जावून पाहिले तर उज्वला हिचा गळा धारदार शस्त्राने चिरला होता. तिचा गळा चिरला असल्याने गळ्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला होता. बेडवर ही रक्त पडले होते. पोलीस आल्यावर त्यांनी घटनेचा पंचनामा सुरू केला. या घटनेची माहिती त्यांनी सचिन निगडे याच्याकडून घेऊन तपासला सुरूवात केली. पोलीसांनी मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी कराड येथील शासकीय रुग्णालयात पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना सचिन निगडे याच्याकडे चौकशी करत असताना वेगवेगळी माहिती मिळत होती. त्याने आपले अनैतिक संबंध हे मयत उज्वलाशी असल्याचे कबुल केले. परंतू मी तिचा खून केला नाही असे त्याने पोलीसांना सांगितले. या घटनेचा पोलीस तपास करीत असताना मयत उज्वलाच्या संबंधीत नातेवाईकांची ते चौकशी करत होते. या घटनेचा तपास स्थानि गुन्हे शाखेचे पोलीस ही करीत होते. त्यांनी मयत उज्वलाची बहिण म्हणजे सचिन निगडे याची पत्नी ज्योती हिच्याकडे ही चौकशी आरंभली होती. पोलीसांच्या उलट सुलट प्रश्नासमोर ती गोंधळलेली दिसत होती. पोलीसांना तिच्यावरच संशय होता. तिचे ही नवरा सागर पवार याच्याबरोबर अनैतिक संबंध होते. पण आपल्या बहिणीने आपल्या नवऱ्यालाच नादाला लावल्याचा राग तिच्या मनात होता. हे तिच्या बोलण्यावरून पोलीसांना समजले होते. त्यातून तिने उज्वलाबरोबर बऱ्याच वेळेला भांडणे ही केले होते. त्यावेळी मयत उज्वलाने तिला खडासावून मी तुझ्या नवऱ्याला नादी लावले आहे ना तुला काय करायचे ते कर. तुझ्या नवऱ्याचे आणि माझे संबंध कधीच तुटणार नाहीत असे ती तिला म्हणाली होती. म्हणून ज्योती ही उज्वलावर चिडली होती. त्यातच सचिन ही उज्वलाचा नाद सोडायला तयार नव्हता. त्यामुळे तिला काय करावे काय नको असे झाले होते. उज्वलालाच आपल्या मार्गातून बाजुला केले तर सचिन आपल्या पासून दूर जाणार नाही असे तिने प्रियकर सागर पवार याला सांगितले. मागे एकदा तिने उज्वलाला आणि सचिनला ते संबंध करताना रंगेहात पकडले होते. त्यामुळे ती आणखीणच जास्तच चिडली होती. तिने प्रियकर सागर पवार याच्या मदतीने बहिण उज्वलाला संपविण्याचे ठरविले. शुक्रवार दि.२४ सप्टेंबर २०२१ च्या दुपारच्या सुमारास ज्योती आणि सागर पवार हे दोघे नदी काठच्या बाजूने ऊसाच्या शेतातून कोणाला काही समजू नये अशा तऱ्हेने उज्वलाच्या घरात शिरले. त्यावेळी उज्वला ही कोरोना लस घेवून येऊन झोपली होती. तिला त्याने झोपेतून उठविले. समोर बहिण ज्योती आणि तिचा प्रियकर सागर असल्याचे बघून तिने काय ते ओळखले. रागाच्या भरात असणाऱ्या ज्योती हिने उज्वलाला तू माझ्या नवऱ्याबरोबर का संबंध ठेवतेस? असे विचारत तिच्याबरोबर भांडायला लागले. त्यावेळी त्या दोघांनी तिला मारहाण ही केली. त्या मारहाणीत सागर याने उज्वलाचा गळा आपल्या कडील चाकूने चिरला. गळ्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाल्यावर उज्वला खाली बेडवर पडली.काही क्षणात ती निपचिप होत गार झाली. तिचा मृत्यू झाल्याचे लक्षात येताच त्या दोघांनी पुढच्या दरवाज्याला आतून कडी घालून मागील दरवाज्याने पलायन केले. ज्योतीने आपल्या गुन्हयाची कबुली दिल्यावर पोलीसांनी या गुन्हयातील, तिचा प्रियकर सागर पवार याला ही ताब्यात घेतले. त्याने ही आपला गुन्हा कबुल केला. सचिन निगडे याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी उज्वला रघुनाथ ठाणेकर (वय ३२) हिच्या खून प्रकरणी तिची बहिण ज्योती सचिन निगडे (वय २८) आणि तिचा प्रियकर सागर पवार (वय २८) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान सागर पवार याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू पोलीसांनी जप्त केला. डीवायएसपी. डॉ.रणजीत पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी.आर.पाटील, स.पो.नि. अमित बाबर याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अर्जुन चोरगे यांनी आपल्या सहकाऱ्यासह केला.

### भावाच्या हत्येमुळे 'तो' सुडाने पेटला...

धम्मप्रिय उर्फ धम्मा मनोहर सुरळकर, समिर बांगर, आश्विन बांगर व शुभम खंडेराव अशी त्यांची नावे होती. एकेदिवशी धम्माच्या वडीलांसोबत कैफचा कोणत्यातरी कारणावरुन वाद झाला. तो वाद शिगेला पोहोचल्यामुळे कैफने धम्माच्या वडीलांना बेदम मारहाण केली होती. या मारहाणीत धम्माच्या वडीलांना जबर दुखापत झाली होती. या मारहाणप्रकरणी १८ फेब्रुवारी २०२० रोजी भुसावळ बाजारपेठ पोलिस स्टेशनला अदखलपात्र गुन्ह्याची नोंद घेण्यात आली होती. अंथरुणाला खिळून पडलेल्या वडीलांना पाहिले म्हणजे धम्माच्या मनात कैफ विषयी चिड निर्माण होत असे. या घटनेनंतर दिवसामागून दिवस जात होते. काळ पुढे पुढे सरकत होता. धम्माच्या मनात कैफ विषयी प्रतिशोधाची आग देखील धगधगत होती. ती धग कायम होती. कैफ समोर दिसला म्हणजे धम्माचे तरुण रक्त सळसळत होते. एके दिवशी धम्माने त्याचे मित्र समीर बांगर, अश्विन बांगर व शुभम खंडेराव यांच्यासमोर मनातील बदल्याची आग प्रकट केली. आपल्याला काहीही करुन कैफचा गेम करायचा आहे असे धम्माने त्याच्या मित्रांना म्हटले. वय कमी आणि जबाबदारीची जाणीव नसलेल्या धम्माच्या मित्रांनी त्याच्या प्रतिशोधाच्या आगीत उडी घेतली. धम्मा म्हणेल ती पुर्व दिशा असे म्हणत त्यांनी त्याच्या आवाहनाला प्रतिसाद देत कैफचा काटा काढण्याचे ठरवले. ११ ऑक्टोबर २०२० रोजी कैफचे वडील व भाऊ फुटपाथवर कपडे विकून घरी परत आले होते. रात्रीचे जेवण आटोपून ते जवळच असलेल्या मदीना मशीदजवळ बसले होते. त्याचवेळी धम्मा सुरळकर, समिर उर्फ कल्लु बांगर, आश्विन उर्फ गोलु बांगर, शुभम खंडेराव व त्यांच्यासोबत एक आनोळखी साथीदार असे सर्वजण मोहम्मद कैफच्या दिशेने धावत आले. कुणाला काही समजण्याच्या आत त्यांनी मोहम्मद कैफ यास लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण सुरु केली. या बेदम जिवघेण्या हल्ल्यात धम्माने त्याच्या हातातील लोखंडी रॉडच्या सहाय्याने मोहम्मद कैफ याच्या डोक्यावर मारहाण सुरु केली. या मारहाणीत कैफ जबर जखमी झाल्यानंतर मुख्य सुत्रधार धम्मा व त्याच्यासोबतचे सर्व साथीदार पलायन करण्यात यशस्वी झाले. कैफ जागीच ठार झाला होता. या घटनेप्रकरणी मयत कैफ याचा भाऊ समीर याने दिलेल्या फिर्यादीनुसार भुसावळ बाजारपेठ पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.नं. ८८२/२०२० भादवि ३०२, ३२३, ५०६, १४३, १४८, १४९ नुसार दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पुढील तपासात या गुन्हांतील मुख्य आरोपी धम्मप्रिय उर्फ धम्मा मनोहर सुरळकर व त्याचे साथीदार समीर उर्फ कल्लु अजय बांगर, आश्विन उर्फ गोलु अजय बांगर, शुभंम पंडीत खंडेराव या सर्वांना अटक करण्यात आली. अटकेनंतर न्यायालयाच्या आदेशाने सर्वांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली. आपल्या भावाचा खून करणाऱ्या धम्मप्रिय सुरळकर याला जिवंत सोडणार नाही अशी कैफचा भाऊ समीर याने दफनविधीच्या वेळीच शपथ घेतली होती. जेलमधे गेलेला मुख्य आरोपी धम्मा जेलच्या बाहेर कधी येतो याकडे समीर बारकाईने लक्ष ठेवून होता. या गुन्ह्यातील इतर आरोपी जामीनावर बाहेर आले होते मात्र मुख्य आरोपी धम्मा अद्याप जेलमधेच होता. ११ ऑक्टोबर २०२० च्या या घटनेनंतर तब्बल अकरा महिन्यांनी २१ सप्टेबर २०२१ रोजी धम्माचा जामीन होणार असल्याची कुणकुण मयत कैफचा भाऊ समीर यास लागली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी २२ सप्टेबर रोजी धम्माचा वाढदिवस होता. त्यामुळे जामीनावर सुटलेल्या धम्माचा वाढदिवस जल्लोषात साजरा करण्याचे नियोजन त्याच्या बहिणींनी केले होते. मात्र जामीनावर सुटल्यानंतर त्याच दिवशी त्याचा गेम करण्याचे नियोजन समीर शेख याने साथीदारांच्या मदतीने केले होते. त्याने पुर्ण तयारीनिशी तसे नियोजन केले होते. धम्माचे वडील मनोहर दामू सुरळकर हे जामीनासाठी लागणारे कागदपत्र संकलित करण्याकामी लागले होते. त्यांच्या सर्व हालचालींवर समीरचे लक्ष होते. २१ सप्टेबर २०२१ रोजी धम्मप्रिय सुरळकर याचा जामीन न्यायालयाने मंजुर केला. जामीन मंजुर झाल्याबाबतचे कागदपत्र घेऊन मनोहर सुरळकर व त्यांचे तिघे मित्र असे चौघेजण जळगाव उप कारागृहात पोहोचले. सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास धम्मप्रियची न्यायालयातून जामीनावर सुटका झाली. मात्र न्यायालयाच्या भिंतीआड तो सुरक्षीत होता. तो बाहेर येताच त्याला हायसे वाटले. मात्र त्याचा हा आनंद फार वेळ टिकू शकला नाही. समीर त्याचा काळ बनून महामार्गावर साथीदारांसह टपून बसलेला होता. धम्माच्या जिवनातील २१ सप्टेबर हा अखेरचा दिवस होता. हे केवळ नियतीलाच ठाऊक होते. दुसऱ्याच दिवशी तो वयाच्या विशीत पदार्पन करणार होता. मात्र नियतीने त्याला विशीत जाऊ दिले नाही. सायंकाळी चौघे जण धम्मप्रियला सोबत घेत जळगावहून भुसावळच्य दिशेने दोन मोटारसायकने घराकडे निघाले. एका मोटार सायकलवर दोघे तर दुसऱ्या मोटार सायकलवर तिघे असे पाच जण भुसावळकडे मार्गक्रमण करत होते. वाटेत नशिराबाद गावानजीक पुलाखाली सर्व पाच जण सिगारेट ओढण्यासाठी थांबले. त्याच वेळी काही कळण्याच्या आत पलीकडून काही जण त्यांच्या दिशेने मोटार सायकलवर चाल करुन आले. आलेल्या तरुणांनी धम्मप्रिय व त्याच्या वडीलांच्या डोळ्यात मिरचीची पुड फेकली. डोळ्यात मिरचीची पुड फेकल्यामुळे दोघांचे डोळे चुरचुर करण्यास लागले. कुणालाच काही समजत नव्हते. दरम्यान दोघांनी पिस्टलने गोळीबार सुरु केला. या गोळीबारात धम्मप्रियच्या छातीत व डोक्यात गोळी लागली. जिव वाचवण्यासाठी तो काही अंतर पळाला मात्र त्याला पळून जाण्याची संधी देण्यात आली नाही. हल्लेखोर तरुणांनी त्याच्यासह त्याचे वडील मनोहर सुरळकर यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. त्यात धम्मप्रिय जागीच ठार झाला तर त्याचे वडील जखमी झाले. हा थरार बघून सुरळकर पिता पुत्रांसोबत असलेले तिघे भितीपोटी व जिवाच्या आकांताने पळून जाण्यात यशस्वी झाले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर अप्पर पोलिस अधीक्षक चंद्रकांत गवळी, उपविभागीय पोलिस अधिकारी सोमनाथ वाघचौरे यांच्यासह नशिराबाद पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक अनिल मोरे व त्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. याप्रकरणी नशिराबाद पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. १४७/२१ भा.द.वि. ३०२, ३०७, ३४, आर्म अॅक्ट ३ (२५), ३ (२७), ४(२५) नुसार दाखल करण्यात आला. तपासाअंती पोलिस पथकाने समीर व रियान त्या दोघा तरुणांना ताब्यात घेत अटक केली. यातील समीर हा कैफ याचा भाऊ आहे. अटकेतील दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सुरुवातीला अटकेतील दोघांना पोलिस कोठडी सुनावली. दरम्यान अधिक तपासात तिसरा संशयीत आवेश शेख बिस्मिल्ला याला देखील अटक करण्यात आली. तिघे संशयीत सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

### खून करून आरोपी झाले गुजरातला...

गुजरात पोलिसांनी तपासात आघाडी घेत प्रकरणाचे गूढ तर उकललेच; शिवाय सर्वच्या सर्व मारेकरी गजाआड केले. यूपी पोलिसांनी आरोपींची माहिती देणाऱ्यास पाच लाखाचे इनाम घोषित करून २४ तासही उलटत नाहीत तोच गुजरात पोलिसांनी आरोपींना अटक करत ते इनाम खिशात घातले.. उत्तर प्रदेशमधील हिंदु समाज पार्टी गेली काही वर्षे सतत चर्चेत होती ती पार्टीचे अध्यक्ष कमलेश तिवारी यांच्याकडून सातत्याने होत असलेल्या जहाल वक्तव्यांमुळे! तिवारी हे कट्टर हिंदुत्ववादी नेते. आधी ते हिंदू महासभेत होते. मात्र, तिथे मतभेद झाल्यानंतर त्यांनी स्वतःची स्वतंत्र संघटना स्थापन केली. हिंदू समाज पार्टी. मात्र, या पार्टीने सातत्याने भाजपवर टीका करून एकीकडे भाजपची नाराजी ओढवून घेतली तर दुसरीकडे अत्यंत जहाल वक्तव्यं करून एका धर्मविशेष गटाचा रोष ओढवून घेतला. कमलेश तिवारी हे बेधडक व्यक्तीमत्व असल्यामुळे ते कोणाचाही विधिनिषेध न बाळगता बिनधास्त बोलत असत. त्यांची वक्तव्ये त्यामुळेच वादग्रस्त ठरत असत. यातून सन २०१५ साली समाजवादी पार्टीचे नेते आझम खान यांच्या एका टीकेला प्रत्युत्तर देताना तिवारी यांनी दुसऱ्या धर्मविशेष गटाच्या प्रेषितांबाबत जाहीर वादग्रस्त वक्तव्य केले. त्यावरून यूपीत जनक्षोभ उसळला. अखेर, यूपी राज्य सरकारने दुसऱ्याच दिवशी तिवारी यांना गजाआड केले व त्यांना रासुका लावला. तिवारी यांनी प्रेषितांवर भाष्य केल्यामुळे अन्य समाजघटक दुखावलेला होता. पण कायद्याने त्याचे काम केल्यावर त्या समाजातील बरीच मंडळी शांत झाली. मात्र, काही असंतुष्ट गटांमध्ये खदखद होतीच. या खदखदीला खतपाणी घालायचे काम त्या समाजातील धर्मनेत्यांनी केले. जो कोणी तिवारी यांचे मस्तक धडावेगळे करील त्याला पन्नास लाख रुपये बक्षीस देण्याची घोषणा करण्यात आली. यामुळे वातावरण पुन्हा बिघडले. सरकारने तिवारींच्या सुरक्षेत वाढ केली. त्यांना २४ तास सशस्त्र पोलीस संरक्षण पुरविण्यात आले. नेमके याच वेळी दुबईतून कोणीतरी तिवारींची हत्या करण्याचा कट आखला. दि. १८ आक्टोबर २०१९ रोजी कमलेश तिवारी हे लखनौमधील आपल्या घरात कोणाची तरी वाट पाहत बसलेले होते. सध्या ते जामिनावर सुटून आलेले असल्यामुळे आपल्या घरातच होते. ते नेते असल्यामुळे घरातील एका खोलीत त्यांनी एक छोटेसे जनसंपर्क कार्यालयही थाटलेले होते. या कार्यालयातच ते बसलेले होते. घरात यावेळी त्यांची पत्नी आणि एक नोकर होते. त्यांच्या सुरक्षिततेसाठी तैनात केलेल्या पोलीस दलात एव्हाना यूपीत सत्तारुढ झालेल्या नव्या सरकारने चांगलीच कपात केलेली होती. आता अवघे दोन पोलीस कर्मचारी तिवारी यांच्या सुरक्षिततेसाठी तैनात होते. त्यातील एक जण नेमका आदल्या दिवशीच घरगुती कारणासाठी रजेवर गेलेला होता तर दुसरा बंदूकधारी कर्तव्यावर असला तरी तो तळमजल्यावरील दुसऱ्या एका खोलीत बसलेला होता. तिवारी यांच्या जीवाचा धोका कमी झालेला होता का ? नाही!... त्यांना अजूनही तिरसट लोकांच्या धमक्या येतच होत्या. पण यूपीत नव्याने आलेल्या सरकारला वाटत होते की, २०१५ साली तिवारींनी वक्तव्य केलं होतं. आता २०१९ सुरू आहे. या चार वर्षांत तिवारींवर कोणी हल्ला केलेला नाही, तर आता पुढे त्यांच्यावर हल्ला होण्याची शक्यता नाही! त्यामुळे त्यांनी तिवारींच्या सुरक्षेत मोठी कपात केली. या गोष्टींची नोंद दुबईत घेतली जात होती. दोनच महिन्यांपूर्वी दुबईत कामाला असलेला एक जण गुजरातमधील सुरतेत सुट्टीवर आला होता. त्याने सुरतेत चार तरुण तयारीतच ठेवलेले होते. त्यांच्या आता गुप्त बैठका होऊ लागल्या. या बैठकांमध्ये कट शिजला, तिवारींचे काम तमाम करण्याचा! पण या तरुणांनी आपली योजना कार्यान्वित करण्यासाठी जी पद्धत वापरली, ती पोलिसांनाही चक्रावून टाकणारी होती. या पाचपैकी दोन तरुणांनी आपली ओळख लपवली. नवीन नावं धारण केली आणि तिवारी यांच्या हिंदू समाज पार्टीच्या गुजरातमधील कार्यकर्त्यांशी ओळख वाढवली. हळूहळू सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांनी यूपीतील कार्यकर्त्यांशी आपली जान पहचान करून घेतली. बनावट गुजराती हिंदू नावे धारण केल्यामुळे हिंदू समाज पार्टीत लवकरच कार्यकारणीवरील पदाधिकारी त्यांच्या ओळखीचे झाले. या पदाधिकार्यांना गुजरातेत संघटना वाढवायची होती. नेमकी ही बाब हेरून या दोन तरुणांनी आपली उपयुक्तता व्यक्त केली आणि गुजरातमध्ये संघटनावाढीसाठी धन, संपर्क आदी सर्व प्रकारची मदत देण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे खुश झालेल्या पदाधिकार्यांनी संघटनेचे अध्यक्ष कमलेश तिवारी यांच्याकडे त्यांची शिफारस केली. तिवारी आता व्यक्तिगतरित्या या तरुणांशी फोनवरून बोलू लागले. सोशल मीडियावरून संपर्क ठेवू लागले. हे दोन्ही तरुण आपल्या कामाचे आहेत, हे लक्षात येताच त्यांनी एके दिवशी या दोघांनाही लखनौला भेटायला बोलावले. भेटीचा दिवस नक्की झाल्यावर हे दोन्ही तरुण सुरतेहून ट्रेनने लखनौला आले. तेथील एका हाटेलमध्ये ते उतरले. यावेळी हाटेलच्या रजिस्टरमध्ये त्यांनी आपली खरी नावे नोंदवली आणि आधारकार्डच्या छायांकीत प्रतीही सादर केल्या. त्यांनी सोबत कपडेलत्ते असलेल्या दोन बगा सोबत घेतलेल्या होत्या. हाटेलमधील खोलीत शिरल्यावर त्यांनी तो दिवस त्या रुममध्येच घालवला. जेवले आणि झोपी गेले. दुसऱ्या दिवशी ते हाटेलमधून बाहेर पडले. यावेळी त्यांच्यापैकी एका तरुणाच्या हातात मिठाईचा पुडा होता. सुरतेची मिठाई प्रसिद्ध आहे. तिवारींना दिवाळीनिमित्त भेट देण्यासाठी त्यांनी हा पुडा सोबत घेतला होता. यावेळी दोघांनीही भगव्या रंगाचे झब्बे अंगात घातलेले होते. थोड्याच वेळात ते दोघेही चालतच तिवारी यांच्या घरात पोहोचले. या दोघांना पाहून तिवारींना खूप आनंद झाला. ही त्यांची प्रत्यक्षातील पहिलीच भेट होती. तिवारींनी या दोन्ही तरुणांची ओळख आपल्या पत्नीशी करून दिली. चहा-पाण्याचा कार्यक्रम अगदी हसत खेळत झाला. दोघेही तरुण हे हिंदुत्ववादी विचारांनी भारलेले असल्याचे तिवारी यांना वाटले. आता महत्वाच्या मुद्याला हात घालायचा होता. त्यासाठी एकांत हवा झाला. सारं काही आलबेल आहे, असे वाटल्याने तिवारींची पत्नी स्वयंपाकघरात दुपारच्या जेवणाचा बंदोबस्त करायला गेली. नोकर विड्याची पाने आणि सिगारेटी आणायला घरातून बाहेर पडला. दोन्ही तरुण याच संधीची वाट पाहत होते. त्यांनी रागरंग पाहून तिवारींना भेट देण्यासाठी म्हणून सोबत आणलेल्या पिशवीतून मिठाईचा डबा बाहेर काढला. मिठाईचा डबा पाहून तिवारीही आतील गुजरातच्या मिठाईची चव चाखण्यासाठी उत्सुक झाले. पण डबा उघडला मात्र... आतमधून एक गावठी कट्टा आणि चाकू बाहेर पडला. हे काय भलतेच? तिवारींना काही कळायच्या आत दोघांपैकी एका तरुणाने कट्टा उचलून तिवारींवर गोळी झाडली तर दुसऱ्याने चाकू उचलून तिवारींच्या गळ्यावर, छातीवर वार करायला सुरूवात केली... तब्बल पंधरा वार करूनच तो थांबला... तिवारींवर हल्ला झालाय, हे समजायला घरच्यांना, शेजारच्या लोकांना थोडा वेळ लागला. ते गोळा होईपर्यंत दोघेही हल्लेखोर फरार झाले होते. इकडे एकच हलकल्लोळ माजला. तिवारींना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले पण तिथे दाखल होईपर्यंत त्यांची प्राणज्योत मालवलेली होती...लखनौ शहरात आता कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची मोठी भीती निर्माण झाली. हिंदू समाज पार्टीचे शेकडो कार्यकर्ते तिवारी यांच्या घरासमोर जमले आणि त्यांनी घोषणाबाजी व आक्रोश आंदोलन करण्यास सुरूवात केली. त्यांची समजूत काढता काढता लखनौ पोलिसांची चांगलीच दमछाक झाली. इकडे ते दोघे हल्लेखोर हाटेलवर परतले. खोलीवर जाऊन त्यांनी कपडे बदलले. झब्ब्याच्या खिशात लपवून आणलेला रक्तरंजित चाकू त्यांनी रुममधील बाथरुममध्ये ठेवला आणि सुरतहून येताना सोबत आणलेले सामान रुमवरच सोडून ते दोघेही हाटेलबाहेर पडले. जरा जाऊन येतो, असे सांगून ते सटकले. त्यांचे सामान रुमवरच असल्यामुळे हाटेल व्यवस्थापनाला आक्षेप असण्याचे काही कारण नव्हते. मात्र, तो दिवस पूर्ण मावळून दुसरा दिवस मावळत आला तरी हे तरुण रुमवर न आल्यामुळे हाटेल व्यवस्थापकाला संशय आला. तोवर तिवारींची हत्या झाल्याची बातमी पूर्ण देशात पसरलेली होती. न्यूज चनेल्सवर तिच बातमी बारकाव्यांसह दाखवली जात होती. एव्हाना तिवारींच्या घराजवळील सीसीटीव्ही फूटेज पोलिसांना उपलब्ध झालेले होते. त्यात भगवे झब्बे धारण केलेले हे तरुण दिसून येत होते. हे फूटेज टीव्हीवर झळकू लागले, तसे हाटेल व्यवस्थापन अस्वस्थ झाले. आपल्या हाटेलमध्ये उतरलेल्या तरुणांनीही त्या दिवशी, म्हणजे काल, भगवे झब्बेच घातलेले होते ! आणि आता ते गायब झालेले आहेत...झालं! हाटेल व्यवस्थापकाच्या पायाखालची जमीनच सरकली. त्याने नोकरांना बोलावून ती रुम उघडली आणि आतमध्ये भगवे झब्बे व रक्ताने माखलेला चाकू पाहून तो काय समजायचे ते समजला !... लखनौ पोलीस हाटेलमध्ये पोहोचले. त्यांनी तत्काळ पंचनामा केला. फारेन्सिक एक्सपर्ट आले. विशेष म्हणजे तोवर इसिसच्या दोन तरुणांनी तिवारींवरील हल्ला आपणच केल्याचा तोवर दावा केल्यामुळे हे प्रकरण एटीएसकडे गेले होते. हाटेलचा ताबा आता यूपी एटीएसने घेतला. हाटेलमधील रजिस्टर तपासण्यात आले. तिथे त्या तरुणांनी आपली खरी नावे लिहिलेली होती व पत्तेही खरे लिहिलेले होते. ते सुरतचे होते. आधारकार्डच्या छायांकीत प्रती जोडलेल्या होत्या. एटीएसने ते सर्व साहित्य ताब्यात घेतले. तिवारींच्या खोलीत मिठाईचा रिकामा पुडा सापडलेला होता. त्यावर सुरतमधील दुकानाचा पत्ता व लोगो होता. यूपी एटीएसने तत्काळ गुजरात एटीएसशी संपर्क साधला. तिवारी हल्ल्यातील मारेकरी गुजरातचे आहेत, हे समजल्यावर गुजरात एटीएस सावध झाले. त्यांनी सुरतच्या मिठाईच्या दुकानात धाव घेतली. तेथील सीसीटीव्ही फूटेज त्यांनी ताब्यात घेतले. सुदैवाने मिठाईच्या पुड्यात बिलही होते, त्या बिलावर मिठाई विकत घेतल्याची तारीख व वेळ नोंदवलेली होती. त्या विशिष्ट वेळचे सीसीटीव्ही फूटेज हाती लागल्यावर एटीएसला त्या फुटेजमध्ये दोन तरुण मिठाई विकत घेताना दिसले. खबरींच्या माध्यमातून तत्काळ त्या तरुणांची ओळख पटविण्यात आली आणि गुजरात एटीएसने त्याच रात्री त्यातील एका तरुणाच्या घरी धाड टाकली. तो तरुण घरीच होता. एटीएस पथक दारात आलेले पाहून त्याची बोबडी वळली. एटीएसने त्याला बोलते केले. हा तोच तरुण होता जो दोन महिन्यांपूर्वीच दुबईहून सुरतेत आलेला होता. लखनौ येथे गेलेले दोन मारेकरी अजून सुरतेला परतलेले नव्हते. पण कटातील अन्य दोघेजण सुरतेतच होते. मध्यरात्र झालेली होती. एटीएसने त्या तरुणाला सुरतेतील त्याच्या त्या दोन मित्रांना आताच्या आता आपल्या घरी बोलावण्यास सांगितले. त्या तरुणाने तसे केले. अर्जट काम आहे, असे सांगून त्याने दोघाही मित्रांना घरी बोलावले. एटीएसचे पथक घरातच दडून बसलेले होते. हे दोघेही मित्र घरी येताच, एटीएसने त्या दोघांनाही उचलले... अशा रितीने कटातील तीन जण ताब्यात आले... पण लखनौ येथे गेलेल्या दोन मारेकर्यांचा अजून थांगपत्ता लागत नव्हता. गुजरात एटीएसला आता यूपी एटीएसने त्या दोन्ही मारेकर्यांचा तपशील पुरवला. त्यानुसार एटीएस दोघांच्याही घरी जाऊन आले .पण ते दोघेही अजून परतलेले नव्हते...एटीएसने माहिती काढायला सुरूवात केली. त्यांना हे समजले की, दोन्ही फरार मारेकर्यांजवळ खूप कमी पैसा शिल्लक आहे. याचा अर्थ लपून बसण्यासाठी त्यांना अजून पैसे लागणार. त्यासाठी ते घरच्यांना फोन करणार. एटीएसने हुशारीने दोन्ही मारेकर्यांच्या पूर्ण कुटुंबियांचे फोन टपिंगवर ठेवले...महिना उलटला तरी हाती काहीच येईना...एटीएस अन्य मार्गानेही तपास करतच होती. पण सुदैवाने एके दिवशी एका मारेकर्याचा आपल्या बायकोला फोन आला. पैसे संपलेत. आणखी हवेत. पाठवून दे. बायको त्याला म्हणाली की, तू सरेंडर कर. पोलिसांना तुझ्याबाबत सर्व समजलंय. पण तो तरुण ऐकला नाही. त्याने बायकोला सांगितले की त्या दोन्ही मारेकर्यांनी तिवारींची हात्या केल्यावर यूपी सोडली आणि ते नेपाळला पळाले. पण हातात खूप पैसे नव्हते. म्हणुन ते पुन्हा यूपीत आले व तिथून राजस्थानात शिरले. आता ते राजस्थान-गुजरात सीमेवरील एका गावात असून तिथे अमूक एका मित्राघरी उतरले आहेत. तिथेच पैसे पाठवण्याची व्यवस्था कर. गुजरात एटीएसने हे संभाषण चोरून ऐकले आणि त्यांनी सांगितलेल्या गावात फिल्डिंग लावली. ठरल्याप्रमाणे पैसे घेण्यासाठी दोघेही मारेकरी तिथे येताच एटीएसच्या पथकाने झडप घालून दोघांनाही ताब्यात घेतले... इकडे महिना झाला तरी मारेकरी सापडत नाहीत, हे पाहून यूपी पोलिसांनी मारेकर्यांची माहिती देणाऱ्यास पाच लाखाचे इनाम लावले. पण हे इनाम लावल्यानंतर २४ तासही उलटत नाहीत तोच गुजरात एटीएसने दोन्ही मारेकरी ताब्यात घेऊन कर्तृत्वाचा झेंडा रोवला... गुजरात एटीएसने अगदी सुरूवातीपासूनच तपासात आघाडी घेतली. पाचही आरोपींना गुजरात एटीएसनेच अटक केली. इतकेच नव्हे तर इसिसच्या ज्या दोन हस्तकांनी तपास भरकटावा यासाठी तिवारी यांचावरील हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती, त्या दोघांनाही गुजरात एटीएसने अटक केली. यामुळे यूपी पोलिसांच्या नाकर्तेपणाची चर्चा रंगून पोलिसांना समाजाकडून टोमणे सहन करावे लागले. गुन्हा लखनौमध्ये घडलेला असतानाही सुरत पोलिसांनी संपूर्ण प्रकरणाचा फडशा पाडल्यामुळे, त्यांची सर्वत्र वाहवा झाली... अशा प्रकारे कमलेश तिवारी हत्या प्रकरण धसास लागले. शेवटी यूपी पोलिसांनी एक काम केले व ते म्हणजे तिवारी यांच्या हत्येसाठी पन्नास लाखाचा पुरस्कार घोषित करणाऱ्या धर्मनेत्याला चिथावणीखोर वक्तव्य केल्याप्रकरणी अटक केली.

### बाळूमामाच्या नावाने मनोहर मामाचं ...

अधिकाधिक पैसे कसे मिळतील याचा आराखडा मनोहर भोसले याने मनाशी बांधण्यास सुरुवात केली. बाळूमामाचा साक्षात्कार झाल्याचे त्याने एके दिवशी जाहीर केले. बाळूमामाच्या नावाने चांगभल या नावाने कलर्स मराठी या चॅनलवर सुरु असलेल्या मालिकेचे सुमारे आठशे भाग प्रसारीत झाल्यामुळे बाळूमामाच्या नावाची मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी झाली होती. त्याच बाळूमामाच्या नावाचा वापर मनोहर भोसले याने सुरु केला. आपल्याला बाळूमामाचा साक्षात्कार झाल्याचे सांगून त्याने लोकांना आपल्याकडे आकर्षित केले. लवकरच मनोहर भोसले याचे नामकरण मनोहरमामा असे झाले. कांबळे वस्ती जावून तो लोकांचे भविष्य सांगू लागला. मात्र तेथील लोकांशी त्याचे मतभेद झाले. त्यामुळे त्याने एका मठाचा आसरा घेतला. त्या मठात जावून कथित मनोहरमामा लोकांना भविष्य सांगू लागला. अमावस्येच्या रात्री आपल्याला बाळूमामांचा साक्षात्कार झाल्याचे तो तेथील लोकांना सांगू लागला. ग्रामीण भागातील काही अंधश्रद्धा बाळगणाऱ्या व जोपासणाया लोकांनी त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. त्याने लोकांना एके ठिकाणी खड्डा खोदण्यास सांगितला. खड्डा खोदला असता त्याजागी भंडारा व खोबरे निघाले. या गोष्टीची गाव परिसरात चर्चा होण्यास वेळ लागला नाही. अंधश्रद्धा बाळगणाऱ्या लोकांनी मनोहर भोसले यास मनोहरमामा म्हणत डोक्यावर घेतले. त्याच्या भेटीला उंदरगाव, मांजरगाव, उमवड, राजुरी, वाशिंबे, पोथवाडी येथील लोक जमा झाले. अशा प्रकारे लोक त्याला मनोहर मामा म्हणू लागले. काही दिवसांनी या मनोहरमामाने पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील गिरीम येथे बुवाबाजीचा उद्योग सुरु केला. मात्र पुणे जिल्ह्यात त्याची बुवाबाजी जास्त दिवस तग धरु शकली नाही. या ठिकाणी त्याच्यावर एक गुन्हा दाखल झाला. त्यामुळे त्याने बारामती तालुक्यातील गोजुबाबी येथे आपले दुकान हलवले. मात्र येथे देखील त्याची बुवाबाजीची दुकानदारी निट चालली नाही. अखेर बाळूमामाचा साक्षात्कार झाल्याचे म्हणणा-या मनोहरमामाने पुन्हा आपली बुवाबाजीची दुकानदारी उंदरगावला आणली. याठिकाणी त्याने मठात कामकाज सुरु केले. याठिकाणी त्याने आपल्या आईवडीलांना मदतीला घेतले. मामांना ओवाळणी टाका असे ते भविष्य बघण्यास आलेल्या लोकांना हळूच सांगू लागले. त्यामुळे कमाल शंभर रुपयांपर्यत लोक ताटात ओवाळणी टाकू लागले. हळूहळू उंदरगावासह परिसरातील लोक बाळूमामाचा साक्षात्कार झाल्याचे म्हणवणाऱ्या मनोहरमामाकडे गर्दी करु लागले. बघता बघता मनोहरमामाचे एक वलय निर्माण झाले. त्याच्याकडे बडे बडे अधिकारी हजेरी देवू लागले. त्यांच्या माध्यमातून मनोहरमामाची चांगली कमाई होण्यास मदत झाली. या कमाईच्या माध्यमातून मनोहरमामाने एक चांगला मठ बांधला. त्या मठात प्रत्येक अमावस्येला मोठ्या प्रमाणात गर्दी होऊ लागली. सोबतच कलर्स टिव्ही या चॅनलवर बाळूमामाच्या नावाने चांगभल ही सुरु असलेली मालिका बाळूमामाची प्रसिद्धी करत होती. त्याच बाळूमामाचा साक्षात्कार झाल्याचे सांगून मनोहरमामा आपले भले करुन घेत होता. गुळ व साखरेच्या अवतीभोवती ज्याप्रमाणे मुंग्या घिरट्या घालतात त्याप्रमाणे मनोहरमामाच्या माध्यमातून कमाई करण्यासाठी तयार झालेले त्याचे दोन समर्थक शिष्य घिरट्या घालू लागले. विशाल वाघमारे व ओंकार शिंदे अशी त्यांची नावे आहेत. कधी काळी गॅस सिलेंडरची घरोघरी वाहतुक करणाऱ्या विशाल वाघमारे याने आपले नाव नाथबाबा असे तयार केले. तो सोलापुर जिल्ह्याच्या मोहोळ तालुक्यातील मुळ रहिवासी आहे. हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स केलेल्या ओंकार शिंदे याने नोकरी मिळाली नाही म्हणून मनोहरमामाचे शिष्यत्व पत्करुन पैसे कमावण्यास सुरुवात केली होती. आलेल्या भक्तगणांकडून या दोघा तथाकथीत शिष्यांनी देणग्या घेण्याचे काम सुरु केले होते. देणगी घेतांनाच ते देणगीदारांचे आधारकार्ड व मोबाईल क्रमांक देखील घेऊ लागले. आधार क्रमांकासह सोशल मिडीयाच्या मदतीने हे दोघे शिष्य संबंधित देणगीदाराची कौटूंबिक माहिती जमा करु लागले. ती माहिती मनोहरमामाकडे जाऊ लागली. संबंधीत भक्ताच्या घरात किती लोक आहेत व त्यांची नावे काय आहेत याची कुंडली मनोहरमामा आलेल्या भक्ताला स्वत:हून सांगत असे. आपल्या घरातील लोकांची संख्या व त्यांची नावे मनोहरमामाला कशी काय समजली हे आलेल्या भक्ताला समजत नव्हते. मनोहरमामा म्हणजे जणूकाही अंतर्यामी आणि दैवीशक्ती असल्याची भावना लोकांच्या मनात निर्माण होण्यास वेळ लागला नाही. वास्तविक मनोहरमामाचे दोघे भक्त आधारकार्डासह सोशल मिडीयाच्या माध्यमातून लोकांचा डाटा आपल्याकडे जमा करत होते. त्या माहितीच्या आधारे ते लोकांची दिशाभुल करत होते. अशा प्रकारे मनोहरमामासह त्याचे दोघे शिष्य अंधभक्तांची लुटमार करत होते. तिघे रहात असलेल्या मठास ग्रामपंचायतीने परवानगी दिली नसतांना विज कनेक्शन देखील बेकायदा घेतले होते. विज कंपनीने ते कनेक्शन नंतर कट केले होते. जून २०१९ मधे एक महिला आपली कौटूंबिक समस्या घेऊन मनोहरमामाच्या मठात आली. बाळूमामाचा साक्षात्कार झालेला मनोहरमामा आपल्या भक्तांवरील संकटे नाहीसे करतो असे तिला कुणाकडून तरी समजले होते. त्या माहितीच्या आधारे ती मठात आली होती. नेहमीप्रमाणे विशाल वाघमारे (नाथबाबा) व ओंकार शिंदे या दोघा तथाकथीत शिष्यांसोबत अगोदर तिचा पाला पडला. दोघांनी वाट अडवत तिची सखोल विचारपूस केली. घरात पैशांची कमतरता व प्रापंचिक अडचण असल्याचे कारण तिने दोघांजवळ कथन केले. पैशांची कमतरता असल्यामुळे पतीसोबत आपले भांडण झाले असून तोडगा काढण्यासाठी मठात आल्याचे तिने दोघांजवळ कथन केले. मनोहरमामाला भेटण्यासाठी पाच हजार रुपये लागतील असे दोघांनी तिला म्हटले. तिने नाथबाबाला पाच हजार रुपये दिले व त्याची तिला पावती देखील देण्यात आली. तब्बल दोन तास प्रतिक्षा यादीवर थांबल्यानंतर तिची मनोहरमामासोबत भेट घडवून देण्यात आली. मनोहरमामासोबत भेट घडल्यानंतर त्या महिलेने तिच्या प्रापंचिक अडचणी कथन केल्या. तुझ्या सर्व अडचणी दुर होतील मात्र त्यासाठी तुला पाच वाऱ्या कराव्या लागतील असे मनोहरमामाने तिला म्हटले. पंटर रुपी शिष्य असलेल्या दोघांनी अगोदरच तिच्याकडून माहिती संकलित केली होती. त्या माहितीच्या आधारे मनोहरमामाने तिच्या हातात एक चिठ्ठी दिली. त्या चिठ्ठीत काही लोकांची नावे होती. ती नावे त्या महिलेने वाचली. त्यानंतर मनोहरमामाने तिला म्हटले की बोल... तुझे या लोकांसोबत अनैतिक संबंध आहेत की नाही? त्यावर त्या महिलेने म्हटले की नाही... या लोकांसोबत माझे व्यावहारीक संबंध आहेत. तिचे उत्तर ऐकून मनोहरमामा तिच्यावर गरजला. मला बाळूमामाचा साक्षात्कार झला आहे. मला सर्व माहिती आहे. तु खोटे बोलू नको. बऱ्या बोलाने पाच वाऱ्या कर तुझे कल्याण होईल. अशाप्रकारे संवाद घडल्यानंतर ती महिला मठाच्या बाहेर आली. त्यानंतर ठरल्यानुसार दुसरी वारी करण्यासाठी अर्थात दुसरी भेट घेण्यासाठी ती महिला २ जुलै २०१९ रोजी पुन्हा मठात गेली. तिला अगोदर विशाल वाघमारे (नाथबाबा) याची भेट घ्यावी लागली. नाथबाबाने तिला म्हटले की तुमच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी विधी करावा लागणार आहे. त्या विधीसाठी पंधरा हजाराचा खर्च आहे. त्या महिलेने सोबत आणलेले पंधरा हजार रुपये जमा केले. त्यानंतर तिला एका स्वतंत्र खोलीत बसवून ठेवण्यात आले. काळी बाहुली, काळे कापड, काळे तिळ व काही लिंबू असा ऐवज नाथबाबाने तिच्यासमोर आणून ठेवला. काहीतरी मंत्र पुटपुटत त्या सर्व वस्तूंचा स्पर्श त्या महिलेच्या अंगाला करुन ओवाळून कुठेतरी टाकून देण्यात आले. पुढील वारीला येतांना एवढीच रक्कम आणायची असे तिला सांगण्यात आले. तिसऱ्या वारीला अशाच प्रकारे त्या महिलेच्या अंगावरुन या वस्तूंचा उतारा करुन फेकून देण्यात आल्या. मात्र यावेळी नाथबाबाचा हात तिच्या सर्वांगावरुन फिरत होता. त्या महिलेला या प्रकाराची लाज वाटत असली तरी विधी समजून तिने हा प्रकार सहन केला. चौथ्या वारीच्या वेळी २८ सप्टेबर २०१९ रोजी मठातील एका सहकाऱ्याने ग्लासात दुध व पेढे त्या महिलेला आणून दिले व खाण्यास सांगितले. तिने ते दूध प्राशन करत पेढे मुकाटपणे खाल्ले. त्यानंतर काही वेळाने मनोहरमामा तिच्याजवळ आला. तो तिला म्हणाला की तु खुप सुंदर आहेस. तुझ्या सुंदरतेचा वापर करुन मला समाधानी अर्थात खुष कर. तुझे कल्याण होईल. सध्या टिव्हीवर सुरु असलेल्या रात्रीस खेळ चाले आणि बाळूमामाच्या नावाने चांगभल या दोन्ही मालिका माझ्याच पैशांवर सुरु आहेत. त्या मालिकांमधे तुला काम मिळवून देतो. एका भागासाठी तुला किमान पाच ते दहा हजार रुपये मानधन मिळेल. असे बोलता बोलता तो तिच्या सर्वांगावरुन हात फिरवू लागला. बघता बघता बोलता बोलता त्याने तिला आपल्याजवळ ओढून घेत तिच्या मनाविरुद्ध नको ते कृत्य केले. आपला कार्यभाग आटोपल्यानंतर त्याने तिला म्हटले की सर्व नेते आणि अधिकारी माझ्या परिचयातील आहेत. कुणाला काही सांगितले तर तुझीच बदनामी होईल. मी बोलवेन तेव्हा यायचे आणि मला सुख द्यायचे. टिव्ही मालिकेत काम मिळवून देतो अशा भुलथापा देत २४ मार्च २०२० रोजी मनोहरमामाने तिला फोन करुन उंदरगाव येथे बोलावले. एका खोलीत थांबवत तिचे विविध अँगलमधे विविध पोजमधे फोटोसेशन करण्यात आले. फोटोसेशन झाल्यानंतर काही वेळाने तिच्याजवळ मनोहरमामा आला. यावेळी देखील त्याने तिच्या मनाविरुद्ध स्वत:चे सुख पुर्ण करुन घेतले. मनोहरमामा निघून गेल्यानंतर लागलीच काही वेळाने तिच्याजवळ नाथबाबा आला. तु मामासोबत जो प्रकार केला तो मला देखील करायचा आहे नाहीतर हा सर्व प्रकार मी तुझ्या घरी सांगेन अशी धमकी देत नाथबाबाने देखील तिच्याकडून सुख घेतले. आपल्यावर अन्याय झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्या महिलेने अगोदर सोलापूर तालुका पोलिस स्टेशन गाठले. तेथे तिने दिलेल्या फिर्यादीनुसार मनोहरमामा, नाथबाबा व वैभव वाघ या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा शुन्य क्रमांकाने दाखल केल्यानंतर करमाळा पोलिस स्टेशनला वर्ग करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न.८४६/२१ भा.द.वि. ३५४, ३७६ तसेच जादूटोणा विरोधी कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला. योगायोगाने याच दिवशी मनोहरमामाविरुद्ध बारामती तालुका पोलिस स्टेशनला फसवणूकीसह अंधश्रद्धा निर्मुलन कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला. एकाच दिवसात मनोहरमामाच्या विरोधात करमाळा आणि बारामती पोलीस स्टेशनला दाखल गुन्ह्यातील संशयीत आरोपी मनोहरमामाची शोध मोहीम सुरु झाली. १० सप्टेबर रोजी पुणे एलसीबी पथकाच्या गळाला मनोहरमामा लागला. सातारा जिल्ह्याच्या लोणंद तालुक्यातील सालपे येथील एका फार्म हाऊसवर असल्याचे समजताच पोलिस पथकाने त्याच्या मुसक्या आवळल्या. बारामती ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात त्याला देण्यात आले. आठ दिवस बारामती पोलिसांच्या कोठडीची हवा घेतल्यानंतर त्याला ताब्यात घेण्यासाठी करमाळा पोलिस हजरच होते. बलात्काराच्या गुन्ह्यात त्याला अटक करण्याकामी करमाळा पोलिस स्टेशनचे पो.नि. सुर्यकांत कोकणे यांनी न्यायालयास विनंती केली. न्यायालयाने ती विनंती मान्य केल्यानंतर मनोहरमामा करमाळा पोलिसांच्या ताब्यात आला. २० सप्टेबर रोजी करमाळा पोलिसांच्या पथकाने त्याला न्यायालयात उभे केले असता त्याला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. अखेरचे वृत्त हाती आले तेव्हा संशयीत आरोपी मनोहरमामा याचे दोन्ही संशयीत साथीदार आरोपी फरार होते. या दोघा फरार आरोपींची कुणाला माहिती असल्यास ती पोलिसांना देण्याचे आवाहन पोलिस अधिक्षक तेजस्वी सातपुते यांनी माध्यमांना केले आहे. सोलापूरच्या जिल्हा पोलीस अधिक्षक तेजस्वी सातपुते, डिवायएसपी डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. सुर्यकांत कोकणे व त्यांचे सहकारी कर्मचारी हेडकॉन्स्टेबल विलास रणदिवे, सिद्धेश्वर लोंडे, संतोष देवकर, चंद्रकांत ढवळे, सोमनाथ जगताप, तौफिक काझी आदी या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

# अक्कलकोट येथे पत्नीची निर्घृण हत्या करून पुरावा नष्ट करणाऱ्या पतीसह तिघांना जन्मठेपेची शिक्षा!



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट येथील संजयनगर झोपडपट्टीत राहणाऱ्या शहनाज रमजान शेख (वय ३०) हिचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी पती, सासूसह तिघांना जन्मठेप व प्रत्येकी तीन हजार रुपये दंडाची शिक्षा जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. एन. पांढरे यांनी ठोठावली, तर रिक्षाचालकाला ५ वर्षे कारावास व एक हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. पती रमजान मन्नू शेख (वय २२) सासू अम्मा ऊर्फ रेणुका मन्नू शेख, शाहीन रहेमान शेख यांना खूनप्रकरणी जन्मठेप तर रिक्षाचालक दिलदार तकदीरखां सौदागर (३५) यास पुरावा नष्ट केल्याप्रकरणी पाच वर्षे कारावास ठोठावण्यात आला.

मंगळवारी न्यायालयात आरोपींच्या शिक्षेवर सुनावणी होऊन न्यायालयाने तिघांना जन्मठेप व रिक्षाचालकाला पाच वर्षे सक्तमजुरी व दंड ठोठावला. रमजान, अम्मा, शहनाज आणि शेजारील शाहीन शेख यांनी घटनेच्या नऊ महिने आधी अक्कलकोट येथील विकास हॉटेलजवळ शहनाज हिच्या पाच महिन्याच्या मुलीचा खून करून मृतदेह टाकून दिला होता. त्या प्रकरणावरून सर्व आरोपींमध्ये भांडणे सुरू झाली होती. त्यावेळी रमजान, अम्मा, शाहीन या तिघांनी रमजानची पत्नी शहनाज हिला लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याने ती बेशुद्ध पडली होती. तिला रिक्षात बसवून अक्कलकोट येथील सरकारी दवाखान्यासमोरील मैदानात नेले. त्या ठिकाणी रमजान याने हेक्सा ब्लेडने पत्नी शहनाज हीचे मुंडके कापून धडावेगळे केले. एका पोत्यामध्ये शहनाज हिचे प्रेत आणि मुंडके एकत्र भरून ते रेल्वे अपघात दाखवण्यासाठी तोळणूर शिवारात रेल्वे रुळावर टाकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यामध्ये पोलीस शिपाई धनसिंग राठोड यांनी फिर्याद दिली. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक व्ही.एस. जाधव यांनी केला. तर कोर्ट पैरवी डी.वाय. कोळी यांनी काम पाहिले. यात सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत तर आरोपीच्यावतीने ॲड.एच.एच. बडेखान, ॲड.सचिन कुलकर्णी, ॲड.राजेंद्र बायस यांनी काम पाहिले.



ॲड. रजपूत

सरकार पक्षाचा युक्तिवादात हेक्सा ब्लेडचा वापर लोखंड कापण्यासाठी करण्यात येतो, परंतु आरोपींनी मानवी शरीर कापण्यासाठी त्याचा वापर केला आहे. शहनाज हिचा आरोपीने हे हेक्सा ब्लेडने गळा चिरून धड वेगळे केले हे अमानवी कृत्य असून आरोपीने निघृणपणे खून केला आहे. तसेच खून करून रेल्वे अपघात दर्शवण्यासाठी मृतदेह रेल्वे रुळावर नेऊन ठेवला होता. त्यामुळे हा दुर्मिळ खटला असल्याने आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग रजपूत यांनी न्यायालयात केली. परंतु न्यायाधीशांनी तिघांना जन्मठेप व एकास पाच वर्षे कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

# शिवसेनेचे अशासकीय सदस्याची हकालपट्टीची निराधारांची मागणी!

**देवणी/प्रतिनिधी**

निराधारांना शासकीय मानधन देऊन अशा निराधाराना शासकिय अनुदानामुळे मुख्य प्रवाहत आणण्यासाठी शासन एकिकडे प्रयत्न करीत असतानाच दुसरीकडे लातुर जिल्ह्यातील देवणी तालुक्यात संगायो, इंगायो समितीवर शिवसेनेच्या कोट्यातुन अशासकिय सदस्य पदी नियुक्त झालेले गणपत सदाशीव पाटील हे अपवाद ठरले आहेत, यांची निराधारांकडुन हकालपट्टी करण्याची मागणी देवणी तालुक्यात होत आहे. याबाबत स्विस्तर माहिती अशी कि, संगायो, इंगायो देवणी तालुक्याच्या कमिटीवर अशासकिय सदस्य म्हणून मुळचे रहिवाशी माटेगडी ता.देवणी येथील गणपत सदाशीव पाटील यांची या समितीवर नियुक्ती करण्यात आली. पण गणपत पाटील हे हाल्ली मुक्काम मागील अनेक वर्षापासून मुंबई येथे वास्तव्यास आहेत. हे एका आमदाराचे पीए म्हणून काम करीत असल्यामुळे देवणी येथील वरील समितीच्या एका हि मिंटीगला आज रोज पर्यत उपस्थित राहु शकले नाहीत अशी चर्चा आहे, अशा मुंबई येथे वास्तव्यास राहणाऱ्या व्यक्तीची या कमीटीवर राहण्याची गरज काय? अशी चर्चा तालुक्यातील निराधाराकडुन होताना दिसत आहे.

गोरगरीब, दिनदुबळ्या, जेष्ठ नागरीक, पिडीत, विधवा अशा लोकांना शासकीय अनुदान देऊन अर्थिक हातभार लावण्यासाठी एकिकडे केंद्र शासन व महाराष्ट्र शासन प्रयत्न करीत आहे तर दुसरीकडे लातुर जिल्ह्यातील देवणी तालुका अपवाद ठरला आहे. कारण येथील कमिटीचे सदस्य गणपत पाटील एका आमदाराच्या जोरावर कमिटीचे सदस्य पद व्यक्तीक किंवा स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी शोभेची वस्तू प्रमाणे पद मिळवुन घेतले ते तालुक्यातील वरील योजनेतील एकाही निराधारास आतापर्यत आर्थिक लाभ मिळवुन देऊ शकले नाहीत आणि या योजनेच्या बैठकिस सतत गैरहजर राहतात अशी चर्चा आहे. त्यामुळे शिवसेनेचे गणपत पाटील यांची या कमिटीवरील अशासकिय सदस्यातुन हकालपट्टी करण्याची मागणी देवणी तालुक्यातील सर्व सामान्य जनतेतून होत आहे.

## थोडक्यात वृत्तांत



### समर्थनगर येथे सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे भूमिपूजन

सोलापूर :अक्कलकोट शहराजवळील समर्थनगर येथे आमदार सचिन (दादा) कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नातुन नागरी सुविधा योजनेअंतर्गत होटकर घर ते माने घर व माने घर ते दंतकाळे घरापर्यंत शंभर फुटी रोडला कॉंक्रेट रस्त्याचे भूमिपूजन सर्व परिसरातील माताभगिनी यांच्या हस्ते झाले. या भूमिपूजन कार्यक्रमास सरपंच जयश्री पाटील, उपसरपंच लालसिंग राठोड, ग्रामविकास अधिकारी अय्युब बळुर्गी, ग्रामपंचायत सदस्य मोनेश नरेगल, वर्षा गडकरी, अनिल तुप्पद, सतीश खराडे, सचिन गजधाने, विकास गायगवळी, आमचे मित्र रवी कोटणीस, प्रवीण साठे, आळगुंडगि काका, कलशेट्टी काका व ग्रामपंचायत कर्मचारी, परिसरातील माताभगिनी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पु.ल.देशपांडे अकादमीचा कायापालट

मुंबई : सांस्कृतिक क्षेत्रातील शिखर अकादमी म्हणून कार्यरत असणाऱ्या पु.ल.देशपांडे अकादमीचा कायापालट होणे आवश्यक असल्याने येणाऱ्या काळात यावर भर देण्यात यावा असे सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांनी सांगितले. पु.ल.देशपांडे अकादमीला स्वायत्ता देण्यासंदर्भातील बैठक मंत्रालयात सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव विलास थोरात, उपसचिव शैलेश जाधव, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. देशमुख म्हणाले की, महाराष्ट्राच्या कला परंपरेचे जतन करण्याचे काम या अकादमीच्या माध्यमातून होत असते. तर राज्यातील विविध कला क्षेत्रातील कलावंतांच्या कला गुणांना वाव देऊन त्यांना समृध्द करण्यात अकादमीचा मोठा वाटा आहे. या अकादमीमध्ये येणाऱ्या प्रेक्षकांची कलेविषयी अभिरुची समृध्द करण्यासाठी अकादमीने यापुढील काळात काम करणे आवश्यक आहे. आजच्या काळाशी सांगड असून येणाऱ्या काळात या अकादमीचा कायापालट करता येईल याबाबत अभ्यास करण्यात यावा. तसेच सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील काम करणाऱ्या तज्ञ सल्लागार नेमून हे काम कशा पध्दतीने करता येईल याबाबतही माहिती घेण्यात यावी.

### बेवारस मोटार सायकलीचा लिलाव

लातूर : पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. लातूर येथे बेवारस असलेली एकूण ८० मोटार सायकल वाहनांचा (स्क्रॅप वाहने) जाहीर लिलाव गुरुवार, दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजी १०-०० वाजता पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. लातूर येथे आयोजित करण्यात आलेले आहे. तरी इच्छूक खरेदीदारांनी नमूद दिवशी २०० रुपये किमंतीच्या बॉंडव अनामत रक्कमेसह उपस्थित रहावे, असे एमआयडीसी लातूर येथील पोलीस निरीक्षक यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे. एमआयडीसी लातूर येथे बेवारस असलेल्या मोटार सायकलीचा लिलाव करण्याकामी प्रादेशिक परिवहन अधिकारी, लातूर व तालुका दंडाधिकारी यांच्याकडून परवानगीही घेतल्याचे त्यांच्या प्रसिध्दीपत्रकात नमुद केले आहे.

### सीमा कासराळे यांना आदर्श गुरुगौरव पुरस्कार

लातूर : बोरी जिल्हा परिषद परिषद माध्यमिक प्रशालेतील शिक्षिका सीमा कासराळे (पल्लेवाड) यांना लातूर पंचायत समितीचा गुरुगौरव पुरस्कार माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते देवून सन्मानीत करण्यात आले. लातूर पंचायत समितीच्यावतीने दरवर्षी तालुक्यातील विशेष कार्य करणाऱ्या शिक्षकांना, शिक्षक दिनी गुरुगौरव शिक्षक पुरस्काराने सन्मानीत करण्यात येते, बोरी ता.लातूर येथील जिल्हा परिषद माध्यमिक प्रशालेच्या शिक्षिका सीमा कारसाळे (पल्लेवाड) यांना सन २०२१९-२०२० या वर्षीचा गुरुगौरव पुरस्कार सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते, आ.धीरज देशमुख यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले. याप्रसंगी पंचायत समिती सभापती सरस्वती पाटील, उपसभापती मुन्ना उपाडे, माजी सभापती शितल फुटाणे आदींची उपस्थिती होती.

### डॉक्टरच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण

सोलापूरः सोलापूर शहरातील विजापूर रस्त्यावरील एका नगरातील डॉक्टरच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण करण्यात आल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुलगी अभ्यास करते असे सांगून आईचा मोबाईल घ्यायची व ती ऑनलाईन मिटिंग वर चॅटिंग करायची. त्यामुळे आईने तिच्या जवळचा मोबाईल फोन काढून घेतला होता. गुरुवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास मुलीने ऑनलाईन अभ्यास करण्यासाठी वडिलांचा मोबाईल घेतला होता तिने बीटीएस अप्लीकेशन वरती दक्षिण कोरिया येथील लोकांची ऑनलाइन मिटिंग वर चॅटिंग करून नृत्य शिकून नर्तिका बनणार असल्याचे सांगितले होते. मी आनंदी आहे माझी काळजी करू नका असा संदेश देऊन व आणखी दोन चिठ्ठ्या लिहून ती घरातून निघून गेली आहे. जाताना तिने १६ हजारांची रोख रक्कम व चार तोळ्याचे सोन्याचे गंठण घेऊन गेली आहे त्यानंतर ती परत न आल्याने तिच्या मैत्रिणी कडे चौकशी केली असता ती तिच्या कडे आली नाही सापडली ही नाही. त्यामुळे त्याला अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी आमिष दाखवून पळवून नेल्याचे पोलिसांकडे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन आरोपीने केली आत्महत्या

**नालासोपारा/प्रतिनिधी**

तुळींज पोलीस स्टेशन हद्दीतील मोरेगाव येथे राहणाऱ्या एका इसमाने अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. नालासोपारा मोरेगाव येथील एका इमारतीत राहणाऱ्या ३६ वर्षीय इसमाने दुकानात जात असलेल्या अल्पवयीन मुलीस फूस लावून त्या इमारतीमधील रिकाम्या फ्लॅट असलेल्या ठिकाणी घेऊन गेला. त्यानंतर त्याने मुलीवर अतिप्रसंग केला. घाबरलेल्या अवस्थेत असलेली मुलगी घरी गेली व घडलेली घटना तिने आपल्या आई-वडीलांना सांगितली.

या नराधमाला शोधण्यासाठी आई-वडील बाहेर आले, तेव्हा तो त्याच फ्लॅटमध्ये दारू पीत बसलेला आढळून आला. त्याचवेळी इमारतीमधील लोक जमा झाले. त्यांना घाबरून आरोपींने फ्लॅट मधून खाली उडी मारली व तो जागीच ठार झाला. मुलीच्या आई-वडिलांनी पोलिसाला सांगितले की आमची मुलगी दुकानात साबण घेण्यासाठी जात असताना तिला फूस लावून रिकाम्या फ्लॅटमध्ये घेऊन गेला व तिच्या सोबत अतिप्रसंग केला. पीडित मुलगी ही १७ वर्षाची आहे. मयत इसमावर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. स्थानिक लोकांकडे अशी माहिती मिळाली की लोकांकडून मारझोड होईल व पोलीस अटक करतील या भीतीने आत्महत्या केली असे समजले.

# नागझरी येथील दोघांवर विनयभंगाचा गुन्हा दाखल

**अहमदपूर/फिरोज शेख**

तालुक्यातील नागझरी येथील दोघांनी अहमदपूर शहरापासुन जवळच असलेल्या मरशिवनी येथे एका महीलेच्या घरी पाणी पिण्याचे कारण सांगुन घरात कोणीच नसल्याचे पाहुन पिडित माहिलेच्या घरात घुसुन वाईट हेतुने हात धरला असल्याच्या तक्रारीवरून दोघांविरूध्द अहमदपूर पोलीसांत विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



यावषयी पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहीती अशी की अहमदपूर शहरापासुन जवळच असलेल्या मरशीवनी येथील एका २९ वर्षीय महीलेने अहमदपूर पोलीस स्टेशन येथे दि ०१ ऑक्टो रोजी तक्रार दिली होती की, मी व माझा लहान मुलगा वय १० वर्षे माझ्या आइचे घरी मरशिवणी येथे राहते. माझे पती पुणे येथे बिगारी कामासाठी असतात. ते महिना दोन महिन्याला मला व माझे मुलाला भेटण्यासाठी मरशिवणी येथे घरी येतात. दि ०१ ऑक्टो रोजी मी व माझा मुलगा दोघे जण घरी होतो व मी स्वयंपाक करत असताना, दुपारी चार वाजताचे सुमारास दोन अनोळखी व्यक्ती मरशिवणी येथे घरासमोर येवुन पिण्यासाठी पाणी मागितले ते दारु पिलेले दिसल्यामुळे मी त्यांना आमच्याकडे पाणी नाही . समोर हॉटेल आहे तेथे जावुन पाणी प्या असे म्हणुन मी दारातून आत गेले असता, ते दोघे अनोळखी व्यक्ति माझ्या मागे घरात येवून मला हात धरुन वाइट हेतून पलंगाकडे ओढु लागले. त्यावेळी मी त्यांना विरोध करत झटका देवुन हात सोडवुन घेतला. त्यावेळी ते दोघे मला शिवीगाळ करु लागले. मी आरडा ओरड केली असता, आमच्या घराशेजारी राहणारी माझी मामी सत्यभामा ताणाजी चव्हाण पळत येवुन सोडवा सोडव केली. त्यावेळी ते दोघे पळुन जात असताना गल्लीतील लोकांनी त्यांना पकडुन त्यांची विचारपुस करुन त्यांचे नाव विचारले असता, त्यावेळी त्यांनी त्यांचे नाव भास्कर इप्पर व आनंद इप्पर दोंघे रा. नागझरी ता.अहमदपूर असे असे असल्याचे सांगुन ते दोघे लोकांच्या ताब्यातुन पळून गेले. तरी दि ०१ ऑक्टो रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास मी. घरी स्वयंपाक करत असताना, वरील दोघांनी दारु पिवुन येवुन मला पिण्यासाठी पाणी मागुन वाइट हेतूने माझा हात धरुन झटापट करुन माझा विनयभंग केला. मी विरोध केला असता, मला-शिवीगाळ करुन निघुन गेले अशी फिर्याद पिडित महिलेने दिली असल्यामुळे भास्कर इप्पर व आनंद इप्पर रा.नागझरी ता अहमदपूर यांच्या विरूध्द अहमदपूर पोलीस स्टेशन मध्ये गुरनं ४२५/२१ कलम ३५४ अ ५०४, ३४ भादवी नुसार विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस उपनिरिक्षक पल्लेवाड हे करीत आहेत.

# अट्टल घरफोड्याला अटक; २ लाख १२ हजारांचा ऐवज जप्त



**लातूर/अमर करकरे**

विवेकानंद चौक पोलिस ठाणे हाद्दीतील वेगवेगळ्या भागात पाळत ठेवून घरफोड्या करणाऱ्या अट्टल घरफोड्याच्या विवेकानंद चौक पोलिसांनी मुस्कया आवळून सुमारे २ लाख १२ हजाराचा ऐवज जप्त करीत धडाकेबाज कामगिरी केली आहे. राहूल चंद्रकांत वाघमारे (२८) असे या चोरट्याचे नाव आहे. त्यांने आपल्या गुन्ह्याची कबूली दिली असून त्याच्याकडून आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे. मागील काही दिवसांपूर्वी एलआयसी कॉलनी येथील रहिवासी पुजा प्रभाकर नेला होता. या संदर्भात विवेकानंद चौक आला होता. इंगळे यांच्या अपार्टमेंटमधील घरात चोरी रुपयांचा ऐवज चोरुन नेला होता. या झाली होती. चोरट्यांनी घरातील लोखंडी संदर्भात विवेकानंद चौक पोलिसांत कपाटातील १ लाख ४४ हजार ९९० ५४३/२१ कलम ४५४, ४५७, ३८० रुपयांचा सोन्या चांदिचा ऐवज चोरुन भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात पोलिसांत गुरनं ४९४/२१ कलम ४५४, तसेच, म्हाडा कॉलनी येथील ४५७, ३८० भादंवि अन्वये गुन्हा दाखल रहिवासी रामचंद्र गायकवाड यांच्या केला होता. याच काळात छत्रपती घरातही चोरी झाली होती. चोरट्यांनी चौकातील राधाकिशन अपार्टमेंटमधील त्यांच्या घरातून २२ हजार ५०० रुपयांचा रमेश राजेंद्र पाटील व त्यांच्या शेजारी ऐवज चोरुन नेला होता. या संदर्भात वास्तव्यास असलेले प्रशांत शशिकांत गुरनं ३३०/१८ कलम ४५७, ३८० कुलकर्णी यांच्या घरातही चोरी झाली भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात होती. आरोपींनी रोख रक्कम व सोन्या आला होता. या गुन्ह्याच्या तपासासाठी चांदिचे दागिने असा ७२ हजार ७५० पोलीस अधीक्षक निखील पिंगळे वअपर पोलीस अधीक्षक अनुराग जैन, सहायक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक सुधाकर बावकर, पोलीस उपनिरीक्षक महेश गळगट्टे शंकर नामदास, पोना कलकत्ते, नलवाड, सायबर सेलचे संतोष देवडे, गणेश साठे आदिंनी परिश्रम घेत म्हाडा कॉलनीतील अट्टल घरफोड्या राहूल चंद्रकांत वाघमारे याला ताब्यात घेतले असता त्याने तिन्ही गुन्ह्यांची कबुली दिली. त्याच्याकडून २ लाख ११ हजार ७४० रुपयांचाऐवज जप्त करण्यात आला आहे.

# घटस्फोट देत नसल्याच्या वादातून बायकोच्या प्रियकराचा नवऱ्यावर भर रस्त्यात जीवघेणा हल्ला

**भिवंडी/अभिजित हिरे**




बायकोला घटस्फोट देत नसल्याच्या वादातून बायकोच्या प्रियकराने भावाच्या मदतीने भर रस्त्यात अडवून नवऱ्यावर जीवघेणा हल्ला केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. हि घटना भिवंडी-ठाणे मार्गावरील राहनळ गावाच्या हद्दीत घडली आहे. याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात दोघा हल्लेखोर भावाविरोधात गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरु केला आहे. जगनाथ भगत, अभिमन्यू भगत असे हल्लेखोर भावाचे नावे आहेत. जितेंद्र पाटील (३८) असे हल्ल्यात गंभीर जखमी नवऱ्याचे नाव आहे. जखमी नवरा आणि गुन्हा झालेले दोघेही भाऊ भिवंडी तालुक्यातील डुंगे गावात राहतात. त्यातच गेल्या दोन वर्षापासून नवरा बायको मध्ये सोडचिठ्ठ देण्यावरून वाद सुरु होते. अश्यातच काल दुपारच्या सुमारास भिवंडी-ठाणे मार्गावरील राहनळ गावाच्या हद्दीतील भर रस्त्यावर जितेंद्रला गाठून तू तुझ्या बायकोला घटस्फोट का देत नाही', असे बोलून वाद घातला. या वादानंतर आरोपी भावांनी अचानक लाकडी दांडक्याने प्रहार करून जितेंद्रला झाली पाडले. जितेंद्र रस्त्यावर पडताच कैचीने वार केले. यामध्ये जितेंद्र गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले. त्यांनतर नारपोली पोलीस ठाण्यात दोघा भावाविरोधात विविध कलमानुसार गुन्हा दाखल पोलिसांनी तपास सुरु केला. या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उप निरीक्षिक विकास राऊत करीत आहेत.

# सोलापूर शहराचे नवे पोलीस आयुक्तपदी हरीश बैजल यांची नियुक्ती



**सोलापूर** : सोलापूर शहर पोलिस आयुक्तपदी महाराष्ट्र राज्य सायबर विभागाचे पोलिस उपमहानिरीक्षक हरीश बैजल यांची नियुक्ती झाली. सोलापूरचे पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांची पदोन्नतीने बदली करण्यात आली आहे. अंकुश शिंदे यांना विशेष पोलीस महानिरीक्षक सुधार सेवा मुंबई या ठिकाणी पदोन्नती मिळाली त्यांच्या जागेवर ठाणे शहर अप्पर पोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे यांची सोलापूर शहर पोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली होती. मात्र कराळे यांनी सोलापुरात येण्यास इंटरेस्ट दाखवला नाही. त्यामुळे अंकुश शिंदे यांना काही दिवस सोलापुरात थांबावे लागले होते. दरम्यानच्या काळात राज्याचे गृह राज्यमंत्री सतेज पाटील यांच्यासमोर हा विषय काढला असता त्यांनी येणाऱ्या पंधरा दिवसात नव्या पोलीस आयुक्तांची नियुक्ती होईल अशी माहिती दिली. त्यानुसार शुक्रवार ८ ऑक्टोबर रोजी सोलापूरसाठी नवे पोलिस आयुक्त म्हणून हरीश बैजल यांची नियुक्ती झाली आहे ते आता केव्हा पदभार घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# दत्तात्रेय कोकरे यांना सातारा जिल्हा माहिती अधिकारी पदी पदोन्नती



**नवी मुंबई/प्रतिनिधी**

विभागीय माहिती कार्यालयातील सहाय्यक संचालक दत्तात्रेय कोकरे यांना जिल्हा माहिती अधिकारी म्हणून जिल्हा माहिती कार्यालय, सातारा येथे पदोन्नती मिळाल्याने आज कोकण विभागीय उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांच्या हस्ते त्यांचा निरोप समारंभ करण्यात आला. विभागीय माहिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दत्तात्रेय कोकरे यांचे अभिनंदन करुन त्यांच्या पुढील कारकिर्दीसाठी यावेळी शुभेच्छा दिल्या. दत्तात्रेय कोकरे हे गेली तीन वर्षे विभागीय माहिती कार्यालय, कोंकण भवन येथे सहायक संचालक या पदावर होते. या काळात त्यांनी मंत्रालय, पालघर, डहाणू, पुणे येथे कामकाज पाहिले. दत्तात्रेय कोकरे यांच्या पदोन्नतीमुळे विभागीय माहिती कार्यालयातील सहाय्यक संचालक या रिक्त झालेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार ठाणे जिल्हा माहिती कार्यालयातील माहिती अधिकारी नंदकुमार वाघमारे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

क्राईम Reporter

क्राईम संध्या साप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉलवर उपलब्ध होईल.

9890718873

11 TO 17 OCTOBER 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 09/10/2021 10:32 PM Page 1



# ...म्हणूनच भाजपा आक्रमक!

केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात जे शीतयुद्ध सुरू आहे, त्यात आता नातेवाईकांना सुद्धा टार्गेट केले जात आहे. सत्तेचा हा अतिरेक म्हणावा लागेल आणि याबाबत कुठल्याही एकाच पक्षाला दोष देता येणार नाही. यापूर्वी केंद्रात काँग्रेस आघडीचे सरकार असतानाही त्यावेळी विरोधी पक्षात असलेल्या भाजपा नेत्यांना त्रास देण्यात आला होता. त्यामुळे 'जिसकी लाठी उसकी भैस' या उक्ती नुसार सध्या सुडाचे राजकारण सुरू आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सध्या केंद्राच्या अखत्यारीत असलेल्या तपास यंत्रणा विरोधकांना टार्गेट करीत आहेत. त्यांच्या मागे कधी आयकर विभागाचा, कधी एनसीबीचं तर कधी ईडीचां ससेमिरा लावला जात आहे. याचा अर्थ भाजपात असलेले सर्व नेते धुतल्या तांदळासारखे आहेत का? जो किरीट सोमय्या आज आघाडीतील नेत्यांचे भ्रष्टाचार बाहेर काढीत आहे त्याने काही वर्षांपूर्वी नारायण राणेंच्या भ्रष्टाचाराबद्दल जाहीरपणे वक्तव्य केली होती. पण नारायण राणे भाजपात येवून केंद्रीय मंत्री बनाताच किरीट सोमय्याच्या पारखी नजरेत ते शुध्द झाले असे का? याचे उत्तर सोमय्यांकडेही नाही. ठीक आहे राज्यातील महाविकास आघाडीतील नेत्यांचे घोटाळे किरीट सोमय्या यांनी जरूर बाहेर काढावेत, पण त्यांच्या नातेवाईकांना ही त्रास देणे कितपत योग्य आहे? शरद पवार यांनी लखिमपूर खिरी हत्याकांडाची तुलना थेट जालियनवाला बाग हत्याकांडाची करताच दुसऱ्याच दिवशी त्यांच्या नातेवाईकांच्या घरावर आयकर विभागाचे छापे पडले. त्यात अजित पवार यांच्या तीन बहिणींचा समावेश आहे. सहकारी साखर कारखान्यांच्या खरेदी विक्रीत गैरव्यवहार झाल्याची चर्चा फार जुनी आहे. मग राज्यात युतीचे सरकार असताना या घोटाळ्यांची चौकशी का नाही झाली? तेंव्हा किरीट सोमय्या गप्प का होते. उलट आघडी सरकार सत्तेत असताना खुद्द त्या सरकारचे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीच ७२ हजार कोटींचा सिंचन घोटाळा उघडकीस आणला. इतकेच नव्हे तर सर्व पक्षीय नेते आरोपी असलेल्या शिखर बँक घोटाळ्यात चव्हाणांनीच प्रथम कारवाई केली. सत्ता असतानाही आपल्याच सरकारमधील नेत्यांना एक्सपोज करण्याचे जे धाडस काँग्रेसचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दाखवले ते या देशातील कुठल्याही पक्षाचा मुख्यमंत्री दाखवू शकत नाही. मात्र स्वकीय असो किंवा परकीय यांच्यावर कारवाई करताना पृथ्वी बाबांनी कधीच त्यांच्या नातेवाईकांना त्रास दिला नाही आणि मुख्य म्हणजे विरोधात बोळणाऱ्यानाच कधी टार्गेट केले नाही. उलट केंद्रात भाजपची सत्ता आल्यापासून ईडी आणि आयकर विभाग सारख्या तपास यंत्रणांचा वापर विरोधकांचे तोंड दाबण्यासाठी केला जातोय असे आरोप सातत्याने केंद्रातील भाजप सरकारवर होत आहेत आणि त्यात काही प्रमाणात तथ्य आहे. जरंडेश्वर साखर कारखाना विक्रीचे प्रकरण समोर आल्यापासून भाजप नेते अजितदादांच्या हात धुवून मागे लागलेत आणि त्यातूनच त्यांच्या बहिणींच्या मालमत्तांवर धाडी टाकण्यात आल्याचे आरोप अजितदादा यांनी केला आहे. जरंडेश्वर साखर कारखान्याच्या विकृत ज्या ओंकार बिल्डरचे नाव येते त्यांनी अनेक घोटाळे केल्याची चर्चा आहे आणि अशाच एका मोठ्या घोटाळ्यात ओंकारचा मुख्य संचालक बाबुलाल वर्मा सध्या तुरुंगात आहे. हा बाबुलाल वर्मा नारायण राणेंचा निकटवर्ती असल्याची चर्चा आहे, तसे असेल तर सोमय्या जरंडेश्वर साखर कारखान्याच्या विक्रीच्या घोटाळ्याच्या तळाशी जाणार का? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मात्र एखाद्या नेत्याला टार्गेट करण्यासाठी त्याच्या नातेवाईक असलेल्यांना त्रास देणे बरोबर नाही. निदान महिलांना तरी त्रास देऊ नये. कारण आज तुमच्याकडे सत्ता आहे म्हणून तुम्ही त्यांना त्रास देताय उद्या तुमची सत्ता जाऊन त्यांची सत्ता आली, तर तेही तेच करतील आणि सुडाच्या या राजकारणात सामान्य जनतेचे प्रश्न त्यांच्या अशा अपेक्षा आणि राज्याचा विकास या सगळ्या गोष्टींकडे मात्र दुर्लक्ष होऊन राज्य आणि लोकशाही यांची अधोगती होईल. राजकारण्यांच्या सुडाच्या राजकारणात जर जनतेचे नुकसान व्हायला लागले तर जनतेने गप्प राहून चालणार नाही. कारण राजकीय पक्ष एकमेकांवर सूड उगवायला काही गुंडांच्या टोळ्या नाहीत. त्यांची जनतेत एक चांगली प्रतिमा असते आणि त्याच्याच आधारे ते निवडणुकांना सामोरे जात असतात. पण सत्ता हाती आल्यावर एखाद्याने सुडाचे राजकारण करून विरोधी बाकावर असलेल्या नेत्यांना जर त्रास द्यायला सुरुवात केली, तर त्यातून कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण होऊन दोन्हीकडच्या लोकांची डोकी फुटू शकतात. तेंव्हा सुडाचे राजकारण बंद करा आणि विकासाकडे लक्ष द्या!

# देवांचा बंदिवास संपला!



गुरुवारचा दिवस भाविकांसाठी खूपच आनंदाचा आणि उत्साहाचा होता. कारण घट स्थापनेच्या मुहूर्तावरच गेल्या दीड वर्षांपासून बंद असलेली मंदिरे उघडली आणि भाविकांना देवदर्शन घेता आले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सहकुटुंब मुंबादेवीचे दर्शन घेतले. त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी सुद्धा आपापल्या भागातील मंदिरात जाऊन देवदर्शन घेतले. यावेळी कोरोनाचे संकट कायमचे दूर व्हावे असेच प्रत्येकाने देवाला साकडे घातले असावे. सरकारने मंदिरे उघडवित यासाठी भाजपा तसेच अन्य धार्मिक संघटनांनी आंदोलने केली. सरकारवर दबाव टाकला, पण सरकारने जुमानले नाही. मात्र कोरोनाचा प्रादुर्भाव जसा हळूहळू कमी होत गेला आणि लसीकरण मोहिमेमुळे कुठेतरी कोरोनाच्या प्रतिकाराची शाश्वती मिळाली तेंव्हा सरकारने मंदिरे खुली करण्याचा निर्णय घेतला. मंदिरे किंवा अन्य धर्माची प्रार्थनास्थळे याकडे केवळ धार्मिक बाब अथवा श्रद्धा एवढ्याच दृष्टिकोनातून पाहता नये. तर बऱ्याचशा लोकांचं ते एक उत्पन्नाचे साधनही आहे. कित्येक गोरगरीब माणसाची रोजीरोटी त्यावर अवलंबून आहे. यामध्ये धार्मिक स्थळांच्या परिसरात फुले, हार, अगरबत्ती तसेच पूजा विधीचे अन्य सामान यासारख्या वस्तू विकून लाखो लोकांचं त्यावर गुजारा होत होता. पण कोरोनामुळे मंदिरे बंद झाली आणि मंदिरांवर उपजीविका असलेला हा गरीब वर्ग बेरोजगार झाला. दीड वर्षात त्याची काय अवस्था झाली असेल आणि त्याने आपल्या मुला-बाळांना कसे जगवले असेल हे त्या परमेश्वराला ठाऊक! त्याच बरोबर शिर्डी सारख्या मोठ्या धार्मिक स्थळांच्या ठिकाणी साध्या चहाच्या टपरी पासून फाईस स्टार हॉटेल्स पर्यंत सर्व काही बंद होतं. हॉटेलवाल्यांचे एकवेळ सोडा पण रस्त्यावर खाद्य पदार्थ तसेच प्रसाद, वडापाव, भजी ,चहा, लिंबूपाणी यासारखे पदार्थ विकून कसे बसे आपले पोट भरणारे लोक गेल्या दीड वर्षात बरबाद झाले. आणि म्हणूनच मंदिरे खुली व्हायला हवीत असा बऱ्याच लोकांचा आग्रह होता. शिवाय काही मोठ्या देवस्थानाची व्याप्ती पाहता तिथे पुजाऱ्यांपासून सफाई कामगार पर्यंत कर्मचारी वर्ग आहे. भाविकांकडून मिळणाऱ्या पैशावरच या सर्व देवस्थानचा कारभार चालतो, त्याखेरीज या देवस्थानला उत्पन्नाचे अन्य साधन नाही. परिणामी काही देवस्थान समित्यांनी मंदिराचा कर्मचारी वर्ग कमी केला. थोडक्यात सांगायचे म्हणजे मंदिरे बंद राहिल्यामुळे सर्वात जास्त नुकसान झाले ते या मंदिरांवर ज्यांची रोजी रोटी अवलंबून आहे अशा गोरगरीब जनतेचे! त्यामुळे मंदिर ही केवळ धार्मिक बाब राहिली नव्हती, तर श्रध्दे बरोबरच रोजगाराचे साधन म्हणूनही त्याकडे पाहिले जात होते आणि म्हणूनच मंदिरे उघडण्याच्या मागणीबाबत लोक आग्रही होती. राहता राहील सवाल श्रध्देचा तर काही विज्ञानवादी लोक आजही देवाच्या अस्तित्वावर शंका घेतात. पण त्यांना एक गोष्ट कळायला हवी होती की येवढ्या मोठ्या जगाचे नियंत्रण करणारी कुठलीतरी एक अदृश्य शक्ती या जगात आहे आणि हीच शक्ती म्हणजे देव! अर्थात प्रत्येक जण त्याला वेगवेगळ्या रूपात पाहतात. कुणी ईश्वर म्हणतो, कुणी अल्लाह म्हणतो तर कुणी त्याला जिजसच्या रूपात पाहतो. पण त्या सर्वाची देवा बाबत जी श्रद्धा आहे ती अतूट आहे.

**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

आपण संकटात सापडलो तर देवच आपल्या मदतीला धाऊन येतो. त्यामुळे देवाचे नामस्मरण करायलाच हवे ही भावना प्रत्येकाच्या मनात खोलवर रुजली आहे आणि म्हणूनच मंदिरे बंद असल्याने भाविक अस्वस्थ होते. त्यांना मंदिरात जाऊन त्यांच्या देवाचे दर्शन घ्यायचे होते. मनातल्या भावना इच्छा आकांक्षा देवाजवळ व्यक्त करायच्या होत्या, म्हणूनच तो मंदिरे उघडायची वाट पाहत होता. कोरोना सारख्या महामारीतून देवच आपल्याला वाचवू शकतो ही भावना काही श्रद्धाळूंच्या मनात होती आणि त्यासाठीच त्यांना मंदिरात जाऊन देवाचे दर्शन घ्यायचे होते त्याची पूजा करून व देवाला साकडे घालायचे होते. अखेर काल त्यांची मनोकामना पूर्ण झाली आणि अखेर दीड वर्षांनी का होईना मंदिरे उघडली.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# भारतीय तुरुंगामधलं महिलांचं आयुष्य!



**दिशायन**

तुरुंग! तुरुंगात कोण राहतं? ज्यांनी देशाच्या कायद्या विरोधात कृत्य करून, त्यांचा गुन्हा सिद्ध होऊन कायदेशीररीत्या शिक्षा मिळते ते भोगतात तुरुंगवास! भारतीय न्यायव्यवस्थेत तुरुंगवास म्हणजे प्रायश्चित्त, गुन्हेगाराला सुधारण्याची दिलेली संधी असं मानलं जातं. यासाठी विविध तुरुंगांमध्ये विविध उपक्रम राबवण्यासाठी तरतुद केलेली असते. मात्र खरंच हे प्रत्यक्षात घडतंय का? तुरुंगात गुन्हेगारांना किमान माणसाप्रमाणे वागणूक मिळते का, तशा सोयी-सुविधा पुरवल्या जातात का?

तुरुंगांची आणि तुरुंगवास भोगणाऱ्यांची अवस्था काय आहे, विशेषत: महिला तुरुंगांची अवस्था, त्यांचं तुरुंगातील वेदनादायी आयुष्य यावर अपराजिता बोस यांनी नुकताच एक अहवाल सादर केलाय. यातून तुरुंगातील महिलांचं आयुष्य कसं असतं हे समोर आलंय, नेमकं या अहवालात काय आहे ते आपण या लेखातून जाणून घेऊया.

**एक बादली पाण्यात, ३ महिलांची आंघोळ**

अपराजिता बोस यांनी देशातील विविध तुरुंगातील महिलांशी संवाद साधला. बहुंताश महिलांची एक तक्रार म्हणजे, त्यांना एक क्षणाचाही खाजगीपणा किंवा एकांतवास मिळत नाही. महिला म्हणतात, आम्हाला एक क्षण तरी असा मिळावा जेव्हा आमच्याकडे कोणी बघत नाही. तुरुंगात सतत दु:ख करत असल्याचा, रडण्याचा, तक्रार करण्याचा आणि तुरुंग कर्मचाऱ्यांच्या ओरडण्याचाच आवाज असतो. कधीच शांतता किंवा सकारात्मक बोलणं नसतं. एका उन्हाळ्यात तुरुंगातच कोरडा दुष्काळ पडला होता. त्या काळात तुरुंगात मर्यादीत पाणी येत होतं. महिलांना पाच-पाच दिवस आंघोळही करता येत नव्हती. आंघोळ करण्याची संधी मिळाल्यावरही एका बादलीत तीन-तीन महिलांना एकत्र आंघोळ करावी लागत होती. फक्त एक बल्ब आणि एक पंखा पुरेल इतक्या लहान खोलीत ४५ महिलांना ठेवण्यासाठी, महिलांच्या शरीराची मापं घ्यायची आणि फक्त तेवढ्याच जागेत त्यांना झोपायला द्यायचं, अशी कोलकात्यातील प्रेसिडेन्सी करेक्शनल होमच्या अधिकाऱ्यांनी योजना आणली. ही योजना कितपत नैसर्गिक आहे, हा मोठा प्रश्नच आहे.

**तुरुंगातली स्त्री, कलंकीत!**

सामान्यपणे या महिलांना भेटायला कोणी येत नाही. चार-पाच वर्षात एखाद दोन वेळा कोणी येतं. मुख्यत्वे पहिल्या वर्षात कुटुंबीय भेटायला येतात, नंतर फारसे ते फिरकत नाहीत. या महिलांना कोणत्याही भागातल्या तुरुंगात शिक्षा भोगण्यासाठी पाठवले जाते. त्यामुळे कुटुंबीयांना फार लांबचा प्रवास करून यावे लागते. भारतात महिला तुरूंगांची संख्याच मुळात कमी आहे, त्यामुळे अनेकदा महिला कैद्यांना त्यांच्या घरापासून खूप लांब ठेवले जाते. कैदी महिला हा एक प्रकारचा कलंक मानला जातो. त्या कायदेशीररित्या प्रायश्चित्त करत असतात किंवा आपली शिक्षा भोगत असतात. मात्र शिक्षा संपल्यावरही त्या नैतिकदृष्ट्या कलंकितच राहतात. खूपदा त्या तुरुंगात असल्यापासूनच त्यांचं कुटुंब संबंध तोडून देतं, त्यांना घरी परत घेत नाहीत.

तुरूंग कैद्यांचं वर्गीकरण त्यांच्या कायदेशीर गुन्ह्यांनुसार करत असतील, पण एका तुरुंगाच्या सामाजिक समुहात, विशेषतः महिलांच्या तुरूंगात हे कायदेशीर गुन्ह्यांशी संबंधित नसते. ते रूढी, परंपरा आणि इतर अनेकदा धर्मांनी अनेक वर्षांपासून घालून दिलेल्या सामाजिक आणि नैतिक कलंकांचे अडथळे पार केलेलं असणं आणि त्यांना कायद्यापेक्षा जास्त पटीने गुन्हेगारी कलंकीत बंदी असल्याचं मानलं जातं, असं पेनल रिफॉर्म अँड जस्टिस असोसिएशनच्या महासचिव आणि पेनल रिफॉर्म इंटरनॅशनलच्या अध्यक्षा राणी धवन शंकरदा यांनी आपल्या विमेन इनसाइडः प्रिझन व्हॉइसेस फ्रॉम इंडिया (२०२०) या पुस्तकात लिहिले आहे.

**सीसीटिव्ही लावण्याची योजना विफल**

भायखळ्याच्या तुरुंगात एकदा अधिकाऱ्यांनी महिलांच्या बॅरेकमध्ये सीसीटीव्ही लावण्याचा निर्णय घेतला आणि त्यासाठी पावले उचलली. त्यावेळी तेथील कैद्यांनी विरोध केला. तुम्हाला सीसीटीव्ही लावायचे असतील तर तुम्ही अधिकाऱ्यांच्या कार्यालयात लावा कारण तिथेच कैद्यांवर अत्याचार होतो आणि लाचखोरी होते, असे महिलांनी ठामपणे सांगितले. आम्हाला बाहेरच्या जागी आणि मार्गिकांमध्ये कॅमेरे लावलेले चालत होते पण बॅरेकमध्ये नको होते. उन्हाळ्यात खूप गरम होत असे. त्यामुळे आम्ही अंगावर खूप कमी कपडे घालून झोपत असू, अशी समस्याही त्यांनी बोलून दाखवली. कैदी महिलांनी केलेला विरोध म्हणजे तुरुंग अधिकाऱ्यांना आंदोलन वाटलं. त्यांनी यातील मुख्य महिलेला पाच दिवस एकल तुरुंगवास भोगायला लावला. त्यानंतर मिडियाने हा विषय उचलला आणि बॅरेकमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी बसवलेली यंत्रणा काढून टाकण्यात आली.

**मासिक पाळी, स्त्री आणि तुरुंग!**

तुरुंगात महिलांचं सर्वाधिक शारिरीक शोषण होतं. न्यायालयाच्या कारवाई कामकाजातून परतल्यावर सगळ्यांसमोर त्या महिलेला किंवा महिलांना नि:वस्त्र होण्यास सांगितलं जातं. नग्न शरीरावर विविध प्रकारे अत्याचार केले जातात. महिलांच्या मासिक पाळीतही अशा प्रकारचं कृत्यं केलं जातं. मासिक पाळीदरम्यान महिलांना केवळ १२ सॅनिटरी पॅड्स दिले जात असत. जर कोणाला जास्त रक्तस्राव होत असेल तर त्यांना कापूस आणि चिकटपट्टी दिली जाते. कोलकात्याच्या प्रेसिडेन्सीच्या खोलीतच शौचालय होते. त्या खोलीतच ४४ महिला होत्या, अशावेळी स्वच्छतेचा अभाव ही मोठी समस्याच निर्माण होऊन बसते.

**तुरुंगातही सामाजिक समस्या**

तुरुंगातलं जेवण म्हणजे पोषक अन्न किंवा चव हा विषयच नाही. भातात अळ्या, भाज्यांमध्ये किडे असं असतं. देत असलेल्या अन्नाचा दर्जा आणि प्रमाण यासाठी नेहमीच कैद्यांना झगडावं लागतं. महिला, स्तनपान करणाऱ्या महिला, गर्भवती महिला आणि पुरुष यांना आखून दिलेल्या मॅन्युअलप्रमाणे पोषक अन्न देणं बंधनकारक असलं तरी कागदावरचं प्रत्यक्षात फारच कमी तुरुंगांमध्ये पाहायला मिळतं. देशातल्या मुंबईसारख्या मोठ्या शहरांमधील तुरुंगांत महिलांना त्यांचे हक्क माहिती होते. तेथे महिला कैद्यांनी कोणते कपडे घालावे यावर बंधनं नव्हती, मात्र हेच जिल्हा स्तरावरील किंवा इतर लहान शहरांमधील तुरुंगामध्ये जीन्स, कुर्ता-पायजमा, ड्रेस घालण्यास मनाई होती. याहूनही गंभीर म्हणजे तुरुंगांच्या मॅन्युअल्समध्ये जातीनिहाय प्रत्येक कैद्याची कामं वाटून दिलेली असतात. हे केवळ कामापुरतं मर्यादीत नसून तेथे जातीयवाद मोठ्या प्रमाणात पसरलेला आहे, यामुळे वागण्या-बोलण्यात आणि सर्वच बाबतीत भेदभाव केला जातो.

भारतातील १३५० तुरूंगांपैकी फक्त ३१ तुरूंग महिलांसाठी राखीव आहेत. फक्त १५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशात महिलांसाठी वेगळे तुरूंग आहेत. इतर सर्व ठिकाणी महिला कैद्यांना पुरूषांच्या मोठ्या तुरूंगांतील छोट्या तुरूंगात म्हणजे तुरुंगातल्या तुरुंगात ठेवलं जातं. भारतीय तुरुंगामध्ये पुरेशा वैद्यकीय सुविधा उपलब्ध नाहीत. तर, महिलांच्या तुरुंगात स्त्रीरोग तज्ज्ञांनी नियमितपणे भेटी देणं आवश्यक आहे. २०१६ मध्ये मॅन्युअलमध्ये बदल करून त्यात, प्रत्येक महिला तुरूंगात वैद्यकीय सेवा आणि किमान एक महिला स्त्रीरोगतज्ज्ञ असणं बंधनकारक आहे, मात्र याची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. अपराजिता यांनी तब्बल १३ वर्ष भारतातील तुरुंगाचा अभ्यास करण्यात घालवली. यातून त्यांना महिलांचं वेदनादायी जीवन समजलं आणि त्यांनी हे सत्यकथन लोकांसमोर मांडलंय. खरंतर भारतीय गुन्हेगारी यंत्रणेने पुनर्वसनाच्या आदर्शावर काम करणं गरजेचं आहे, तेव्हा हळूहळू महिला कैद्यांच्या समस्या दूर होतील, त्यांना समान वागणूक मिळेल आणि त्यांचं भविष्य सुधारेल.

# शेतीवर संशोधन झाल्यास देश प्रगत होईल - सूक्ष्म जीवशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. दीपक वेदपाठक

**लातूर/प्रतिनिधी**

कोणतेही संशोधन हे मनातून केले तर ते परिपूर्ण होते. संशोधनात कोणताही शॉर्ट कट नाही. मुळापर्यंत जाऊन केलेले संशोधन उपयोगी ठरते, त्यासोबतच मनाला आनंद देवून जाते. शेतीवर संशोधन करून आलेल्या निष्कर्षाची अंमलबजावणी केल्यास देशाची प्रगती होण्यास वेळ लागणार नाही, असा विश्वास येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील सूक्ष्म जीवशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. दीपक वेदपाठक यांनी व्यक्त केला. येथील संगणकशास्त्र व माहितीतंत्रज्ञान महाविद्यालयातील (कॉक्सिट) प्राध्यापकांसाठी संशोधन विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. वेदपाठक बोलत होते. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या सेमिनार सभागृहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉक्सिटचे प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे होते. यावेळी उपप्रचार्य डी. आर. सोमवंशी, डॉ. व्ही. व्ही. भोसले, ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. कैलास जाधव, प्रा. ईश्वर पाटील, प्रा. तानाजी खरबड यांची उपस्थिती होती. कॉक्सिटचे सर्वेसर्वा डॉ. एम. आर. पाटील हे माझे आदर्श आहेत. राजर्षी शाहू महाविद्यालयात असताना त्यांच्या मार्गदर्शनातच आम्ही शिक्षण घेऊन आज इथपर्यंत पोहोचलो, असे सांगून डॉ. वेदपाठक म्हणाले, भारत देश संशोधनात इतर देशांच्या तुलनेत मागे आहे. आपणाला संशोधनासाठी मोठ्या संधी आहेत. संशोधन करणे खूप सोपे काम आहे. आसपासच्या कोणत्याही गोष्टीवर संशोधन होवू शकते. मनातून केलेले संशोधन स्वतःच्या मनाला आनंद देवून जाते. संशोधनातून देश, समाजाला उपयोग व्हावा, असे विषय हाती घेणे गरजेचे आहे. स्वतःने स्वतःला एखाद्या विषयाशी निगडित सहा प्रश्न विचारून त्याची उत्तरे शोधणे म्हणजे संशोधन होय. भारत हा शेतीप्रधान देश आहे. या देशात शेतीवर संशोधनाला मोठा वाव आहे. शेतीशी निगडित संशोधन करून त्याचा उपयोग शेतीत केल्यास आपण जगाच्या पुढे जाऊन प्रगती करू, असा विश्वासही डॉ. वेदपाठक यांनी यावेळी व्यक्त केला.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे यांनी महाविद्यालयातील प्राध्यापकांसह पदव्युत्तर शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांनी स्वतः संशोधन करण्यास सुरुवात करावी, एखादा विषय घेऊन त्यात जीव ओतून अभ्यास करावा, त्यातून निघालेला निष्कर्ष हे परिपूर्ण संशोधन होते, संशोधनाला सुरुवात केल्यावर येणार्या अडचणी सोडवण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : अॅड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

क्राईम संध्या | सोमवार दि. ११ ऑक्टोंबर २०२१ ते रविवार दि. १७ ऑक्टोंबर २०२१ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com 

# मोबाईल दुकानात जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला ठोकल्या बेड्या



**अंबरनाथ/सुनिल तांबे**

मोबाईलचं दुकान फोडून चोरट्याने लाखो रुपयांचे मोबाईल्स चोरून नेल्याची घटना अंबरनाथमध्ये २ ऑक्टोबर रोजी घडली होती. याप्रकरणी पोलिसांनी अवघ्या तीन दिवसात फक्त एका हेक्सा ब्लेडवरून मार्ग काढत चोरट्याला बेड्या ठोकल्या आहेत.त्याच्याकडून चोरलेले १० लाख रुपयांचे मोबाईल्स आणि अन्य साहित्य हस्तगत करण्यात आलं अंबरनाथ पश्चिमेच्या स्टेशन रोडवरील राजेश मोबाईल्स या दुकानात २ ऑक्टोबरच्या मध्यरात्री चोरट्याने पत्रे फोडून प्रवेश केला होता. यानंतर ३ तास दुकानात थांबत त्याने १४ लाखांच्या मोबाईल फोन, स्मार्टवॉच यासह सीसीटीव्हीचा डिव्हीआर सुद्धा चोरून नेला होता.या चोरीमुळे पोलिसांना मोठं आव्हान निर्माण झालं होतं. अखेर घटनास्थळी सापडलेल्या हेक्सा ब्लेडवरून चोरट्याचा मार्ग काढत पोलिसांनी या चोरट्याला बेड्या ठोकल्या. महमद फिरोज नईम अहमद असं या चोरट्याचं नाव आहे. या चोरट्याने पोलिसांना दिलेल्या कबुलीनुसार २ ऑक्टोबरच्या मध्यरात्री तो राजेश मोबाईल्स या दुकानाच्या छतावर असलेल्या सिमेंटच्या पत्र्यांवर चढला. हे पत्रे फोडून आत असलेली लोखंडी ग्रील त्याने हेक्सा ब्लेडने कापली. यानंतर दुकानातील सिलिंगचं पीओपी फोडून त्यानं दुकानात प्रवेश केला. त्यानंतर अतिशय आरामात तब्बल तीन तास थांबून त्यानं निवडून निवडून महागातल्या फोन्सची आणि स्मार्ट वॉचची चोरी केली. ही घटना दुसऱ्या दिवशी उघड होताच मोठी खळबळ उडाली. स्थानिक व्यापाऱ्यांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. मात्र अखेर पोलिसांनी घटनास्थळी सापडलेल्या हेक्सा ब्लेडच्या साहाय्याने चोरट्या महमद फिरोज नईम अहमद याचा मार्ग काढत त्याला बेड्या ठोकल्याची माहिती उल्हासनगर परिमंडळ ४ चे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते यांनी पत्रकार परिषदेत दिली. महमद फिरोज हा अंबरनाथच्या मोहन नॅनो इस्टेट या मोठ्या गृहसंकुलात वास्तव्याला आहे. फक्त तिसरीपर्यंत शिकलेला हा चोरटा आत्तापर्यंत तीन वेळा दुबईला फिरून आलाय. त्याला महागड्या मोबाईलचा शौक असून त्याच्या वैयक्तिक वापराचे दोन आयफोन, एक आयपॅड, एक लॅपटॉप सुद्धा पोलिसांनी जप्त केलाय. विशेष म्हणजे इतकी मोठी चोरी करणाऱ्या या चोरट्यावर आधीचा एकही गुन्हा दाखल नसून त्यामुळे हा लॉकडाऊनमुळे तयार झालेला चोरटा आहे का? याही अनुषंगाने पोलीस तपास करतायत महमद फिरोज याला सध्या ९ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून पुढील तपास अंबरनाथ पश्चिम पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे करत आहेत.

# भिवंडीत शिक्षक सोसायटीच्या प्रवेशद्वारावरच तुंबले गटाराचे पाणी, दुर्गंधीने रहिवासी हैराण

**भिवंडी/आकाश गायकवाड**

शहरातील ताडाळी येथील शिक्षक वसाहत म्हणून प्रसिद्ध असलेल्या शिक्षक सोसायटीच्या मुख्य प्रवेश द्वारावर मनपाच्या दुर्लक्षित कारभारामुळे गटाराचे पाणी तुंबले आहे. विशेष म्हणजे या शिक्षक सोसायटीच्या बाजूला असलेल्या मुख्य गटाराच्या सफाईकडे मनपा प्रशासनाच्या दुर्लक्षित कारभारामुळे गटार तुंबले आहे. त्यामुळे आजूबाजूच्या रहिवासी इमारतींचे सांडपाणी तसेच मलनिस्सरनाचे दुर्गंधीयुक्त दूषित पाणी देखील या शिक्षक सोसायटीच्या मुख्य प्रवेश द्वारावर अडलेजात असल्याने शिक्षक सोसायटीच्या प्रवेश द्वारावर घाणीचे व गटाराचे साम्राज्य पसरले असल्याने परिसरात मोठी दुर्गंधी पसरली असून येथील रहिवासी नागरिक व शिक्षकांना घरी येता जातांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे या ठिकाणी एका बांधकाम व्यावसायिकाने या शिक्षक सोसायटीच्या बाजूला नव्या बांधकामासाठी दगड व माती भराव केला असल्याने पावसाळ्यात हि माती गटारात गेल्याने येथील गटार तुंबले आहे. शिक्षक सोसायटीच्या रहिवाशांनी मनपा प्रशासनाकडे अनेक वेळा लेखी पत्रव्यवहार केला असतांनाही मनपा प्रशासनाने



शिक्षकांच्या या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष केला असून शिक्षकांना मागील पाच महिन्यांपासून प्रवेशद्वारावर येता जातांना नाक मुठीत धरून दबकत दबकत आपल्या घरात प्रवेश करण्याची नामुष्की ओढवली आहे. तर कधीकधी बाहेर जातांना इमारतीच्या प्रवेशद्वारावर साचलेले गटाराचे पाणी अंगावर उडाल्याच्याही घटना अनेक रहिवासींसोबत घडल्या आहेत. दरम्यान लेखी पत्रव्यवहार व निवेदने देऊन तसेच मनपाची सर्व कर वेळेवर भरूनही आम्हाला मनपा प्रशासनाच्या उदासीनतेमुळे अशा नरक यातना सहन कराव्या लागत आहेत हे आमचे दुर्दैव आहे अशी संतप्त प्रतिक्रिया येथील रहिवासी सुमित जाधव यांनी दिली आहे.

# तरुणांनी नियमित व्यायाम करून आपले शरीर सुदृढ व निरोगी बनवावे- उप विभागीय अधिकारी आगे पाटील



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील नाणे गावातील अत्याधुनिक व्यायाम शाळेचे उद्घाटन जव्हारचे उप विभागीय अधिकारी भवानजी आगे पाटील यांच्या हस्ते शनिवारी (दि.९ ऑक्टोबर) पार पडले या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की राजेश राय यांनी सामाजिक बांधिलकी राखत नाणे गावातील तरुणांसाठी अत्याधुनिक व्यायाम शाळा उपलब्ध करून दिली आहे.या व्यायाम शाळेचा सदुपयोग करून तरुणांनी आपले शरीर सुदृढ व निरोगी बनवून आयुष्य उज्वल करावे. मुंबई स्थित राजेश राय यांची जेराई फिटनेस नावाची कंपनी असून त्यांनी नाणे गावातील व्यायाम शाळेला आधुनिक साहित्य देऊन येथील तरुणांनी याचा उपयोग करून स्वतःचे शरीर तंदुरुस्त करावे आणि विविध स्पर्धामध्ये भाग घेऊन आपले, आपल्या आई वडीलांचे, गावाचे तसेच देशाचे नाव उज्वल करावे या भावनेने या आधुनिक व्यायाम शाळेची उभारणी केली आहे. या प्रसंगी उप विभागीय अधिकारी भवानजी आगे पाटील यांच्यासह पोलीस निरीक्षक सुधीर संखे, जेराई फिटनेस कंपनीचे मालक राजेश राय, त्यांची पत्नी व सहकारी उपस्थित होते. या वेळी तरुणांना व्यायामासाठी लागणारे साहित्य भेट स्वरूपात देण्यात आले. देशातील प्रत्येक गावात अशा प्रकारची आधुनिक व्यायामशाळा बनवून देण्याचा मानस असून त्याची सुरुवात नाणे गावापासून केली आहे. ग्रामीण भागातील तरुण पिढी व्यसनाधीन होण्या पेक्षा व्यायाम करून शारीरिक तंदुरुस्ती राखत आयुष्यात प्रगती करावी एवढाच उद्देश असल्याचे मत जेराई फिटनेस कंपनीचे मालक राजेश राय यांनी व्यक्त केले.

# मोबाईल स्नॅचिंग करणाऱ्या अंतरजिल्हा टोळीतील एकाला अटक

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्हयात मोबाईल स्नॅचिंग व मोबाईल चोरी करणारी टोळी सक्रिय झाल्याने, सोलापूर जिल्हयात मोबाईल स्नॅचिंगच्या गुन्हयामध्ये वाढ झाली होती. त्या अनुशंगाने माहिती घेवुन वरिष्ठांनी अधिकाऱ्यांनी सदरच्या मोबाईल स्नॅचिंग व मोबाईल चोरी करणाऱ्या टोळीस अटक करून गुन्हे उघडकीस आणणेबाबत आदेशीत केले होते. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेकडील पोसई शैलेश खेडकर व पथकातील अंमलदार यांनी सदर गुन्हे कोणी केले असतील, याबाबत माहिती काढली असता, पथकास गोपनिय बातमीदारामार्फत सदरचे गुन्हे टाकळी येथील एका इसमाने त्याचे साथीदारासह केले असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर माहितीच्या अनुशंगाने खात्री केली असता, बातमीप्रमाणे एक इसम चोरी गेलेले मोबाईल व बुलेट मोटारसायकल घेवुन टाकळी ता. दक्षिण सोलापूर येथुन सोलापूर शहर येथे मोबाईल विक्री करीता जात असल्याची खात्री झाली.



त्या अनुशंगाने पथकाने वडकबाळ, ता. दक्षिण सोलापूर सापळा लावुन, बातमीतील वर्णनाच्या एका इसमास बुलेट मोटारसायकल व त्याचेकडील मोबाईलसह ताब्यात घेतले.

सदर इसमास त्याचेकडे असलेले मोबाईल व बुलेट मोटारसायकल याबाबत विचारपूस केली असता, त्याने सुरूवातीस उडवाउडवीचे उत्तरे दिली, परंतु त्यास अधिक विश्वासात घेवुन चौकशी केली असता, त्याने त्याचे इतर साथीदारसह सदरचे मोबाईल चोरी केल्याचे सांगितले. त्याचे ताब्यातील बुलेट मोटारसायकल सुध्दा त्याने स्वतः सोलापूर शहरातून चोरी केल्याचे सांगितले आहे. सदर इसमाच्या ताब्यातील विविध कंपन्याचे २२ महागडे मोबाईल व बुलेट मोटारसायकल असा एकुण ३,८२,००० किंमतीचा मुद्देमाल पुढील तपासकामी ताब्यात घेतला आहे. सदर इसमाच्या ताब्यात मिळालेले मोबाईल व बुलेट मोटारसायकल याबाबत चौकशी करून गुन्हे उघडकीस आले आहेत. अटक आरोपीकडुन एकुण ११ गुन्हे उघडकीस आले आहेत. तसेच गुन्हयातील अटक आरोपी हा पिंपरी पोलीस ठाणे, गुरनं ४६१/२०२१, भादंवि क्र. ३७९ या गुन्हयात पाहिजे आरोपी आहे. अटक आरोपीचे साथीदार यांचेवर पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणेस गुन्हे दाखल आहेत. सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर, सफौ. श्रीकांत गायकवाड, पोलीस अंमलदार सलीम बागवान, दिलीप राऊत, हरिदास पांढरे, रवि माने, सचिन गायकवाड, केशव पवार यांनी बजावली आहे.

# जेष्ठ पत्रकार दौलत घरत यांचे निधन

**भिवंडी/अभिजित हिरे**



भिवंडीतील जेष्ठ पत्रकार दौलत घरत यांचे प्रदीर्घ आजाराने मंगळवारी रात्री त्यांची प्राणज्योत मावळली. मृत्यू समयी त्यांचे वय ५५ वर्ष होते तर त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ, बहीण, पुतणे असा मोठा परिवार आहे. मागील अनेक वर्षापासून ते भिवंडीतील शहर व ग्रामीण भागातील पत्रकारितेत सक्रिय असताना दै. पुढारी, नवाकाळ, पुण्यनगरी या नामांकित दैनिकांमध्ये पत्रकार म्हणून ते कार्यरत होते. मागील दोन वर्षापासून त्यांना हृदयविकाराचा त्रास होता. मात्र अजारपणातही त्यांनी आपली पत्रकारिता जिवंत ठेवत पत्रकारिता सुरूच ठेवली होती. तालुक्यातील गुन्हे, कृषी व राजकीय घडामोडींवर दौलत घरत यांचे विशेष लक्ष असायचे. त्यांच्या निधनाने भिवंडीतील पत्रकारिता क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. मंगळवारी टेंभिवली येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी पंचक्रोशीतील अनेक मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी त्यांच्या निधना बद्दल शोक व्यक्त करीत तालुक्यातील सामाजिक प्रश्नाबद्दल जाणीव बाळगून लिखाण करणारा हाडाचा पत्रकार हरपला असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

# भिवंडीत स्टेम प्राधिकरणा कडून अनधिकृत नळ जोडणीवर पोलीस बंदोबस्तात कारवाई सुरू



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी, ठाणे व मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रासह भिवंडी तालुक्यातील ग्रामपंचायत क्षेत्रास पाणी पुरवठा करणाऱ्या स्टेम प्राधिकरणा कडून भिवंडी पालिका सह ग्रामपंचायत क्षेत्रातील अनधिकृत नळ जोडणी वर मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू केली असून त्यामुळे या पाण्यावर आर्थिक हित साध्य करणाऱ्यां मध्ये खळबळ उडाली असून कारवाई यापुढे ही सुरू राहणार असल्याचे संकेत स्टेम प्राधिकरणाने दिले आहेत. भिवंडी तालुक्यातील कांबे ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्टेम प्राधिकरणा कडून दररोज एक एमएलटी पाणीपुरवठा केला जातो. परंतु ही पाईप लाईन भिवंडी शहरातील ज्या भागातून जात आहे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अनधिकृत नळ जोडणी झाल्याने या ग्रामस्थांना कमी दाबाने अत्यल्प असा पाणी पुरवठा होत असल्याने कित्येक वर्षे या बाबत संघर्ष करून ही या परिस्थितीत बदल न झाल्याने ग्रामस्थांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करीत दाद मागितली असता न्यायालयाने पाणी ही प्रत्येकाची गरज असून ते त्यांच्या पर्यंत पोहचविण्याची व त्या ठिकाणी होत असलेली पाणी चोरी रोखण्याची जबाबदारी स्टेम प्रशासनाची असल्याचे स्पष्ट केल्या नंतर स्टेम प्रशासनाला खडबडून जाग आली असून मागील आठ दिवसां पासून खोणी, काटई, कांबे या ग्रामपंचायत क्षेत्रासह भिवंडी पालिका हद्दीतील मिल्लत नगर, नवीबस्ती, फेणापाडा, कामतघर, नारपोली या भागात मोठा पोलीस फौजफाटा घेऊन कारवाईस सुरवात केली आहे. आतापर्यंत झालेल्या कारवाईत तब्बल ३१० नळ जोडणी तोडण्यात आल्या असून या कारवाईत स्टेम प्राधिकरणाचे अधिकारी कर्मचारी, पालिका कर्मचारी यांसह शेकडो पोलीस सहभागी होत आहेत.

# स्व. एकनाथ मल्लू चव्हाण यांच्या १४व्या स्मृतीदिनास विनम्र अभिवादन!



७/१०/२००७ रोजी हा माझ्यासाठी व चव्हाण परिवारासाठी काळा दिवस ठरला. आज पासून १४ वर्षे पूर्ण झाली. माझे वडील खूप प्रेमळ व्यक्तिमत्त्व होते. लहानपणापासून समाजसेवाची व देशभक्तीची आवड खूप होती. तालुक्यात व गावात प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून प्रसिद्ध होते राजकारणात असतांना त्यांच्या शब्दाला खूप मान होते त्यांनी गावासाठी खूप विकास कामे केले लोकांचे अनेक अडी अडचणी सोडवण्यासाठी पुढाकार घ्यायचे व ते स्वखर्चाने सोडवून दिले असे प्रत्यक्ष अनुभव घेतलेले त्यांचे सहकारी मित्रांचा अनुभव सांगितले तसेच लोकांने दिलेले प्रेम, आपुलकी, मान सन्मान हे मी स्वतः बघितले आहे कारण मी माझ्या वडिलांच्या जोडीला लहानपणापासून असायचो. जेव्हा वडिलांना हृदयविकार चा झटका आला तेव्हा मी वसई (मुंबई)ला रहायचो, पण माझे काका व नातेवाईक यांनी त्यांना तातडीने चाळीसगाव च्या पवार हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी दाखल केले पण नियतीने वेगळंच काही ठरवलं होतं आणि वडिलांनी प्राणज्योत मावळली.संध्याकाळी ०६ वाजता ही घटना घडली होती ०७ वा मला माझ्या भावानी फोन केला की वडील आपल्याला सोडून गेले तर मग मी स्तंभ राहलो व मला काहीही सुचत न होत. व मी रडायला लागलो आणि मला विश्वास बसत न होत की माझे वडील मला सोडून कसे जाऊ शकतात कारण की मी१५ वर्षाचा होतो आणि माझ्यावर पूर्ण परिवाराची जबाबदारी पडली आणि ती मी पूर्ण करणार असं संकल्प मी त्या दिवसापासून केलेलं आहे ते संकल्प मी आज पण पूर्ण करत आहे. वडिलांबदल लिहिण्यासारखं खूप काही आहे. पण इथेच थांबतो! रुबाबदार व्यक्तिमत्त्व व समाजसेवक, राजकारणी स्व.एकनाथ मल्लू चव्हाण यांना विनम्र अभिवादन!

**– मच्छींद्र एकनाथ चव्हाण, वसई**

# देवणी येथील पशुवैद्यकिय अधिकारी अंकुश पाटील यांचा शिवसेनेने केला सत्कार



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथील पशुवैद्यकिय अधिकारी डा सरवदे हे सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या जागी जवळगा येथुन पदोन्नती होऊन नव्यानेच रुजु झालेले साह्यक पशुधन विकास अधिकारी पशुवैद्यकिय दवाखाना देवणी येथे रुजु झालेले डा अंकुश पाटील यांचा देवणी तालुका शिवसेनेच्या वतिने सत्कार करुण पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी शिवसेना तालुका उपप्रमुख नितीन देशमुख, संगायो सदस्य बालाजी बिरादार, पप्पु उर्फ सुशिलकुमार सुर्यवशी, कृष्णा पिंजरे, प्रकाश गायकवाड बोंबळीकर, संजय कुमदाळे, संदीप येरमे यांच्यासह कर्मचारी व्हि एच कपाळे, अंशकालीन कर्मचारी राजकुमार जिवणे उपस्थित होते.

# धानेश्वरी हॉटेलवर छापा; दोन किलो गांजा जप्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील कोर्सेगाव येथील धानेश्वरी हॉटेलवर अक्कलकोट दक्षिण पोलिसांनी छापा टाकून २३ हजार रुपये किमतीचे २ किलो गांजा जप्त करून हॉटेल मालकाला अटक करण्यात आली आहे. याबाबत अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. आरोपी इरणा राजशेखर हस्ते (२७) याने कोर्सेगाव येथील आपल्या धानेश्वरी हॉटेल येथे गांजा विक्री करीत असल्याचा सुगावा खबरी मार्फत अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याच्या पोलिसांना मिळाला. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मादक पदार्थ व गुटखा यांच्याविरोधात आठवड्यात सुरू केलेल्या ऑपरेशन ड्राईव्ह अंतर्गत, अक्कलकोट उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. संतोष गायकवाड, अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप काळे यांच्या नेतृत्वाखाली धानेश्वरी हॉटेलवर पोलिसांनी छापा टाकला २३ हजार ३१९ रुपये किमतीचे २ किलो ३१९ ग्रॅम गांजा जप्त करून हॉटेल मालकाला अटक करण्यात आली आहे. अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे हे करीत आहेत.

# सरकारने पंचनाम्याची नौटंकी थांबवून सरसकट हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर करावी रिपाईची मागणी



**देवणी/प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.) ता.देवणी च्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री यांना देवणी तहसीलदार मार्फत निवेदन देण्यात आले. सदरील निवेदनात देवणी तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. त्यामुळे या पंचनाम्याची नौटंकी बंद करून सरकारने सर्व शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी पन्नास हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी करण्यात आली.

यावेळी रिपाई देवणी तालुका अध्यक्ष गणेश कांबळे दवणहिप्परगेकर, उपाध्यक्ष धनराज गायकवाड, देवणी शहराध्यक्ष विक्रम बोरे, तालुका युवा अध्यक्ष भिमदर्शन बोरे, कार्याध्यक्ष विवेक कांबळे, रोहीत डोंगरे, रामदास कांबळे, वैभव भुरे आदि कार्यकर्ते उपस्थित होते.

11 TO 17 OCTOBER 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 09/10/2021 10:33 PM Page 1



पान १ वरून....

## फिर्यादीलाच संशयाच्या भोवऱ्यात...

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यांतील कर्जत पोलिस ठाणे हद्दीतील सावेळे येथे काल मध्यरात्री म्हैसीचा गोठ्यात एका ७५ वर्षीय वृद्धाची निर्घृण हत्या झाल्याने कर्जत तालुक्यांत प्रचंड खळबळ माजली आहे. या घटनेची नोंद कर्जत पोलिस ठाण्यात करण्यात आली असुन कर्जत पोलिसांनी घटनास्थळी धाव घेवुन काही संशयीतांना चौकशीसाठी ताब्यांत घेतले आसल्याची माहीती पोलिस सुत्रांकडुन मिळाली आहे. या बाबत कर्जत पोलिस सुत्रांकडुन मिळालेल्या माहीतीनुसार, कर्जत तालुक्यांतील मौजे सावेळे येथिल आरिफ हजिमियाँ मुल्ला यांचे सावेळे येथे म्हसीचा गोठा आहे. काल रात्री १.३० वाजता या म्हैसीचा गोठ्यात रात्री १.३० वाजताचा दरम्यान आरिफ हजिमियाँ मुल्ला (वय ६५) आणि गणपत रामजी जाधव (वय ७५) दोघे रा. सावेळे हे दोघे जेवण खावण करुन झोपले होते. त्याचवेळी रात्री १.३० वाजता या गोठ्यात अनोळखी ४ इसम घुसले आणि त्यांनी फिर्यादी आरिफ यांचे अंगावरील, तोंडावरील गोधडी तोंडावर दाबून ठेवुन फिर्यादी यांचे हातपाय धरुन तोंड गोधडीने दाबुन फिर्यादीचा पोटावर व पाठीवर हाताबुक्क्याने मारहाण करुन त्यांचा गळा दाबुन कोणीतरी अज्ञात इसमाने जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच फिर्यादी सोबत असणारे सावेळे बौद्धवाडी येथील गणपत रामजी जाधव यांसदेखील या अज्ञात इसमांनी हाताबुक्क्यांनी मारहाण करुन कोणत्यातरी हत्याराने डोक्यावर व तोंडावर वार करुन जखमी करुन जीवे ठार मारल्याने कर्जत तालुक्यांत प्रचंड खळबळ माजली आहे. ही हत्या कोणी व का केली असावी याबाबत मात्र सारेच संभ्रमात सापडले आहेत. या घटनेची फिर्याद जखमी आरिफ हाजिमियाँ मुल्ला यांनी कर्जत पोलिसात दिली असुन कर्जत पोलिस ठाण्यात या घटनेची नोंद गुन्हा रजि नंबर २६५/२०२१ भादवि कलम ३०२, ३०७, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या घटनेने मात्र कर्जत हादरले असुन पोलिसांनी काही संशयीतांची कसुन चौकशी सुरु केल्याने सांगणेत आले आहे. दरम्यान या खुन प्रकरणी रायगड जिल्ह्याचे पोलिस अधिक्षक अशोक दुबे यांनी तपासाबाबत पोलिसांना सुचना केल्या असुन या घटनास्थळी रायगडचे अप्पर पोलिस अधिक्षक अतुल झेंडे यांनी भेट दिली आहे. या खून प्रकरणाचा अधिक तपास कर्जकचा पोलिस निरीक्षक सुवर्णा पत्की ह्या रायगडचे पोलिस अधिक्षक अशोख दुधे, अप्पर पोलिस अधिक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलिस अधिकारी संजय शुक्ला यांचा मार्गदर्शनाखाली करीत आहेत. यावेळी या घटनास्थळी स्थानिक गुन्हे अन्वेशन शाखा रायगड यांनी भेट दिली आसुन तपासाबाबत कर्जत पोलिसांना मार्गदर्शन करीत आहेत. कर्जत पोलिस या घटनेतील आरोपींचा कसुन शोध घेत आहेत. कर्जत पोलिस ठाण्याचा पोलिस निरीक्षक सौ. सुवर्णा पत्की यांनी लवकरच लवकर आरोपींचा मुसक्या आवळण्यात येतील असा विश्वास यावेळी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला आहे.

## उसन्या पैशांवरून दोघांमध्ये वाद...

निळे रंगाचे प्लॅस्टीकचे पिशवीत मानवी शरीराचं दोन हाथ, दोन पाय व मांडी या अवयवांचे तुकडे मिळून आले होते. त्यामुळे परिसरात खळबळ उडाली होती. लगेच या घटनेची माहिती एपीएमसी पोलिसांना देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी पोहचल्यानंतर पोलीसांनी अत्यंत बारकाईने निरीक्षण करायला सुरुवात केली. निळे रंगाचे प्लॅस्टीकचे पिशवीतील मानवी अवयवाचे दोन हाथ, दोन पाय व मांडी या तुकड्या व्यतिरिक्त तेथे काही ही मिळाले नाही. कोणीतरी अज्ञात आरोपीने अज्ञात इसमाचा खुन करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मानवी शरीराच्या अवयवाचे तुकडे एपीएमसी परिसरात टाकल्याची खात्री पटल्याने त्याच दिवशी एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा र. क्र .३३४/२०२१ कलम ३०२ , २०१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह, पोलीस सह आयुक्त, डॉ.जय जाधव, पोलीस उप आयुक्त परि.-१ सुरेश मेंगडे, सहा.पोलीस आयुक्त विनायक वस्त यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास रामुगडे, पोलीस निरीक्षक अंजुम बागवान (गुन्हे), सपोनि वसिम शेख कडाळे, टकले, शेवाळे, पोउपनिरी आव्हाड, पोहवा. धुमाळ, पोना.सुधीर कदम, पाटील, मपोना नलावडे, पोशि विलास भोर व अमोल भोसले इत्यादी करू लागले. मिळून आलेले मानवी अवयव हे कोणाचे आहेत? याबाबत कोणतीही उपयुक्त माहिती उपलब्ध नव्हती. तुकड्यांवरून मृतकाची ओळख पटवणे शक्य नव्हते. जो पर्यंत मृतकाची ओळख पटत नाही तो पर्यंत आरोपी मिळणं दुरापास्तच होते. पोलिसांनी मिळून आलेले अवयवांचे बारकाईने सुक्ष्म निरीक्षण व परिक्षण केले. तेव्हा मिळून आलेले अवयवापैकी उजवे हातावर रविंद्र व हनुमानाचे चित्र गोंदलेले असल्याचे दिसून आले. त्या आधारे मृतक व आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची चार विशेष पथके स्थापन करण्यात आली. हे पथके ठाणे, रायगड, मुंबई व नवी मुंबई परिसरात रवाना करण्यात आली. या पथकांकडून, गुप्त बातमीदारांना माहिती देवून तसेच तांत्रीक तपास करुन, ठाणे, मुंबई व नवी मुंबई आयुक्तालयातील पोलीस ठाण्यातील मिसींग अभिलेखाची पडताळणी करण्यात आली. या पडताळणी दरम्यान १०० पेक्षा जास्त मनुष्य मिसींगचा आभ्यास केला. दरम्यान मयताच्या वर्णनाशी मिळती जुळते वर्णनाचा एक इसम कोपरखैराणे पोलीस ठाणे हद्दीतून मिसींग असल्याबाबत माहिती मिळाली. पोलीस पथकाने कोपरखैराणे पोलीस ठाणे गाठून घटनेची माहिती घेतली. तेव्हा रवि उर्फ रविंद्र रमेरा मंडोटीया हा ३० वर्षाचा इसम गेल्या तीन दिवसांपासून बेपत्ता असल्याची मिसिंग तक्रार त्याची पत्नी ज्योती रविंद्र मंडोटीया हिने पोलिसांत केल्याची माहिती मिळाली. या बाबत कोपरखैरणे पोलीस ठाण्यात मनुष्य मिसींग नोंद क्र. ५९/२०२१ प्रमाणे नोंद करण्यात आली होती. त्यामुळे पोलीस पथकाने मिसींगची खबर देणारी महिला सौ.ज्योती रवि उर्फ रविंद्र मंडोटीया हिचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने अधिक सखोल तपास केला. तसेच मिळुन आलेले मानवी अवयवांची ओळख पटवण्यासाठी तिला ते अवयव दाखवण्यात आले. उजवे हातावर रविंद्र व हनुमानाचे चित्र गोंदलेले पाहून हे अवयव माझा पती रवि उर्फ रविंद्र रमेश मंडोटीया याचे असल्याचे ज्योती हिने निक्षून सांगितल. आता मृतकाची ओळख पटली होती. पण त्याची इतकी क्रूरपणे हत्या का करण्यात आली याचे गूढ उकल नव्हते. त्यासाठी पोलीस गुन्हयातील आरोपीचा कसून शोध घेत होते. सुरुवातीला पोलीसांनी मृतकाची पत्नी हिच्याकडे देखील चौकशी केली. पण तिने कानावर हात ठेवले. अनैतिक संबंधतून ही हत्या झाली असावी असा कयास बांधण्यात आला होता. त्यादृष्टीने तपास ही सुरू होता. तर दुसरीकडे तपास पथकाने गुप्त बातमीदार, सीसीटीव्ही कॅमेरेची पाहणी करून आरोपीची शोध मोहीम सुरू केली होती. याच दरम्यान पोलिसांनी सुमीतकुमार हरिषकुमार चौहान (वय २७), राह. सेक्टर -१२ डी, कोपरखैराणे, नवी मुंबई, मुळ गाव बदायु, उत्तर प्रदेश यास गुन्हयाचे तपासकामी संशयित म्हणून ताब्यात घेण्यात आले. सुमीतकुमार चौहान याच्या कडे कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. ती पुढील प्रमाणे! रवि उर्फ रविंद्र रमेश मंडोटीया आणि सुमीतकुमार चौहान दोघेही उत्तरप्रदेश येथील गावाकडील रहिवासी होते. तसेच ते एकमेकांचे नातेवाईक होते. पण दूरचे. दोघेही नवी मुंबई कोपरखैरणे येथे वेगवेगळ्या ठिकाणी राहत होते. रवि उर्फ रविंद्र रमेश मंडोटीया याने सुमितला काही उसने पैसे दिले होते. १७ हजार रुपये सुमित कडून येणे असल्याने रवी सारखा त्याच्या कडे पैशाचा तगादा लावत होता. सुमित कडे पैसे नसल्याने तो सारखा रवीला टाळत होता. मात्र असे आणखी किती दिवस टळणार? हा प्रश्न त्याच्या पुढे उभा होता. आज ना उद्या घेतलेले पैसे त्याला परत करावेच लागणार होते. कोरोनामुळे हाताला कामधंदा नसल्याने आणि पैशाची आवक नसल्याने सुमित ही टेन्शन मध्ये होता. इकडे रवीला पैशाची गरज असल्याने तो सारखा पैशासाठी त्याच्या कडे तगादा लावत होता. सुमित कडे द्यायला पैसे नव्हतं. शेवटी सततच्या तगादाला कंटाळून सुमितने रवीचा खात्मा करण्याचा बेत आखला. तो दिवस होता ९ सप्टेंबर २०२१ चा. त्यादिवशी सुमितने रवीला दारूची पार्टी करायची आहे असे सांगून त्याला राजी केले. रवीची बायको मुले घरात नसल्याने त्याने ही एकएक प्याक हो जाये असे म्हणत पार्टीला होकार दिला. रात्री सुमित दारूच्या बाटल्या घेऊन रवीच्या घरी आला. दिघेही दारू प्यायले. सुमितने रवीला भरपूर दारू पाजली. त्यामुळे त्याची शुद्ध हरपली. रवीला दारू खूप झाल्याने तो पेंगु लागला. रवी आता शुद्धी वर नाही हे लक्षात येताच सुमीतने जवळील सुऱ्याने रवीचा गळा चिरला .तशाच रक्ताच्या चिरकांड्या उडाल्या. तो तडपडू लागला. काही वेळात त्याची तडपड शांत झाली. त्यानंतर सुमितने रवीच्या शरीराचे तुकडे तुकडे केले. ते तुकडे प्लास्टिकच्या पिशवीत भरले. त्यापैकी दोन हाथ, दोन पाय व मांडी हे मानवी अवयव एपीएमसी पोलीस ठाणे परिसरात तर धड महापे परिसरात टाकून त्याने पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र एपीएमसी पोलीसांनी १४ सप्टेंबर रोजी सुमितकुमार चौहान याच्या मोठ्या शिताफीने मुसक्या आवळल्या आणि या गुन्ह्याची उकल केली. आरोपीने महापे येथे मयताचे पुरुन ठेवलेले मुंडके दोन पंच व कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे समक्ष उकरुन काढून पुढील कार्यवाहीकामी ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच गुन्हयातील आरोपीचे रक्ताने माखलेले कपडे व गुन्हयात वापरलेले हत्याराचा पोलीस तपास करीत आहेत. सुमितला २२ सप्टेंबर पर्यत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. रवीशी सुमीतचे मैत्रीचे संबंध होते. आर्थिक देवाण - घेवाण व जुन्या भांडणामधून सुमितने रवीला दारु पाजून त्याचा खुन केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झालेले आहे. खुन केल्यानंतर पुरावे लपवण्यासाठी त्याने मयताच्या शरीराचे तीन हिश्यात तुकडे करुन तीन वेगवेगळया ठिकाणी टाकलेले होते. एपीएमसी पोलीस ठाण्याच्या पथकाने अतिशय मेहनतीने व सातत्याने पाठपुरावा करुन कोणताही दुवा नसताना अत्यंत कौशाल्याने सदरचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

## आजारपणाचा झाला होता डोक्याला ...

हा मिळेल ते मजुरीचे काम करीत असतो. त्यात तो एका पायाने अंपग असल्याने जास्त काम करीत नव्हता. त्याचा मुलगा अफान याला जन्मापासूनच फिट्सचा विकार असल्याने त्याच्या औषध उपचारासाठी त्या दाम्पत्यांचे बराच पैसे खर्च होत होता. तरी ही अफान याच्या प्रकृतीत काहीच फरक पडला नव्हता. त्यांनी त्याला मुंबई पर्यत चांगल्या दवाखान्यात दाखविले होते. कोण काय उपचार सांगले ते करीत होते. त्याला उपचारासाठी ते इचलकरंजीसह सांगली, कोल्हापूर आदी ठिकाणी घेऊन जात होते. हल्ली दवाखान्याची पायरी चढायची म्हणजे सर्व सामान्य कुटूंबाला नाकी नऊ येत असते. त्यातच अफान याच्या औषध उपचाराचा खर्च सिंकदर याला पेलवत नव्हता. तरी ही तो कुंटूंबाचा राहट गाडा कसा तरी चालवित होता. त्याच्या घरची परिस्थीत बघून शेजारी व मित्र मंडळी ही त्याला थोडी फार मदत करीत होते. हल्ली दोन मुलांचा, अफानचा औषध उपचाराचा खर्च वाढल्याने सिंकदर याची पत्नी शाहीन ही पहाटेच कामाला जात होती. तर अलिकडे घरच्या परिस्थितीला वैतागून सिंकदर हा कधी तरीच कामाला जात होता. त्यातच कोरोना महामाहीमुळे लॉकडाऊनचे कारण त्याला मिळाले होते. आठवडयातून एकदा दोनदा अफान याला दवाखान्यात न्यावे लागत होते. त्याच्या फिट्सचा विकार वाढत होता. घरात किंवा रस्त्यावर त्याला फिट आली की तो डोळे पांढरे करून पडत होता. त्यावेळी ते त्याच्या नाकाला कांदा अगर चप्पल लावणे असे घरगुती उपचार करीत होते. तो जसा मोठा होईल तसा त्याचा विकार वाढत होता. त्यामुळे सिंकदर आणि त्याची पत्नी शाहीन याना करावे आणि काय नको असे होत होते. तरी ही ती माय आपल्या लाडक्या लेकासाठी दिवस रात्र राब राब राबवित होती. कुणी कडून तरी आपल्या मुलाला बरे वाटू दे. देवाने आपल्या पदरात असले मुल घातले आहे याचा दोष ती आपल्याकडे घेत होती. त्यातच सिकंदर हा अफानच्या आजारावरून आणि त्याच्या दवाखान्याच्या होणाऱ्या खर्चावरून तो पत्नी शाहीन हिच्याबरोबर नेहमी दारू पिऊन येवून भांडण काढत होता. तिला या गोष्टीवरून मारहाण ही करीत होता.याचा सगळा दोष तो तिच्या माथी फोडत होता. तुझ्याच पापाने तू असले मुल जन्माला घातले आहे असे म्हणून तो तिला दोषी ठरवून मी तुला तलाक देतो तुझे तू दोन्ही मुलाना घेऊन जा असे सांगत होता. ती त्याचे बोलणे खावून मार खावून गप्प गार राहत होती. सिंकदर याला त्याचे नातेवाईक याबाबत समजावत होते. पण तो आपल्याला दोषी न मानता पत्नी शाहीन हिलाच दोषी धरत होता. अलिकडे तर सिंकदर हा काम धंदा न करताच घरातच राहत होता. मित्राच्या बरोबर दारू पिऊन दिवसभर इकडे तिकडे फिरायचे आणि दोन वेळचे खायचे असा त्याचा नित्यक्रम झाला होता. त्यामुळे घर चालवयाचे म्हटले की दोन्ही हातांनी राबावे लागते हे त्याला कळत नव्हते. फक्त बायको बरोबर अफानच्या आजारावरून भांडण काढायचे एवढेच त्याला माहित होते.त्यामुळे शाहीन ही दोन्ही मुलांना त्याच्या जबाबदारीवर टाकून पहाटेच कामाला जात होती आणि रात्री उशिरा घरी परतत होती.आपल्याच नशिबाचे भोग म्हणून ती डोळ्यात पाणी आणून दोन्ही मुलाकडे बघत कसे तरी जीवन आणि दिवस ढकलत होती.याचे सिंकदर याला काहीच सोयर सुतक नव्हते. दारू पिले की त्याला काय वाटेल ते सुचत होते. अफान मुळे आपल्या जीवनाची वाट लागली आहे असे तो म्हणत होता. त्याच्याकडे बघत मनात त्याला शिव्या घालत होता.त्याला तो मारहाण ही करीत होता.छोटा अफान हा निरागस होता.त्याला पित्याच्या मनातील काही कळत नव्हते.तो गोड हसायचा आणि पित्यालाच बिलगायचा. त्याला पिता सिकंदर याचा लळा लागला होता.कारण आई शाहीन ही पहाटे कामाला गेली की रात्री उशिरा परत येत होती. त्यामुळे त्याची आईशी जास्त जवळीकता नव्हती. तरी ही शाहीन ही पोटचा मुलगा म्हणून रात्री त्याला आपल्या कुशीत घेऊन झोपत होती. त्याला आईचे प्रेम देत होती.आपल्या प्रेमात त्या माऊलीने काहीच त्याला कमी पडू दिले नाही. कसा का असेना तो आपल्या पोटाचा गोळा आहे.आज ना उदया देव आपले चांगले करेल असे तिला वाटत होते.मात्र सिकंदर याला अलिकडे अफान हा नकोसा वाटू लागला होता.त्याचे काय करायचे असा विचार तो करीत होता. एक तर दिवसे दिवस त्याच्या औषध उपचाराचा खर्च वाढत होता. तरी ही त्याला गुण काही येत नव्हता. त्यामुळे सिकंदर हा वैतागलेला होता. अफानचे काही तरी बरे वाईट करायचे असा विचार त्याच्या मनात दारू पिल्यानंतर यायचा. यातूनच तो रागाच्या भरात अफान याला मारहाण ही करू लागला होता. याकारणातून त्या पती पत्नीत सारखा वाद होऊ लागला होता. मै तो अफान की जान ले लुंगा असे म्हणत तो त्याचेवर दात ओठ खात होता. नवरा बायकाचे भांडण विकोपाला गेल्यावर गेल्या काही महिन्यापूर्वी सिकंदर हा घरात कोणाला काही न सांगता निघून गेला होता. काही महिने तो घराकडे परत आलाच नाही. त्याच्या घरच्या लोकांनी ही त्याचा शोध घेतला नव्हता. गेला असेल कुठे तरी येईल फिरून म्हणून त्याची पत्नी शाहीन आणि नातेवाईक गप्प बसले होते. अशातच तो काही महिन्यांनी घराकडे परत आला.घराकडे परत आल्यावर त्याच्या पत्नीने नातेवाईकांना बोलावून घेतले होते. त्यावेळी नातेवाईकांनी त्याला चांगलेच खडसावत तू अफानला चांगले सांभाळ, त्याच्या औषध उपचाराचा खर्च कर. घराकडे बायकोकडे लक्ष दे. अशी समज दिली होती. काही दिवस असेच निघून गेले होते त्याच्या मनात अफान विषयी राग होता. तो त्याच्या औषध उपचाराचा खर्च करू शकत नव्हता. त्याला काय करावे काय नको असे झाले होते. त्याच्या मनात नको ते विचार येत होते. अफानचे बरे वाईट केल्याशिवाय आपण यातून सावरू शकणार नाही असे त्याचे ठाम मत झाले होते. त्याला कसे मारायचे त्याचा कसा जीव घ्यायचा याचा तो सतत विचार करीत होता. त्याने धाडस करून अफानचा जीव घ्यायचाच असा विचार केला आणि... गुरूवार दि.३० सप्टेंबर २०२१ रोजी सायंकाळी ५.३०च्या दरम्यान घरात कोण नसताना त्याने अफानला सायकलीवर बरोबर घेतले. कबनुरातून सायकलीने तो पाच ते सहा कि.मी. अंतरावर असणाऱ्या इचलकरंजीतील पंचगंगा नदीवरील मोठया पुलावर आला.तो पर्यत रात्रीचे ७.३० वाजले होते. सायकलीवरून तो अफान याला नदी दाखवत असल्याचे नाटक करीत होता. एका पायाने तो अपंग असल्याने बघणाऱ्यांना ही त्याचे काही वाटत नव्हते. त्यावेळी त्या पुलावरून तशी तुरळक वाहातूक होती. पंचगंगेला पाणी ही भरपूर होते. अफानकडे बघत तो त्याला म्हणाला मी तुझ्या औषध उपचाराचा खर्च करू शकत नाही म्हणून मर असे म्हणत त्याने पूलावर कोणी येत नसल्याचे बघून सायकलीवरून अफानला उचलले आणि थेट नदीच्या पाण्यात टाकले. तो पाण्यात पडून बुडल्यावर त्याने इकडे तिकडे बघून तेथून पोबारा केला. रात्री ९ ते १०च्या सुमारास दारू पिऊन येवून त्याने पत्नी शाहीन हिला आपण अफान याला पंचगंगा नदीच्या पुलावरून टाकून त्याला मारले असल्याचे सांगितले. सुरूवातीला त्या माऊलीला खरे काही वाटले नाही पण तेच तेच तो सांगत असल्याने तिने शेजारीच राहत असलेल्या आपल्या नातेवाईकांना बोलावले. त्यावेळी ही सिंकदरने तेच सांगितले. नातेवाईकांनी खडासाऊन विचारल्यावर आपल्याला त्याच्या औषध उपचाराचा खर्च पेलत नाही म्हणून त्याला मारून टाकले आहे हे ऐकून शाहीन ही बेशुध्द होऊन पडली. नातेवाईकांनी तिला पाणी मारून शुध्दीत आणल्यावर ती धाय मोकून रडत होती. अफानला मारून टाकल्याची खात्री पडताच तिने नातेवाईकासह शिवाजी नगर पोलीस स्टेशन गाठून सिंकदर विषयी तक्रार नोंदवली. त्याच्या तक्रारीवरून पोलीसांनी सिंकदर मुल्ला याला ताब्यात घेऊन त्याचेकडे अफान विषयी चौकशी केली असता त्याने पोलीसाना ही तेच सांगितले. त्याच्या सांगण्यावरून पोलीसांनी इचलकरंजीच्या आपत्ती व्यवस्थापनाला कळविले.त्याच्या मदतीने पोलीसांनी पंचगंगा नदी पात्रात रात्र भर अफानचा शोध घेतला मात्र तो सापडला नाही.रात्री उशिरा त्यांनी शोध मोहीम थांबविली. दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवार दि.२ ऑक्टोंबर रोजी परत पोलीसांनी आपत्ती व्यस्थापन बरोबर पंचगंगा नदी पात्रात शोध मोहीम राबविली असता त्याचा मृतदेह कुरूंदवाड ता.शिरोळ येथील पंचगंगा नदी पात्रात मिळून आला. पोलीसांनी तो मृतदेह शवविच्छेदनासाठी आयजीएम रूग्णालयात पाठवून देऊन शाहीन सिकंदर मुल्ला (वय ३५) सनी कॉर्नर कबनूर हिच्या तक्रारीवरून अफान सिकंदर मुल्ला (वय ५) याला नदीत ढकलून देऊन त्याचा खून केल्या प्रकरणी सिंकदर हुसेन मुल्ला (वय ४८) रा.कबनूर सनी कॉर्नर याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,२०१ नुसार गुन्हा दाखल करून त्याला इचलकरंजी येथील प्रथम वर्ग न्यायालयासमोर उभे केले असता मा.न्यायालयाने सिंकदर मुल्ला याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.पोलीस कोठडी दरम्यान सिंकदर मुल्ला याने आपला गुन्हा कबुल केला.या घटनेचा पुढील तपास शिवाजी नगर पोलीस स्टेशनचे पोलीस करत आहेत.

## पत्नीवरच्या संशयामुळे बाप हैवान...

मुलगा आरव याची आभाळ होत होती. नवरा बायकाचे त्याच्याकडे लक्षच नसायचे. त्यातच रविवार ता. ३ ऑक्टोबर २०२१ रोजी आरव हा संध्याकाळाच्या सुमारास घराशेजारील दुकानातून फुगा आणायला म्हणून गेला तो लवकर घराकडे परत आलाच नाही. त्यामुळे राकेश साधना आणि त्याच्या नातेवाईकांनी आरव याचा रात्री उशिरापर्यंत शोध घेतला पण तो काही त्यांना मिळून आला नाही. दुसऱ्या दिवशी सोमवार सकाळी केसरे याच्या घराशेजारची एक बाई केसरे याच्या घराच्या पाठीमागे असणाऱ्या जागेत काही कामानिमित्य गेली असता तिला एका ठिकाणी आरव याचा मृतदेह पडला असल्याचे दिसून आले. मयत आरव याच्या अंगावर हळद, कुंकू आणि गुलाला टाकला असल्याचे बघून ती बाई ओरडतच गेली. तिच्या आरडा ओराडा करण्याने राकेश केसरे आणि त्याची पत्नी साधना केसरे हा घाबरून घराबाहेर आले असता तिने त्यांना तुमचा आरव तुमच्या घराच्या पाठीमागे मृतावस्थेत पडला असून त्याचे अंगावर हळद-कुंकू, गुलाला टाकला आहे त्यामुळे राकेश आणि साधना त्याचे नातेवाईक घटनाठिकाणी गेले. तेथील ते भयानक दृश्य पाहून सगळेच हाबकून गेले. घराशेजारच्या दुकानातून फुगे आणण्यासाठी गेलेला आरवाचा मृतदेह सापडल्याने त्याची हत्या कुणी आणि कोणत्या कारणातून केली याची चर्चा गावात दबक्या आवाजात होऊ लागली. आरव या सहा वर्षीय मुलाची हत्या ही नरबळीतून केल्याची चर्चा वारणा कापशी आणि परिसरातून होऊ लागली. अगोदरच गेल्या एक दोन महिन्यात कोल्हापूर जिल्हयात तीन लहान मुलाच्या हत्या झाल्या होत्या. त्यातच आरव केसरे याच्या हत्येची घटना ही चौथी घटना होती. त्यामुळे आरव याची हत्या करण्यामागे नरबळीचाच संशय व्यक्त करण्यात येवू लागला होता. त्याला कारण ही तसेच होते. मयत आरव याच्या अंगावर हळद, कुंकू , गुलाला टाकला गेल्याने तशी शक्यता ही होती. या घटनेची माहिती शाहूवाडी पोलीस स्टेशनला कळविण्यात आली. घटनास्थळी तातडीने शाहुवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस दाखल झाले. विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया, जिल्हा पोलीस अधिक्षक शैलेश बलकवडे, अप्पर पोलीस अधिक्षक तिरूपती काकडे यांनी घटनास्थळी भेट देवून परिस्थितीची पाहणी केली. या संवेदनशील घटनेचा तपास करून संशयीत आरोपीना लवकरात लवकर जेरबंद करण्याच्या सुचना त्यांनी पोलीसांना दिल्या. मयत आरव केसरे या सहावर्षीय मुलाचा मृतदेह घरापाटीमागच्या शेजारी असणाऱ्या बोळात शंकास्पद रित्या मिळून आल्याने पोलीसांनी तपासाला सुरूवात केली. त्यासाठी पोलीसांनी श्वान पथकाची मदत घेतली. हे श्वान पथक पाटील गल्लीतील आरव याच्या आजोळातील घर व मागे असणाऱ्या एका बेकरी पर्यत जावून घुटमळले होते. त्यातच मयत आरव याच्या नात्यातील एका वृध्द महिलेवर ते भुंकत होते. पोलीसांनी त्या वृध्द महिलेची चौकशी सुरू केली पण त्यातून ठोस काही पोलीसांच्या हाती लागले नाही. घटना ही संवेदनशील असल्याने पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला आणि तो शवविच्छेदनासाठी शाहूवाडी येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. मयत आरव याचे वडिल म्हणजे राकेश केसरे यांनी आरव हा बेपत्ता झाल्याची तक्रार सोमवारी दाखल केली.त्याच्याकडे ही पोलीस चौकशी करत होते. घटनास्थळाची पोलीस बारकाईने पाहणी करीत होते.घटनास्थळी वरिष्ट पोलीस अधिकाऱ्याबरोबर शाहुवाडी उपविभागीय पोलीस अधिक्षक रविंद्र साळोखे,सायबर सेलचे शशीराज पाटील स्थानिक गुन्हे अन्वेषनचे पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव, शाहुवाडीचे पोलीस निरीक्षक विजय पाटोळे,राधानगरीचे पो.निरी. आप्पासाहेब कोळी, कोडोलीचे पो.निरी.दिनेश काशिद, कळे पोलीस स्टेशनचे स.पो.नि. प्रमोद सुर्वे, फॉरेन्सिक लॅब, श्वान पथक हे सर्व जण कामाला लागले होते. दिवसभर वारणा कापशी परिसरासह आजूबाजूच्या परिसरात मयत आरव याच्या गुढ हत्येची चर्चा होताना दिसत होती. बहुतेक लोकांच्या मते मयत आरव याची हत्या ही नरबळीतून झाली असावी. नातेवाईका पैकी कुणी तरी पाळत ठेवून गुप्त धनासाठी त्याची हत्या ही केलेली असावी. पोलीसाचां ही तसाच कयास होता. त्या अनुषंगाने पोलीस या घटनेचा तपास करीत होते. परंतू पोलिसांच्या हाती ठोस असेच काहीच लागत नव्हते. पोलीसांच्यावर ही या घटनेने दडपण आलेले होते. मयत आरव केसरे याची हत्या कुणी आणि कोणत्या कारणातून केली याचा उलगडा करणे हे त्याच्या पुढे आव्हान होते. पोलीसांनी केसरे याच्या कुंटूंबातील वृध्देसह तिघा चौघांना संशयावरून ताब्यात घेऊन चौकशीला सुरूवात केली. नरबळी किंवा भानामतीच्या प्रकरातून अशा घटना घडत असतात याचा अंदाज पोलीसांना होता. म्हणून ते त्या ॲंगलने चौकशी करीत होते. मयत आरव याच्या घरच्या लोकांच्या बोलण्यात त्यांना वारंवार विसंगती दिसून येत होती. त्यातच मयत आरव याचा वडील राकेश केसरे हा वारंवार आपला जबाब बदलत होता. तो आरव हा बेपत्ता झाल्याचे सांगत होता. तर नातेवाईकांपैकी कुणी तरी एकाने आपल्या मुलाचा घात केला असावा असे ही सांगत होता. तर राकेश याच्या घरचे इतर लोक ही या घटनेबद्दल पोलिसांना वेग वेगळी माहिती देत होते. त्यामुळे काही काळापुरते पोलीस ही चक्रावले होते. पोलिसांनी मयत आरव याचे वडिल राकेश केसरे,साधना केसरे राकेश याचे आई-वडिल यांना चौकशीसाठी शाहुवाडी पोलीस स्टेशनला आणले. या घटनेचा तपास करीत असताना दिवसभर पोलीसांनी कमालीची गुप्तता बाळगली होती. त्यातच पंचनामा करत असताना मयत आरव याच्या अंगावरती जखमा आढळून आल्या होत्या. त्यामुळे त्याला कुणी तरी मारहाण ही केली असावे अशी शक्यता पोलिसांनी गृहीत धरली. पोलीस नातेवाईकाडे चौकशी करीत असताना त्याना आता आरव याच्या पोस्ट मार्टम रिपोर्टची प्रतिक्षा होती. संध्याकाळी पोलीसाना आरव याच्या पोस्ट मार्टम रिपोर्टचा आहवाल मिळाला. त्यात त्याचा गळा आवळल्याने श्वास गुदमरून मृत्यू अशी नोंद होती. याचा अर्थ त्याचा गळा कुणी तरी आवळला होता. त्याची हत्या करून कुणी तरी अज्ञाताने त्याचा मृतदेह त्याच्याच घराच्या पाठीमागे टाकला होता. या घटने पाठीमागे नक्कीच घराचा भेदी असणार याची खात्री आता पोलिसांना पटली होती. वारंवार राकेश केसरे हा आपला जबाब बदलत असल्याने या घटनेमागे त्याचा हात असण्याची शंका पोलीसांना येत होती. म्हणून पोलीसांनी राकेश पासून त्याच्या घरच्या लोकांना बाजुला म्हणजे दुसऱ्या रूममध्ये बसवले. आणि राकेश केसरे याच्याकडे आपल्या पध्दतीने चौकशी करीत असताना त्याला पोलिसीखाक्या दाखवून त्याला बोलते केले. आणि काय आर्श्चय पोलीसाचा संशय खरा ठरला. या घटनेमागे घरचा भेदी म्हणजे त्याचाच हात असल्याचे पुढे आले. पोलीस चौकशीत राकेश केसरे याने धक्कादायक असा खुलासा करीत त्यानेच आपल्या सहावर्षीय मुलाचा खून केल्याचे कबुल करून या घटनेला वेगळीच कलाटणी दिली. त्याने पोलीसांना दिलेली माहिती ऐकून पोलीस ही चक्रावले होते. या घटनेत फिर्यादी बापच खूनी निघाला होता. त्यामुळे नरबळी भानामती यासारख्या शंका कुशंकाना पुर्ण विराम मिळाला होता. राकेश केसरे आणि त्याची पत्नी साधना याच्यात नेहमी भांडण होत होते. त्याने तिच्याबरोबर प्रेमविवाह केलेला असला तरी तो तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. त्यातून तो साधनाला पहिला मुलगा माझा आहे. दुसरा झालेला आरव माझा नाही. तु कोणाबरोबर झोपून काढली आहेस बघ असे खालच्या पातळीवर जाऊन तिला खरे खोटे सुनावत होता. राकेश हा सनकी आणि तापट स्वभावाचा आहे हे तिला माहित होते. म्हणून ती बऱ्याच वेळेला दुर्लत्र करीत होती. त्याच्या रागीट स्वाभामुळे त्याचे कधीच कोणाशी पटत नव्हते. घरात तो सारखा पत्नीबरोबर भांडत असायचा तिला मारहाण करीत असायचा. तो सासुरवाडीत म्हणजे वारणा कापशी येथे राहत होता. तो राहत असलेल्या ठिकापासून त्याचे सासु सासरा आणि एक अविवाहित मेहुणी राहत होते. साधना ही राकेश बरोबर भांडण झाले की लगेच आपल्या माहेरच्या घरी जात होती. याचा राग राकेश याला येत होता. तो मिळेल तेथे सेंट्रींगचे काम करीत होता. रविवार संध्याकाळी त्याला एके ठिकाणी काम मिळणार होते. त्या कामासाठी त्याला पार्टीला भेटायला जायचे होते. त्याआधी त्याला घरी चहा पिण्याची हुक्की आली.पण घरात साधना नव्हती. ती बाहेर कुठे तरी गेली होती. कामावर जाण्यापूर्वी त्याला चहा लागतो हे तिला माहित असुन ही ती बाहेर गेली आहे हे बघून त्याला साधनाचा राग आला होता. चहा पिल्याशिवाय तो हॉटेलात जाणार नव्हता.घरात बायको नाही आणि चहा ही मिळत नाही म्हणून तो वैतागलेला होता. त्याचा स्वभाव अगोदरच चिडचिड करणार असल्याने तो घरात चिडचिडपणा करीत शिव्या देवू लागला होता. त्यातच घराशेजारील बाहेरील अंगणात आरव हा खेळत होता. त्याने आरवला त्याच्या मम्मीला बोलावून आणण्यास सांगितले. ती यावेळी नेमकी तिच्या आई वडिलाकडे गेली असणार हे त्याने गृहीत धरले होते. त्यामुळे तो आधिकच जास्त चिडला होता. आरवला त्याने तुझ्या आजोबाच्या घरी जा. आणि तुझ्या मम्मीला बोलावून आण जा म्हणून सांगितले. पण आरव खेळण्यात मग्न असल्याने तो जायला तयार नव्हता. उलट तो फुगे आणण्यासाठी राकेशकडे पैसे मागू लागला होता. त्यामुळे तो आरव कडे बघून जास्त चिडला. जा की कार्टया अगोदर मम्मीला बोलावून आण असे राकेशने वैतागून म्हटल. पण तो काही जागचा हालेना. हे बघून राकेशचा तिळपापड झाला. त्याने रागाच्या भरात खेळत असणाऱ्या आरवला उचलले आणि त्याला भिंतीवर आपटले. त्यासरशी आरव हा जोराचा मार लागल्याने ओरडत खाली पडला.त्याच्या डोक्यातून रक्तस्त्राव होऊ लागला होता. तरीही त्याचा राग शांत होत नव्हता. तो मनात काही तरी फुटफुटतच खाली पडलेल्या आरवच्या छातीवर दोन तीन ठोसे जोरात लगावले. तो तडफडत असताना त्याने त्याचा गळा दाबून धरला. तसे आरवचा श्वास गुदमरला गेला. त्यातच त्याचा मृत्यू झाला. साधना घरी येण्या अगोदर त्याने लगबगीने घरामागे असणाऱ्या आपल्या एका पडक्या खोलीत त्याचा मृतदेह नेवून ठेवला. त्यानंतर तो गुपचुपपणे कामाला गेला. रात्री उशिरा परत आल्यावर त्यानेच घरात कुठे आरव दिसत नाही याचा जाब साधनाला विचारत तिच्यावरच खेकसत तिला मारहाण करू लागला. त्याला खरे तर साधनाला मारून टाकायचे होते. त्या दोघांचे पटत नसल्याने वारंवार होणाऱ्या भांडणाला कंटाळून त्याला तिचाच खून करावा असे कायम वाटायचे. पण तशी संधी मिळत नव्हती. त्यातच घटनेच्या वेळी ती माहेरच्या घराकडे गेल्याने त्याचा राग उफाळून आला होता.म्हणून घरी आल्यावर त्याने साधना बरोबर भांडण काढले. आणि आरव बेपत्ता झाल्याची बोंब ठोकली.त्याने आपण केलेला गुन्हा लपविला होता. त्याने केलेले कृत्य कुणालाच माहित नव्हते. त्यामुळे आरवचा शोध तो घेवू लागल्यावर कुणालाच कसली शंका आली नाही.त्याचवेळी त्याने आपला मुलगा हा खेळता खेळता बेपत्ता झाल्याची तक्रार पोलीसात दिली. यामागे त्याचा उद्देश पोलीसांना आपला संशय येवू नये एवढाच होता. त्यानंतर त्याने घरात सगळेजण झोपल्यावर रात्रीच्या सुमारास उठून त्या पडक्या खोलीतून त्याचा मृतदेह बाहेर काढला त्याच्या अंगावर हळद कुंकू आणि गुलाल टाकून त्याचा मृतदेह परत आपल्या घराच्या पाठीमागे असणाऱ्या बोळातील पडक्या रिकाम्या जागेत नेवून टाकला. इकडे सोमवारी सकाळी शेजारच्या बाईला आरव याचा हळद कुंकू, गुलाला टाकल्याचा मृतदेह दिसल्यावर नरबळीची आणि भानामतीची चर्चा होऊ लागली होती.राकेश केसरे याने आपला गुन्हा कबुल करीत नरबळीच्या आणि भानामतीच्या शंकेची अफवा पसरविले होते. आरव ऐवजी त्याला पत्नी साधना हिचा खून करायचा होता. आणि त्यानंतरच पोलीसात हजर व्हायचे होते. कारण तिचे बाहेर कुठल्यातरी तरूणाबरोबर संबंध आहेत. ती त्याच्याबरोबर गुलछर्रे उडवित असते. त्यांना झालेला दुसरा मुलगा आरव हा त्याचा नाही असे त्याचे म्हणणे होते. म्हणून तो आधी बायकोचा खून करणार होता. त्यांनतर आरवला मारणार होता. असे त्याने पोलीसांना सांगून एक प्रकारे धक्काच दिला होता. या घटनेची लेखी तक्रार साधना केसरे याचेकडून पोलीसांनी लिहून घेतल्यावर आरव राकेश केसरे(वय ६) याचा खून करून पुरावा नष्ट केले प्रकरणी राकेश रंगराव केसरे (वय २८) रा.वारणा कापशी याच्या विरोधात शाहुवाडी पोलीसात भा.दं.वी.कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता, मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.

पान ८ वरून....

## संवेदनहीन असलेल्या सरकारला जागे ...

अहवाल सादर केला किती मदत मागितली त्यासाठी किती वेळा आवाज उठवला याची माहितीही त्यांनी द्यावी असं आवाहन यावेळी करण्यात आला जे मुख्यमंत्री त्यांच्या कॅबिनेट मंत्री मधील मंत्र्यांना भेटत नाहीत ते मराठवाड्यातील आमच्यासारख्या आमदाराला काय भेटणार त्यापेक्षा अन्नत्याग आंदोलन करून त्यांना जाग आणण्याचे काम आम्ही करणार असल्याचं एका प्रश्नाच्या उत्तरात आमदार निलंगेकर यांनी स्पष्ट केले. जुलै महिन्यात लातूर जिल्ह्यातील कांही भागामध्ये ढगफुटी सदृष्य परिस्थिती निर्माण होवून अतीवृष्टी झालेली होती. यामध्ये झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकर्यांना मदत द्यावी अशी मागणी आम्ही शासन व प्रशासन यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. मात्र हि मदत जाहीर झालेली नसून जुलै महिन्यात अतीवृष्टीच्या नुकसानीपोटी सरकारने ३६५ कोटी रूपये जाहीर केलेले असले तरी यामध्ये लातूर जिल्ह्याचा समावेश नसल्याचा धक्कादायक खुलासा आ.निलंगेकर यांनी यावेळी केला. यावरूनच पालकमंत्री यांना जिल्ह्यातील शेतकर्यांप्रती कोणत्याच संवेदना नसल्याचे स्पष्ट होते असे आ.निलंगेकर यांनी यावेळी सांगितले.सप्टेंबर महिन्याच्या सुरूवातीस पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांना पत्र देवून जलप्रकल्पात साठणारे पाणी तात्काळ कालव्याद्वारे सोडावे अशी मागणी करून आगामी काळात पाऊस पडला तर त्याची साठवणूक योग्य पध्दतीने होईल असेही यामध्ये नमुद केले होते. मात्र या मागणीकडेही दुर्लक्ष केल्याने अतीवृष्टीनंतर अचानकपणे जलप्रकल्पातील पाणी नदीपात्राद्वारे सोडल्याने जिल्ह्यात जे शेतीचे नुकसान झाले त्याची जबाबदारी पालकमंत्र्यांचीच असून या जबाबदारीपोटी पालकमंत्र्यांनी शेतकर्यांना त्याची उत्तरे देवून तात्काळ याबाबतचा खुलासा करावा अशी मागणीही आ.निलंगेकर यांनी केली.यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष आमदार रमेश कराड यांनी अतीवृष्टीने जिल्ह्यात झालेल्या नुकसानीची माहिती देवून सदर नुकसानीची पाहणी भाजपाच्यावतीने करण्यात आलेली असून आता शासनाने सरसकट मदत जाहीर करून ज्यांच्या जमिनी खरडून गेल्या आहेत त्यांना विशेष अनुदान द्यावे अशी मागणी यावेळी केली. जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांना व आघाडी सरकारला शेतकर्यांच्या प्रश्नांशी कांही देणे-घेणे नसल्यामुळे अतीवृष्टी झाल्यानंतर दोन मंत्रीमंडळाच्या बैठका झाल्या तरी यामध्ये अतीवृष्टीच्या नुकसानभरपाईसाठी कोणतीच चर्चा अथवा घोषणा झाली नाही. यावरूनच हे सरकार मराठवाडा व शेतकरी विरोधी असल्याचे दिसून येते. यापुर्वीही शेतकर्यांसाठी आम्ही ज्या मागण्या केलेल्या त्या मागण्या पुर्ण होण्यासाठीच आता झोपलेल्या सरकारला जागे करण्याकरिता अन्नत्याग करण्यात येत असल्याची माहिती आ.रमेश कराड यांनी यावेळी दिली.

या पत्रकार परिषदेला जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहुल केंद्रे, जिल्हा संघटन सरचिटणीस संजय दोरवे, किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस दिलीपराव देशमुख, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष साहेबराव मुळे, जि.प.सभापती रोहीदास वाघमारे, बापूसाहेब राठोड, मनपा गटनेते शैलेश गोजमगुंडे, पंडीत सुर्यवंशी आदिंची उपस्थिती होते.दरम्यान अतीवृष्टीने ज्या शेतकर्यांचे नुकसान झालेले आहे. त्या नुकसानीची माहिती घेण्याकरिता आणि त्यांना मदत मिळवून देण्यासाठी भाजपाच्यावतीने मिसकॉल अभियान राबविण्यात येत आहे. याकरिता ८०९४०१७२७२ हा नंबर असून यावर मिसकॉल करत शेतकर्यांनी आपल्या नुकसानीची माहिती द्यावी आणि त्याचबरोबर जे अन्नत्याग अंदोलन करण्यात येत आहे त्यासाठी पाठींबाही द्यावा असे आवाहन यावेळी माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले.

## शेतकऱ्यांच्या मागण्या साठी छावा...

करण्यात आले आहे शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य होईपर्यत हे आंदोलन चालूच राहील अशी भूमिका आंदोलकांनी घेतली आहे. पारंपारिक संबळ वाजवत गळ्यात कवड्यांच्या माळा घालून कपाळावर मळवट भरून शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी सरकारला सुबुद्धी यावी म्हणून आई जगदंबेला अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी साकडे घालीत जागरण गोंधळ आंदोलनाला प्रारंभ केला आहे. संघटनेच्या विद्यार्थी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे, भगवानदादा माकणे, विष्णू कोळी, यांच्यासह अनेक कार्यकर्ते तसेच महिला व पुरुष आराधी आणि गोंधळी या आंदोलनात सहभागी झाले आहेत. जागरण गोंधळ सारख्या या अनोख्या आंदोलनाने औसा तालुक्यातील प्रशासनाचे व राजकीय नेत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

## नांदेडमध्ये इंधन माफिया व सरकारी ...

मोहीम राबविण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार आता नांदेडजिल्ह्यात तपासणी पथकांची नियुक्त करण्यात आली किंवा नाही हे जनतेला तरी माहित नाही. ग्रामीणसाठी तहसीलदार पथकप्रमुख असून, पुरवठा निरीक्षक, वैधमापन शास्त्र निरीक्षक, तेल कंपनीचे भेसळविरोधी अधिकारी हे सदस्य असतील. शहरासाठी धान्य वितरण अधिकारी हे पथकप्रमुख, वैधमापन शास्त्र निरीक्षक, एचपीसी तेल कंपनीचे अधिकारी सदस्य असतील. अशाच पद्धतीने पथके स्थापन करण्यात येणे महत्वाचे होते पण नांदेड जिल्ह्यातील पेट्रोल व डीझेल पंम्प मालकांनी जिल्हाधिकारी याना निवेदन देऊन या विरुद्ध कडक कार्यावाही करण्याचे सूचित केले होते पण ते सर्व नांदेड जिल्ह्यात फोल ठरले आहे. नांदेड हा जिल्हा मोठा असून त्यात सोळा तालुके आहेत. तेंव्हा सजग राहून असे प्रकार वेळीच थोपवले पाहिजेत पण प्रशासनाच्या अर्थपूर्ण संम्बाधामुळे हे सर्व प्रकार राजरोसपणे चालतात. हे डीझेल हॉटेल व धाब्यावर आणि बार व पानपट्टीच्या माध्यमातून पोचवले जाते. ट्रक व मालवाहू मोठी वाहने यात हे इंधन सहज वापरले जाते. त्याचा फटका शासनास बसत आहे व प्रदूषण मोठया प्रमाणात वाढत आहे. याचे काहीही देणेघेणे त्यावर नियंत्रण ठेवनाऱ्या यंत्रणेस नाही. सामान्य जनता व शासन मान्य पेट्रोल पंपधारक शासनाच्या या बेजबाबदार धोरणावर नाराज आहेत. सदरील यंत्रणा आतातरी झोपेतून उठेल की नाही हा प्रश्न सतावतो आहे.

## चांगल्या कार्याला कधीही निधीची...

प्रास्तविकात त्यांनी समाजाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. महाराजा अग्रसेन यांच्या कार्यावरही त्यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन राहुल अग्रवाल यांनी तर आभार प्रदर्शन सुरेंद्र अग्रवाल यांनी केले. यावेळी अग्रवाल समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अखेर दीड वर्षानंतर शाळेत ...

अंतर राखण्यासाठी प्रत्येक बाकड्यावर एका विध्यार्थ्याची बसण्याची व्यवस्था केली होती. तालुक्यात जिल्हा परिषद व खाजगी अशा एकूण ३५७ शाळा असून त्यापैकी आज ३१ शाळा सुरु आहेत तर १११ शाळांमध्ये मतदान केंद्र असल्याने व जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने काही शाळांना सार्वजनिक सुट्टी असल्याने त्या बंद आहेत. या शाळेतील एकूण ४४२३ विध्यार्थी उपस्थित होते. तालुक्यातील एकूण २५० शिक्षकांनी कोविड-१९ प्रतिबंधात्मक लस घेतली असून हजर विध्यार्थ्यांच्या पालकांनी संमती पत्रही दिले आहेत.

## वाडा नगर पंचायत येथे कायदे विषयक...

पुरविण्यात येणाऱ्या सेवांबद्दलची माहिती पत्रके वाटप करून जनजागृती केली. सदर कार्यक्रमास न्यायाधीश म.दा. सैंदाणे, वाडा तालुका वकील संघाचे पदाधिकारी अँड.सी.पी.पाटील, अँड.जितेंद्र गायकवाड, नगर पंचायतचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी तसेच न्यायालयीन कर्मचारी हजर होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विधीज्ञ संतोष डेंगाणे यांनी केले.

## लाखिमपुरखिरीमध्ये शेतकऱ्यांना...

सीटवर बसला होता. अशा तऱ्हेने या हत्याकांडाचा एक महत्वाचा साक्षीदार सापडल्याने भाजपला विनाकारण बदनाम करणाऱ्या काँग्रेसचे भांडे फुटले आहे. त्यामुळे या प्रकरणी दोषी असणाऱ्या सर्वाना कठोर शिक्षा करावी अशी मागणी बाबूभाई यांनी केली आहे.

11 TO 17 OCTOBER 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 09/10/2021 10:34 PM Page 1



# राज्यात आजपासून मिशन कवच कुंडल अभियान

## दररोज १५ लाखांहून अधिक लसीकरणाचे उद्दिष्ट; सार्वजनिक आरोग्यमंत्री राजेश टोपे यांची माहिती



**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यातील कोविड-१९ लसीकरणाला आणखी गती यावी यासाठी ८ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर पर्यंत मिशन कवच कुंडल अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानात राज्यात दररोज १५ लाखांहून अधिक लसीकरण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी सांगितले. सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री.टोपे यांनी या अभियानाबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी काल रात्री राज्यातील जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका अधिकारी यांच्याशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून सविस्तर चर्चा केली. अभियानाच्या अंमलबजावणीबाबत सूचना दिल्या.

अभियानाबाबत माहिती देताना श्री. टोपे यांनी सांगितले की, राज्यात ८ ते १४ ऑक्टोबर दरम्यान हे मिशन कवच कुंडल अभियान राबवले जाईल. केंद्र सरकारने १५ ऑक्टोबरपर्यत देशभरात १०० कोटी नागरिकांना कोविड लस देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातून भरीव योगदान दिले जावे, असे केंद्र सरकारकडून सांगण्यात आले आहे. त्यासाठी अभियानाचे नियोजन करण्यात आले आहे. या अभियानात ग्रामीण आणि निमशहरी भागातील नागरिकांचे लसीकरण करण्यावर भर दिला जाणार आहे. अभियानाची अंमलबजावणी प्रभावी होण्यासाठी महसूल, ग्राम विकास, महिला व बाल विकास, शिक्षण, नगर विकास अशा विविध विभागांचा सहभाग घेतला जाणार आहे. अभियानासाठी पुरेशा लस उपलब्ध आहेत. सध्या राज्याकडे ७५ लाख लस उपलब्ध आहेत. आणखी २५ लाख लस उपलब्ध होणार आहेत. सिरींज आदी अनुषंगिक साहित्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. राज्यातील सव्वा नऊ कोटी नागरिकांचे लसीकरण करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी सहा कोटी नागरिकांचे लसीकरण करण्यात आले असून आणखी सव्वातीन कोटी पेक्षा जास्त नागरिकांचे लसीकरण शिल्लक आहे. अभियानाच्या कालावधीत जास्तीत जास्त नागरिकांचे लसीकरण करण्याचा उद्देश आहे. सध्या पहिला डोस घेतलेल्या नागरिकांचे ६५ टक्के तर दुसरा डोस घेतलेल्या नागरिकांचे प्रमाण साधारणपणे टक्के आहे. लसीकरणाचा वेग वाढावा यासाठी या अभियानात समाजातील विविध घटकांचा सहभाग घेतला जाणार आहे. त्यामध्ये इंडियन मेडिकल असोसिएशन, खाजगी डॉक्टर, रोटरी क्लब, लायन्स क्लब, स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग घेतला जाणार आहे, असे श्री. टोपे यांनी सांगितले. कोविडमुळे मृत्यू पावलेल्या राज्यातील प्रत्येक नागरिकांच्या नातेवाईकांना ५० हजार रुपये मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोरोनामुळे सुमारे १ लाख ४० हजार नागरिक मरण पावले आहेत. यासाठी एसडीआरएफ मधून सुमारे ७०० कोटी रुपयांचे तरतूद केली जाणार आहे. यासाठी पोर्टलवर जिल्हाधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांना माहिती भरावी लागेल. त्यानंतर मृत्यू झालेल्या रुग्णांच्या नातेवाईकांच्या खात्यात मदतीचे पैसे जमा होतील, असे राजेश टोपे यांनी स्पष्ट केले.

# तहसीलदार लिंबारे यांनी मंद्रुपचा पदभार घेतला महसूल प्रशासन लोकभिमुख होणार - डॉ. बगले



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुपच्या तहसिलदारपदी शासनाने एका शेतकरी पुत्राची नियुक्ती केल्यामुळे आत्ता खरोखरच महसूल प्रशासन लोकभिमुख होणार आहे, असे प्रतिपादन कॉंग्रेसचे नेते डॉ.बसवराज बगले यांनी केले. तत्कालीन वादग्रस्त तहसीलदार उज्वला सोरटे यांची अखेर बदली झाल्याने त्यांच्या रिक्त पदावर मंद्रुपचे नूतन तहसीलदार राजशेखर लिंबारे यांनी गुरुवारी दुपारी पदभार घेतला. त्याप्रसंगी मानाचा फेटा बांधून, शाल, पुष्पहार देऊन जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे माजी प्रवक्ते डॉ.बसवराज बगले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला. यावेळी सोलापूर परिवहन समितीचे माजी सभापती विजयकुमार हत्तुरे, मंद्रुपचे समाजसेवक मळसिध्द मुगळे, राष्ट्रवादीचे सिध्दाराम जानकर यांनीही तहसीलदार लिंबारे यांचा सत्कार केला. कारकलचे महानिंगप्पा बिराजदार, अप्पासाहेब चितापुरे, संजय लोणारी, महादेव पाटील यांच्यासह अनेक मान्यवर हजर होते. तलाठी संघटचनेच्या वतीनेही रावसाहेब कोकरे आणि पदाधिकारी यांनी सत्कार केला.

# बापाने केला पोटच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

एका अल्पवयीन मुलीवर नराधम बापाने आपल्या पोटच्या मुलीवर बलात्कार केला. या प्रकरणी नराधम बापाला मध्यवर्ती पोलिसांनी अटक करून गुन्हा दाखल केला. पुढील तपास मध्यवर्ती पोलीस करीत आहे. घटनेची माहिती अशी की मे महिन्यापासून हा नराधम बाप आपल्या अल्पवयीन मुलीला स्पर्श करून वेगवेगळ्या प्रकारचे विकृत चाळे करत होता. तर दारूचं प्रचंड व्यसन असल्याने ऑगस्ट महिन्यात नराधम बापाने दारूच्या नशेत आपल्या पोटच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केला. तू कोणाला सांगितलं तर तुला व तुझ्या आईला जीवे मारणार असं धमकवत होता. या धमकीने ही अल्पवयीन मुलगी फार घाबरून गेली होती. घटनेचा प्रकार आपण कुणाला सांगीतला तर बाप आपल्या मारहाण करेल ही भीती तिला सारखी वाटत होती. ह्या भीती पोटी ती कुणाला काहीच सांगू शकत नव्हती. यामुळे तिने आपल्या होत असलेला अन्यायाला वाचा फुटावी म्हणून मोबाइलवर वेगळे स्टेट्स ठेवत होती. गेल्या काही महिन्यांपासून आपली मुलगी असे स्टेट्स का ठेवत आहे? याचा विचार आई करू लागली. मुलीची आई मुंबईत खाजगी नोकरीत करत असल्याने मुलीकडे लक्ष नव्हतं. याचा फायदा नराधम बापाने घेतला. त्या नंतर आईने मुलीला विश्वासात घेऊन तू असे का स्टेट्स ठेवत आहेस? याची विचारणा केली. तेव्हा मुलीने भीतीपोटी काहीच सांगितले नाही. दोन ते तीन दिवसांनी परत नातेवाईक व आईने विचारल्यावर मुलीने धक्कादायक माहिती सांगितली. ही माहिती ऐकून मुलीच्या आईला व नातेवाईकाला धक्काच बसला. तेव्हा आईने मुलीला सोबत घेऊन पोलीस स्टेशन गाठले. मध्यवर्ती पोलीस ठाण्यात नराधम बापाच्या विरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात असून सुभाष कसबे (४१) असे नराधम बापच नाव असून मध्यवर्ती पोलीस ठाण्यात भादवि कलम ३७६, ३५४,३२३,५०६ पोक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक शंकर शिंदे हे करत आहेत.

# उस्मानाबादचा चोरटा बार्शीत यायचा व पिकांपासून अवजारांपर्यंत सर्वच चोरायचा!




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात वाढत्या भुरट्या चोऱ्या व शेतमालाच्या चोरीच्या घटनांची गंभीर दखल घेत सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी घेताच बार्शी तालुका पोलिसांच्या पथकाने उस्मानाबाद जिल्ह्यात वाशी येथे सापळा रचून एका आरोपीला ताब्यात घेतले तपासात त्याने नऊ गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. या कारवाईत २४ लाखांचा शेतमालासह कृषी अवजारे जप्त केली आहेत. बार्शी तालुक्यात शेतीमाल आणि भुरट्या चोऱ्या वाढल्या याची पोलीस अधीक्षकांनी दखल घेत सूचना केल्या बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी जायपत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रवीण जाधव, पोलीस नाईक अमोल माने, पोलीस नाईक, अभय उंदरे पोलीस कॉन्स्टेबल धनराज फत्तेपुरे यांचे एक विशेष पथक नेमले, पोलीस नाईक अभय उंद्रे व धनराज फत्तेपुरे आणि रतन जाधव यांनी सायबर सेलच्या मदतीने तांत्रिक विश्लेषणाच्या माध्यमातून आरोपी पर्यत पोहोचले. आरोपी माणिक गुलाब काळे (रा. कासारखाणी, ता.वाशी जि.उस्मानाबाद) हा वाशी येथील बाजारपेठेत हा खरेदी करण्यासाठी येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे पथक २९ सप्टेंबर रोजी वाशी येथे सापळा रचून काळे याला ताब्यात घेतले. त्याला बार्शी तालुका पोलीस ठाण्याला आणून कसून तपास केला. त्याने केलेल्या गुन्ह्याची कबुली दिली. तसेच इतर तीन साथीदारांच्या मदतीने गुन्हे केल्याची कबुली दिली. सोलापूर ग्रामीण अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील, बार्शी उपविभागीय पोलीस अधिकारी धाराशिवकर यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी जायपत्रे यांच्या पथकाने ही कामगिरी बजावली. सहाय्यक फौजदार प्रवीण जाधव, हेडकॉन्स्टेबल राजेंद्र मंगरुळे, गोरख भोसले, सुभाष सुरवसे, दशरथ बोबडे, अमोल माने, अभय उंदरे, पोलीस नाईक तानाजी धिमधिमे, सुरेश मिरकले, पोलीस नाईक केकान, पोलीस चालक वैभव भांगे, समीर पठाण यांच्या या पथकात समावेश होता.

# कापूस पिकामध्ये व्यवस्थापन केल्यास अजुनही उत्पादन मिळणे शक्य -डॉ.जडे

**वाकोद/प्रतिनिधी**

कापूस उत्पादक शेतकरी बंधूनी अजूनही कापूस पिकामध्ये व्यवस्थापन केल्यास चांगले उत्पादन मिळणे शक्य आहे असे जैन इरिगेशनचे वरिष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ.बी.डी.जडे यांनी वाकोद येथे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना जागतिक कापूस दिनानिमित्त आयोजित कापूस परिसंवाद मध्ये मार्गदर्शन करताना व्यक्त केले. सातत्याने झालेल्या पावसामुळे कापूस पिकामध्ये पात्या, फुले गळ व बोंड सड ह्यामुळे उत्पादनात घट येणार आहे. तरीही शेतकऱ्यांनी वेळ न घालविता कापूस पिकाचे सध्या परिस्थितीमध्ये अधिक उत्पादन मिळवायचे असेल तर सततच्या पावसामुळे जमिनीतील अन्नद्रव्ये निचराद्वारे झिरपून गेली आहेत त्यामुळे कापूस पिकाला पोषणाची गरज आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी ज्यांच्या कापूस पिक ठिबक सिंचन पद्धतीवर आहे त्यांनी ठिबक मधून युरीया, १२:६१:० आणि पांढरा पोटॅश एकत्रित देणे गरजेचे आहे. सोबत मॅग्नेशियम सल्फेट आणि चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्ये आठवड्यातून एक वेळा द्यावे ज्यांच्या कापूस पिकामध्ये ठिबक नाही त्यांनी १०:२६:२६ रासायनिक खत १ बॅग, युरीया १ बॅग द्यावे. खते मातीने झाकून द्यावीत. तसेच



१३:४०:१३ ची फवारणी करावी. बुरशीयुक्त रोगापासून तसेच बोंड सडच्या नियंत्रणाकरीता कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम आणि स्टेप्टोसायक्लीन १ ग्रॅम १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. गुलाबी बोंड अळीच्या नियंत्रणाकरीता एकात्मिक किड व्यवस्थापनचा अवलंब करताना शेतात एकरी ५ कामगंध सापळे लावावेत, निंबोळी अर्काची फवारणी करावी नंतर आठवड्याने प्रोफेनोफॉस किंवा थायोडीकार्बची फवारणी करावी. प्रकाश सापळे लावावेत. रस शोषण करणारी किडी मावा, तडतुडे, फुलकिडे, पांढरी माशी नियंत्रणाकरीता पिवळे, निळे चिकट सापळे लावावेत तसेच आंतरप्रवाही किटक नाशकांची फवारणी करावी. ह्यामुळे निश्चितच कापूसाचे उत्पादन चांगले मिळेल असे डॉ. जडे ह्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना ही त्यांनी समाधानकारक उत्तरे दिलीत. शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त जानेवारी अखेरपर्यत कापूस पिक संपवावे, कापसाचे कोणतेही अवशेष शेतात राहणार नाही याची काळजी घ्यावी. कार्यक्रमाचे अध्यक्ष धोंडूराव वानखेडे, जैन फार्मचे व्यवस्थापक विनोद राजपूत, मंगेश देशमुख, मनोज पाटील, जैन ठिबकचे वितरक मोहन देशमुख, भास्कर पाटील, उपसरपंच भगत प्रकाश जैन, रमेशभाऊ आस्कर, राहुल आस्कर, डॉ. संतोष चौधरी, संजय सपकाळे, होळे महिला शेतकरी, परिसरातील शेतकरी उपस्थित होते. विलास जोशी सरांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर जैन फॉर्मचे विनोद राजपूत यांनी आभार मानले.

# लातूर जिल्ह्याची ऐतिहासिक सफर : लत्तलूर ते लातूर

भारतीय द्विपकल्पात लातूरचे भौगोलिक स्थान अत्यंत महत्वाचे होते. पुरश्मयुग, नवाश्मयुग, ताम्रपाषाणयुग यांच्या नंतर येणाऱ्या काळा पर्यत येथे प्राथमिक अवस्थेतील मानवी वसाहती होत्या... याचे पुरावे लातूर-आंबाजोगाई मार्गावरील हरवाडी या गावाजवळ सुमारे ५० हजार वर्षापूर्वीच्या हत्ती, पानघोडे इत्यादी प्राण्यांची हाडे सापडली असल्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणात जलस्रोत होता. म्हणजे आज मांजरा नदीच्या खोऱ्यात जो सहासे ते सातशे मिली मीटर एवढा सरासरी पाऊस पडतो.. तो त्याकाळी अधिक मोठ्या प्रमाणात पडत असावा. हे सांगण्या मागचा उद्देश एवढाच की मानवी वस्तीसाठी लागणारी अनुकूलता या प्रदेशात होती. त्यामुळे अश्मयुगात येथे माणसाचा वावर सुरु झाला असावा. (संदर्भ डॉ. हरिहर ठोसर यांचे लेखन)

मागच्या लेखात मी राष्ट्रकुट राजवंशाचे मूळगाव लत्तलूर असल्याचे ओझरते सांगितले होते. पण त्यापूर्वी लातूर भागाचे अस्तित्व काय होते. ते बघूया...!! ऐतिहासिक काळाच्या पूर्वीचा काळ जर



बघितला तर भारतात गण व्यवस्था होती.. त्या गणाचे सम्राज्यात रूपांतर करण्याचे काम चंद्रगुप्त मौर्य यांच्या काळात झाले... मौर्य घराण्याच्या काळात १६ महाजनपदे निर्माण केली होती. त्यातली दोन महापदे अश्मक आणि मूलक ही दक्षिण भारतातील होती.. अश्मकची राजधानी पोदनपूर (आजचे बोधन जिल्हा निजामाबाद) आणि मूलकची राजधानी प्रतिष्ठान नगर (आजचे पैठण)... यातले बोधन लातूर पासून १७२ किलो मीटर अंतरावर आहे.. लातूर मांजरा नदीच्या कडेवर आणि बोधनही मांजरा नदीच्या किनारी वसलेली शहर तर मौर्य काळात दक्षिणेच्या दोन समृद्ध बाजार पेठा एक प्रतिष्ठान नगर (पैठण) आणि दुसरे तगर (तेर)... त्यातले तेर लातूर पासून अवघ्या ५० किलोमीटरवर होते. इ. स. पूर्व चौथ्या शतकात मौर्याचा दक्षिणेत अजून राज्य विस्तार झाला.. त्यावेळी प्रशासनाच्या सोयीसाठी मौर्याचे दक्षिणेतील मुख्यालय सुवर्णगिरी म्हणजे गुलाबर्गा जिल्ह्यातील आजचे सन्नती. सन्नती ते तेर हे आंतर ३५० किलोमीटर आहे,हा एकेकाळचा व्यापारी मार्ग होता, मधला पडाव लातूर... या सगळ्यात लातूरचे महत्व अधोरेखित होते. हे सगळे सांगण्याचा हेतू एवढाच आहे की राष्ट्रकुटाच्या पूर्वीही लातूरचे अस्तित्व होते. पुढे कुंतल प्रदेश झाला, त्यात लातूरचा समावेश होऊ लागला.

सातवाहन कालखंड : सातवाहन सिमूख हा मोर्य सम्राज्याचा दक्षिणेकडील मांडलीक होता... पण पहिल्या शतकात सातवाहनाचे स्वातंत्र्य राज्य निर्माण झाले. प्रतिष्ठान नगर ( पैठण ) राजधानीचे ठिकाण होते. त्या काळात उज्जैन सारख्या उत्तरेतील व्यापारपेठेला जोडणारी गाव म्हणजे भडोच, भोकरदन, तेर. तेरचा उल्लेख ग्रीक प्राचीन साहित्यात आढळतो. विशेष म्हणजे तगर जनपदचा उल्लेख असलेल्या नाण्यावरून लत्तलूर हे तगर (तेर) जनपदाचा एक भाग होता हे दिसून येते.

वाकाटक कालखंड : वाकटक या घराण्यातील प्रवरसेन या महापराक्रमी राजाने संपूर्ण दक्षिणापथ आपल्या अधिपत्याखाली घेतले होते. वाकाटक राजघराण्याच्या दोन शाखेतील एक शाखा वत्सगुल्म आजचे वाशिम येथे होती. त्या शाखेच्या अधिपत्याखाली आजचा पश्चिम विदर्भ,मराठवाडा काही प्रमाणात आंध्र प्रदेश आणि काही कर्नाटक आजचा सीमावर्ती भाग असा राज्यविस्तार होता. देवसेन वाकाटक राजाच्या इंडिया ताम्रपट यातील वर्णनानुसार लातूर हा भाग होता आणि तो नांगरकटक - उत्तरमार्ग च्या प्रशासन विभागात मोडत होता. वाकाटकाच्या वत्सगुल्म शाखेला आपातकालात खरा राजाश्रय लातूर-उस्मानाबाद-बिदर भागाने दिल्याचे ताम्रपटावरून सिद्ध होत असल्याचे नोंदविण्यात आले आहे. (संदर्भ पुस्तक : अर्ली हिस्ट्री ऑफ डेक्कन, अर्ली ब्राम्ही इन्स्क्रिप्शन फॉर्म सन्नती) वाकटक देवसेनच्या बिदर ताम्रपटातील स्थलनामाची निश्चिती औसा आणि लातूर म्हणून होते. वेल्पकोंडा म्हणजे बेलकुंड, पसापलकल्ल म्हणजे हसाळा, क्रेरिंचकल्ल म्हणजे केज आणि डोणिथोंब म्हणजे धानोरी यावरून देवसेनच्या ताब्यात होता हे सिद्ध होते. याशिवाय तेर येथे विद्याधरवंशीय राजे राज्य करत असल्याचाही उल्लेख आढळतो. लातूर आणि उस्मानाबाद मधील अनेक गावामध्ये या प्राचीन इतिहासाचे अवशेष जमिनीच्याखाली निद्रिस्त आहेत.. यावर संशोधन करण्याची गरज असून जिथे जिथे प्राचीन अवशेष आहेत त्यावर प्रकाश टाकण्याची गरज आहे.

**- युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, लातूर**

# जप्त केलेला दीड कोटीचा गांजा बोरामणीच्या कंपनीत जाळला



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील ३० गुन्ह्यातील एकूण १६४३ किलो ६४९ ग्रॅम (१ कोटी ६४ लाख रुपयांचा) जप्त केलेला गांजा सोलापूर ग्रामीण पोलिसांनी बोरामणी येथील एका कंपनीत जाळून नष्ट करण्यात आला. सोलापूर जिल्ह्यातील १८ पोलीस स्टेशन मधील नार्कोटिक्स इज अँड सायकोट्रॉफिक सबस्टेन्सेस क्ट (एनडीपीएस ॲक्ट) अन्वये दाखल असलेल्या त्यामध्ये पोलीस तपासावरील व न्यायालयात प्रलंबित असलेल्या २७ गुन्ह्यातील अमली पदार्थ मुद्देमालाबाबत एनडीपीएस कलम ५२ अ (२) प्रमाणे कार्यवाही करून न्यायालयाचा निकाल लागलेल्या ३ असे एकूण ३० गुन्ह्यातील एकूण १६४३ किलो ६४९ ग्रॅम जप्त करण्यात आलेला गांजा जाळून नष्ट करण्यात आला. ही कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, पोलीस उपअधीक्षक सूर्यकांत पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील, सहायक रासायनिक विश्लेषक कीर्ती बडवे, वैज्ञानिक सहाय्यक अ.वि.खर्डेकर उपप्रादेशिक अधिकारी अजित पाटील, वजन व मापे निरीक्षक राजेंद्र जाधव यांच्यासह दोन शासकीय पंच असे तसेच संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत नष्ट करण्यात आला.

# जीर्ण इमारती कोसळण्याच्या मार्गावर



**वाडा/वार्ताहर**

परतीच्या पावसाने जिल्ह्यात थैमान घातले असून कोसळधारांमुळे वाडा तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेतामध्ये पाणी साठल्याने भातपीकांची नासाडी होण्याच्या भीतीने शेतकरी चिंतातुर झाला आहे. असाच पाऊस आणखी चार, पाच दिवस कोसळत राहिला तर हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला जाण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. अतिवृष्टीमुळे वाड्यातील जीर्ण झालेल्या इमारती कोसळण्याचे प्रकार समोर येत आहेत. वाड्यात ब्रिटिशकालीन इमारती अजूनही अस्तित्वात असून वाडा तहसील कार्यालय, पोलीस ठाणे, पोलीस वसाहत अशा विविध इमारती अजूनही सुस्थितीत असून त्यांचा उपयोगही केला जात आहे. मात्र माती, विटांनी बांधलेली घरे ज्यांनी शातक पार केले आहे, त्यापैकी अनेक इमारती अतिशय जीर्ण झाल्याने व तिथे कोणाचा सहवास नसल्याने त्या दुरुस्ती विना डबघाईला आल्या आहेत अनेक वर्षापासून दुरुस्तही व डागडुजी केली जात नाही त्यात अतिवृष्टीमुळे या इमारती हळूहळू ढासळत आहेत. वाड्यातील भानुशाली आळी येथील एका इमारतीचा काही भाग बुधवारी सकाळी कोसळल्याने हा प्रकार अतिशय गंभीर असल्याचे निदर्शनास आले आहे. या इमारतीला लागून रहदारीचा रस्ता आहे. रस्त्यावरून जाणाऱ्यांच्या अंगावर पडून जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाड्यातील पाटील आळी, वाणी आळी, सिद्धेश्वर रोड, मुस्लिम आळी अशा अनेक भागात शतक ओलांडलेली घरे आहेत या कोसळण्या पूर्वी योग्य ती खबरदारी घेण्याची मागणी होत आहे.

# संवेदनहीन असलेल्या सरकारला जागे करण्यासाठी अन्नत्याग आंदोलन -आ. संभाजी पाटील निलंगेकर

**लातूर/प्रतिनिधी**

शेतकऱ्यांप्रति संवेदनाहीन झालेल्या आघाडी सरकारला आणि पालकमंत्र्यांना जाग आणण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने ११, १२ व १३ ऑक्टोबर रोजी लातुरात अन्नत्याग आंदोलन केले जाणार असल्याची माहिती भाजपा नेते आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी जुलै महिन्यात झालेल्या अतीवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या भरपाईसाठी शासनाने नुकतेच ३६५ कोटी रूपये जाहीर केले आहेत. मात्र यामध्ये लातूर जिल्ह्याचा समावेश नसल्याची माहिती देत आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी ही मदत मिळवून देण्यात पालकमंत्री अपयशी ठरल्याचा आरोप करीत शेतकर्यांप्रती संवेदना नसलेल्या पालकमंत्र्यांनी शेतकर्यांसाठी आणि जिल्ह्यासाठी गेल्या दोन वर्षात काय केले याची खुली चर्चा करावी असे आव्हान




यावेळी आ.निलंगेकर यांनी दिले.परिषदेत बोलताना आमदार निलंगेकर म्हणाले शेतकऱ्यांसमोर अनंत समस्या उभ्या आहेत शेतकरी त्रासून गेलेला आहे, परंतु पालकमंत्र्यांना आणि सरकारला त्याचे काहीही देणेघेणे नाही मागील काळात जे नेहमी टक्केवारीचा आरोप करीत होते ते आता कोणत्या टक्केवारीत अडकून पडले आहेत आहेत याचा खुलासा त्यांनी जनतेला करावा. विमा कंपन्यांचा फायदा करणे म्हणजे शेतकर्याचा नुकसान करणारा आहे त्यांना समजत नाही का असा खडा सवाल निलंगेकर यांनी केला. भाजपा गेली दोन वर्ष सक्षम विरोधी पक्ष म्हणून लढत आहे आम्ही योग्य वेळी लढा देतो आणि कोरोना च्या काळात आम्ही सरकारला साथ दिली आहे परंतू अन्नदाता शेतकरी आज मदतीसाठी आक्रोश करत असताना सरकारला पालकमंत्र्यांना जाग येत नाही ते कुंभकर्णासारखे झोपले आहेत त्यामुळे लातूर जिल्ह्यातील शेतकर्यांचं अतोनात नुकसान होत आहे शेतकर्यांचे प्रश्न शेतकर्यांच्या समस्या सोडविण्यासाठी अन्नत्याग आंदोलन आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सामाजिक राजकीय संघटनांनी सुद्धा पक्षीय वैचारिक मतभेद बाजूला ठेवून शेतकर्यांच्या प्रश्नांसाठी या अन्नत्याग आंदोलन आता सहभागी व्हावं असं आवाहन त्यांनी केले. पालकमंत्री अमित देशमुख यांनी गेल्या दोन वर्षात जिल्हा परिषदेसाठी महापालिकेसाठी किंवा जिल्ह्यातल्या सार्वजनिक कामासाठी कोणता भरीव निधी आणला याची जाहीर पत्रकारांच्या समक्ष आमनेसामने चर्चा करावी असं आम्ही त्यांना आव्हान देत असल्याचेही संभाजी पाटील म्हणाले या नैसर्गिक आपत्ती नंतर राज्य सरकारच्या दोन कॅबिनेट बैठका झाल्या या दोन बैठक आत लातूर जिल्ह्यातील शेतकर्यांसाठी पालकमंत्र्यांनी कोणता ...पान ६ वर

# भोईवाडामधील एसआरएच्या इमारतींना ओसी मिळण्याआधीच सदनिकांमध्ये गळती

## निकृष्ट बांधकामाची चौकशी होऊन कठोर कारवाईची मागणी

**मुंबई/प्रतिनिधी**

वर्षांनुवर्षे झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना पक्के आणि स्वतःच्या मालकी हक्काचे घर मिळावे यासाठी राज्य सरकारने झोपडपट्टी पुनर्वसन योजना सुरु केली. पण या योजनेअंतर्गत गरिबांना त्यांच्या झोपड्या तोडून ज्या इमारतींमध्ये घरे देण्यात आलेली आहेत. त्यांचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून सात आठ वर्षातच घरांना गळती लागलेली आहे. परेल भोईवाडा या ठिकाणी असलेल्या झोपडपट्टीचे असेच पुनर्वसन करून २२ मजल्यांच्या सहा इमारती बांधण्यात आल्या आहेत. मात्र त्यातील बहुतेक सदनिकांना गळती लागल्याने त्यांचे स्लॅब कमजोर होऊन ते कोसळून केंव्हाही मोठी दुर्घटना घडू शकते. ओंकार बिल्डरने हे बांधकाम केलेले आहे. मात्र ओसी मिळालेली नसताना जर अशा प्रकारे इमारतींना गळती लागलेली असेल तर हि गंभीर बाब असून या इमारतीचे बांधकाम करणाऱ्या ओंकार बिल्डर तसेच हे या बांधकामाची क्वालिटीची तपासणी करणाऱ्या क्वालिटी कंट्रोलर आणि संबंधित पालिका व



एसआरए प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचीही चौकशी व्हायला हवी. या प्रकरणी येथील स्थानिक रहिवाशी बापू आण्णा जाधव यांच्या मालकीच्या इमारत क्रमांक ५ मधील ४१८ क्रमांकाच्या सदनिकेत ५ ठिकाणी गळती लागलेली आहे. त्यातील एक गळती तर मीटर बॉक्सवर असून या गळतीचे पाणी जर मीटर बॉक्स मध्ये गेले तर स्पार्किंग होऊन आग लागण्याचा धोका आहे. म्हणून बापू जाधव यांनी सदर प्रकरणी स्थानिक कमेटी आणि एसआरए प्राधिकरणाकडे रीतसर लेखी तक्रार करून या तक्रारीची परत गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड आणि पालिका आयुक्त इक्बालसिंग चहल यांना पाठवून इमारतींमधी दोष तत्काळ दूर करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# शेतकऱ्यांच्या मागण्यासाठी छावा संघटनेचे औसा तहसील समोर जागरण गोंधळ आंदोलन



**औसा/प्रतिनिधी**

मागील अनेक दिवसापासून सतत अतिवृष्टी पडत असल्यामुळे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यासह संपूर्ण लातूर जिल्ह्याला अतिवृष्टीने झोडपले. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिकात पाणी गेल्याने व अनेक शेतकऱ्यांचे पीक वाहून गेल्यामुळे तसेच शेतातील माती खरडून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना महाविकास आघाडी सरकार व केंद्रातील भारतीय जनता पार्टीचे सरकार कोणत्याही प्रकारची ठोस मदत करण्याची भूमिका अद्याप घेत नसल्यामुळे आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उसाच्या एफ आर पी ची रक्कम देत नसल्यामुळे अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने औसा तहसील कार्यालयासमोर शुक्रवार दि. ८ ऑक्टोबर रोजी जागरण गोंधळ आंदोलन सुरू ...पान ६ वर

# नांदेडमध्ये इंधन माफिया व सरकारी अधिकाऱ्यांच्या आर्थिक हितसंबंधांमुळे बायो डिझलची बेकायदा विक्री

**नांदेड/नरेन भारती**

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत इंधनाच्या वाढत्या किमती आणि त्याच्या आयातीवर होणारा अफाट खर्च लक्षात घेता सरकारने इंधनाचा वापर, विक्री आणि वेगवेगळ्या मार्गाने होणारी तस्करी लक्षात घेऊन कठोर धोरण राबवणे गरजेचे आहे. आजकाल इंधनातील भेसळीचे प्रकार वाढले असून त्यातून मानवी जीवनाला हानिकारक असे प्रदूषण होतेय. या प्रदुषाणाने लोकांना वेगवेगळे आजार होत आहेत आणि हे सर्व रोखण्याची जबाबदारी ज्या प्रशासनावर आहे. त्या प्रशासनातील अधिकारी मात्र इंधन माफियांचे भागीदार बनून खोऱ्याने पैसा ओढत आहेत. हायवेवरच्या पानपट्टी पासून ते धाब्यापर्यंत सर्व ठिकाणी छुप्या पद्धतीने बायो डिझेलची विक्री होत असून वाहतूक पोलीस तसेच अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना हे सर्व ठाऊक असूनही इंधन माफियांकडून या अधिकाऱ्यांचे खिसे गरम केले जात असल्याने प्रशासकीय यंत्रणा डोळे मिटून आहे हे जर असेच सुरु राहिले तर प्रदूषणाचा स्तर वाढून काय परिस्थिती निर्माण




होईल याची कल्पनाही करू शकते. महाराष्ट्र आणि आंध्रच्या सीमेवर सध्या मोठ्या प्रमाणावर बायो डिझेलची बेकायदा विक्री आणि साठवणूक सुरु असून दोन्ही राज्यांचे प्रशासकीय अधिकारी या वाहत्या गंगेत हात धुवून घेत आहेत. त्यांच्यावर कारवाई कधी करणार असा संतप्त सवाल सामान्य जनता आणि पेट्रोल पंपवाले विचारीत आहेत.

नांदेड जिल्ह्यात बायो डीझेलची सर्रास विक्री होत आहे. ही विक्री भोकर, हदगाव, नांदेड, नायगाव या तालुक्यात जोमात चालू असून याकडे प्रशासनाचे दुलर्क्ष झाले आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाने राज्यभर सुरु असलेली अवैध इंधनविक्री, बायोडिझेल व बनावट डीझेल विक्री रोखण्यासाठी विशेष मोहीमेची घोषणा केली होती. ती मोहीम प्रशासनानेच गुंडाळून ठेवली आहे. आश्चर्य म्हणजे नांदेड जिल्ह्यात यावर ठोस कार्यवाही झालीच नाही. अगोदर प्रशासनाने अवैध धंद्यांना अभय देऊन प्रचंड प्रमाणात प्रदूषण केले आहे त्यात या बनावट इंधनाची भर पडली आहे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग सहसचिव यांनी राज्यासाठी परिवहन उद्देशासाठी हायस्पीड डिझेलबरोबर मिश्रण करण्यासाठीचे बायोडिझेल (उत्पादन, साठवणूक, पुरवठा व विक्री) याबाबतचे धोरण निश्चित केलेले असून, बायोडिझेलचे अवैध उत्पादन, साठवणूक, पुरवठा व विक्री करणाऱ्याविरुद्ध कारवाई करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार अवैध बायोडिझेल, बनावट डिझेलच्या विक्रीस प्रतिबंध बसावा, यासाठी तपासणी ...पान ६ वर

# सडलेले सोयाबीन सरकारला पोहचवा!

## शेतकऱ्यांचा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर टाहो

**देवणी/शकिल मनियार**

अतिवृष्टी व मांजरा नदीच्या पुराने देवणी तालुक्यातील सोयाबीन पिकाची प्रचंड नासाडी झाली. आम्हा शेतकऱ्यांचे अर्थकारणच बिघडले. नुकसान झालेले सोयाबीन सरकारपर्यंत पोहचवा असा टाहो देवणी भाजयुमो तालुका अध्यक्ष रामलिंग शेरे व जिल्हा परिषद सदस्य प्रंशात पाटील व शेतकऱ्यानी विरोधी पक्षनेते देवेद्र फडणवीससमोर फोडला. अन नुकसान झालेले सोयाबीनचे पँकीग असलेला डबा सुपुर्द केला. गौर ता.निलंगा येथील दौऱ्यात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची देवणी भाजयुमो शिष्टमंडळाने व शेतकऱ्यानी भेट घेतली. देवणी तालुक्यातील अतिवृष्टीमुळे व मांजरा नदीच्या पुरामूळे देवणी तालुक्यातील हजारो हेक्टर खरीप हंगामातील पिकाचे नुकसान झाले आहे. बळीराजाच्या हाती आलेला घास या आस्मानी संकटामूळे हिरावला गेला. बळीराजा हा कायम संकटाच्या गर्तेत आडकतो आहे. पुरामूळे पुर्ण पिकेतर गेली आहेत. आता शेताची मशागत करायची म्हटल तरी शिवारात सर्वत्र दुर्गधी पसरली आहे. त्यामूळे शेतकऱ्याच्या आरोग्याचा विषय गंभीर झाला आहे. याकडे लक्ष देवुन देवणी तालुक्यातील शेतकऱ्याचे सरसकट पंचनामे करुन तात्काळ एकरी पन्नास हजार रु नुकसान भरपाई द्यावी व बांद्रा निवासी असलेल्या मूख्यमंत्र्यांना अतिवृष्टी भागाची पाहणी करण्यासाठी वेळ मिळत नसेल तर विरोधीपक्ष म्हणुन तुम्ही आमचे दुत व्हा अशी



विनवणी यावेळी केली. विरोधीपक्ष नेते देवेद्र फडणवीस, विधानपरिषद विरोधीपक्ष नेते प्रविण दरेकर, लातुर जिल्हाचे माजी पालकमंत्री आमदार संभाजीराव पाटील निंलगेकर, खासदार सुधाकर शृंगारे, जिल्हाध्यक्ष रमेशअप्पा कराड, आमदार अभिमन्यु पवार प्रदेश सचिव अरविंद पाटील निंलगेकर यांनी पुर भागाची पहाणी केली. सोयाबीन नुकसानीचे पार्सल व निवेदन जिल्हा परिषद सदस्य प्रंशात पाटील, भाजयुमो तालुका अध्यक्ष रामलिंग शेरे, जिल्हा उपाध्यक्ष भाजयुमो संगम पताळे, णमंत बिरादार, प्रशात पाटील, भाजयुमो तालुका चिटणीस राज गुणाले आदीनी दिले.

# चांगल्या कार्याला कधीही निधीची कमतरता भासत नाही-अमन मित्तल

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहरातील अग्रसेन भवनची भव्य वास्तू नजरेत भरणारी आहे. समाजासाठी अशा प्रकारच्या वास्तूची निर्मिती होणे खूप आवश्यक आहे. अशा चांगल्या कार्यासाठी कधीही निधीची कमतरता भासत नाही. समाज मदतीसाठी आवर्जून पुढे येतो, असे प्रतिपादन लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त अमन मित्तल यांनी केले. लातूर शहरातील समस्त अग्रवाल समाजाच्या वतीने महाराजा अग्रसेन जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास ते प्रमुख पाहुणे म्हणून संबोधित करीत होते. यावेळी अग्रवाल समाज ट्रस्टचे अध्यक्ष नंदकिशोर अग्रवाल, उपाध्यक्ष विनोद सत्यनारायण अग्रवाल, सचिव अशोक (गट्टूसेठ) अग्रवाल, सहसचिव कमलकिशोर अग्रवाल, ओमप्रकाश पोद्दार, कोषाध्यक्ष सुरेंद्र अग्रवाल, अग्रवाल समाज लातूरचे अध्यक्ष गिरीधारीलाल बंसल, अग्रवाल महिला मंडळाच्याअध्यक्षा वंदना ब्रिजवासी,अग्रवाल नवयुवक मंडळाचे अध्यक्ष महेश अग्रवाल




आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी अमन मित्तल यांच्या हस्ते ध्वजारोहण व अग्रसेन महाराजांची आरती करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना मित्तल पुढे म्हणाले की, लातुरात अग्रवाल समाजामध्ये उत्कृष्ट संघटन असल्याचे पाहावयास मिळाले. कोणत्याही समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी संघटन अत्यंत महत्वपूर्ण असते. समाजात चांगल्या उपक्रमासाठी कधीही पैशाची कमी पडत नाही. समाजाच्या भव्य वास्तूसोबतच गोशाळेसारखे उपक्रमही राबविले जाणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. अशोक अग्रवाल यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना भविष्यात लातुरात सध्यापेक्षाही मोठे आणि भव्य-दिव्य भवन उभारण्याचा मानस व्यक्त केला. तसेच आगामी काळात समाजाच्या वतीने सर्वांसाठी भव्य नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. नंदकिशोर अग्रवाल यांनी यावेळी आपले विचार व्यक्त करताना समाजाच्या प्रगतीसाठी राजकीय आधाराची नितांत आवश्यकता असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्तविक व अमन मित्तल यांचा परिचय कमलकिशोर अग्रवाल यांनी करून दिला. ...पान ६ वर

# अखेर दीड वर्षानंतर शाळेत किलबिलाट



**वाडा/प्रतिनिधी**

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर २२ मार्च २०२० पासून देशात लॉकडाऊन लागू केल्याने सर्व शाळाबंद करण्यात आल्या होत्या तर आता दीड वर्षानंतर कोरोनाचा प्रसार मंदावला आहे, आणि बहुतेकांनी कोरोना प्रतिबंधात्मक लस घेतली असल्याने सोमवार (दि. ४ ऑक्टोबर) पासून कोरोना प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करून शहरी भागातील इयत्ता ८ वी ते इयत्ता १२ वी चे वर्ग तर ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांचे वर्ग सुरु करण्यात आले आहेत. दीड वर्षापासून घरात बसून असलेल्या विधर्थ्याची शाळा सुरू झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हर्षोउल्हास दिसून आला.त्याच आनंदाच्या भरात मुलांनी अगदी टापटीप शाळेचा गणवेश परिधान करून शाळेकडे धाव घेतल्याचे चित्र दिसून आले. तर शिक्षकांनीही विधर्थ्याचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले व विद्यार्थ्यांना शालोपयोगी पुस्तक, वह्या व मास्कचे वाटप केले आले. सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी तोंडावर मास्क लावले होते वर्गाच्या प्रवेशद्वारावर सॅनिटायझरची सोय केलेली होती, विद्यार्थ्यांची ऑक्सिमिटने तपासणी केली करून प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये सुरक्षित ...पान ६ वर

# लाखिमपुरखिरीमध्ये शेतकऱ्यांना चिरडणारी कार काँग्रेस नेत्याची!

**मुंबई/प्रतिनिधी**

लाखिमपुरखिरी हत्याकांडाला आता एक वेगळेच आणि नाट्यमय वळण लागले आहे. कारण घटनेच्या वेळी त्या कारमध्ये असलेल्या आणि जखमी झालेल्या इसमाने पोलिसांना दिलेल्या माहिती नुसार चार शेतकऱ्यांना चिरडून त्यांचा बळी घेणारी कार भाजप नेत्याची नव्हे, तर काँग्रेसचे माझी खासदार अखिलेश दास यांचा भाचा अंकित दास याची आहे. या घटनेचा खुलासा झाल्यानंतर मुंबईचे माजी उप महापौर आणि भाजप नेते बाबूभाई भवानजी यांनी म्हटले आहे की, लाखिमपुरखिरी कांडात भाजप विरुद्ध साजिष रचणाऱ्या काँग्रेसचा आता पर्दाफाश झाला असून या बाबत सत्य उघडकीस आल्याने काँग्रेस नेत्यांनी आता केंद्रीय मंत्री अजय मिश्रा यांनी भाजपची माफी मागावी अशी मागणी केली आहे. त्या कारमध्ये जखमी अवस्थेत सापडलेल्या इसमाने पोलिसांना दिलेल्या जबानीत म्हटले की ती कार काँग्रेसचे माजी खासदार अखिलेश दास यांचा पुतण्या अंकित दास याची होती. अंकित लखनौचा रहिवाशी असून जखमी इसम त्याच्याकडे कारकून म्हणून काम करतो. जखमी इसमाने पुढे सांगितले की त्या दिवशी कारमध्ये आपण अंकितदास आणि इतर तिघे मिळून पाच जण होते आणि तो अंकित दास मागच्या ...पान ६ वर

# वाडा नगर पंचायत येथे कायदे विषयक साक्षरता शिबीर

**वाडा/प्रतिनिधी**

आज़ादी का अमृत महोत्सव निमित्ताने दिवाणी न्यायालय, वाडा येथे सोमवारी (दि.४ ऑक्टोबर) सकाळी १०:३० वाजता म.दा. सैंदाणे, अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती तथा दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, वाडा यांनी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्यातर्फे पुरविण्यात येणाऱ्या सेवांबद्दल माहिती दिली.




तसेच पिडीतांना देण्यात येणाऱ्या भरपाई योजने बद्दलचा माहितीपट न्यायालयात उपस्थित पक्षकारांना दाखविण्यात आला व त्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच दुपारी २ वाजता नगरपंचायत, वाडा येथे कायदेविषयक साक्षरता शिबीर घेण्यात आले. त्यामध्ये उपस्थित नगरपंचायत पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व उपस्थित जनता यांना विधीज्ञ स.पी.पाटील यांनी मध्यस्थीद्वारे तडजोडीने प्रकरणे निकाली काढणेबाबत मार्गदर्शन केले. म.दा. सैंदाणे, अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, वाडा यांनी विधी सेवा प्राधिकरणाचे उपक्रमांबद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर न्यायाधीश म.दा. सैंदाणे, वाडा तालुक वकील संघाचे पदाधिकारी, वाडा नगरपंचायतचे पदाधिकारी, अधिकारीव कर्मचारी यांनी जनतेला व दुकानदारांना महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्यातर्फे ...पान ६ वर